# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार १२ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४










# मोशी दुर्घटनेत अडकलेल्या ८ जणांचा मृत्यू

## ■ अनेकांचा शोध सुरु ■ कुटुंबांवर दुःखाचा डोंगर



**पुणे/प्रतिनिधी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्रात बुधवारी (दि. ८ जुलै) दुपारी दीड वाजताच्या सुमारास भीषण दुर्घटना घडली. वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर हजारो टन कच-याचा डोंगर अचानक कोसळल्याने दुमजली इमारत क्षणार्धात कोसळली. इमारतीला हजारो टन कच-याच्या मलब्याचा विळखा पडला. या दुर्घटनेत इमारतीमध्ये २३ कर्मचारी अडकल्याची माहिती समोर आली होती. त्यापैकी पाच जण स्वतः बाहेर पडले, तर बचाव पथकांनी एक महिलेसह सहा जणांना सुखरूप बाहेर काढले. उर्वरित ९ जणांना काढण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत होते. अखेर ३ दिवसांनंतर त्यापैकी ८ जणांचे मृतदेह प्रशासनाच्या हाती आले आहेत. तर अजून एकाचा शोध सुरु असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. मोशी येथील कचरा डेपोत ढिगा-याखाली अडकलेल्यांची चिंता आणि त्यांच्या कुटुंबांचा जीवघेणा संघर्ष वेदनादायी आणि अंगावर काटा आणणारा होत चालला होता. अथांग पसरलेल्या कच-याच्या डोंगराकडे डोळे लावून बसलेल्या नातेवाइकांच्या डोळ्यांतील अश्रू आता सुकले होते. पण घरातील व्यक्ती सुखरूप बाहेर येईल, ही आस अजूनही मिटलेली नव्हती. त्या आशेवर ९ जणांचे कुटुंबीय आपल्या माणसाची वाट बघत होते. अखेर त्या नउ जणांचे मृतदेहच या कुटुंबियांच्या हाती आले. त्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तब्बल ८० तासांच्या प्रयत्नानंतर प्रशासनाने या बचाव मोहिमेतून ८ जणांचे मृतदेह बाहेर काढले.

## व्हिएतनामची सहल ठरली अखेरची;

# बोट उलटून १५ भारतीयांना जलसमाधी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दक्षिण व्हिएतनाममधील फु क्वोक बेटाजवळ पर्यटनासाठी गेलेल्या ३२ भारतीय पर्यटक आणि चार कर्मचारी असलेली एक स्पीडबोट उलटून १५ जणांचा मृत्यू झाला. भारतीय दूतावासाने मृतांची नावे जाहीर केली आहेत. व्हिएतनामचे सर्वात मोठे बेट असलेल्या पर्यटनाच्या ठिकाणी ही दुर्घटना घडली. अपघात घडलेल्या बोटीमध्ये लाव्हा मोबाइल्सचे अनेक कर्मचारी आणि वितरक होते, अशी माहिती कंपनीच्या प्रतिनिधीने द इंडियन एक्सप्रेसला दिली.जोरदार वारे आणि खवळलेल्या समुद्रामुळे बोट उलटली असावी, असा अंदाज व्हिएतनाममधील अधिका-यांनी व्यक्त केला आहे. मात्र अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. या घटनेनंतर व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने तातडीने प्रतिसाद देत बचाव कार्यात मदत केली. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही जीवितहानीबद्दल दु?ख व्यक्त केले.

मार्च २००९ मध्ये स्थापन झालेल्या लाव्हा मोबाइल्स कंपनीच्या कर्मचारी आणि वितरकांची सहल व्हिएतनामला गेली होती. एकूण तीन बोटीमध्ये कंपनीचे कर्मचारी पर्यटनाचा आनंद घेत होते. या दुर्घटनेत मृत्यू पावलेले कर्मचारी हे प्रामुख्याने तमिळनाडू, आंध्र प्रदेश आणि केरळ राज्यातील आहेत.

व्हीएन एक्सप्रेस इंटरनॅशनल आणि व्हिएतनाम न्यूजच्या बातमीनुसार, होन मे रु ट न्गोआय बेटापासून ४०० मीटर अंतरावर स्पीडबोट उलटली. यात ३२ भारतीय पर्यटक आणि चार व्हिएतनामी खलाशी होते. फु क्वोक या विशेष आर्थिक क्षेत्रात हे बेट येते. या अपघातानंतर एकूण २१ जणांना वाचविण्यात यश आले तर १५ पर्यटकांचा मृत्यू झाला. तर दोन पर्यटकांची प्रकृती गंभीर आहे.दूतावासाने एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये सदर यादी दिली. तर पोस्टमध्ये लिहिले, आज फु क्वोक बेटाजवळ झालेल्या अपघातात १५ जणांचा मृत्यू झाल्याची बातमी जाहीर करताना दुःख होत आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती आम्ही संवेदना व्यक्त करतो. हो चि मिन्ह शहरातील दूतावास आणि वाणिज्य दूतावास सर्वतोपरी मदतीसाठी उपलब्ध आहे. मृतांमध्ये सेंथिल कुमार जयवेल ,मुरु गा प्रभू अरु मुगम, श्रीधर सुंदरराजन, शेख अब्दुल्ला अब्दुल मजीद, बालाजी नटेसन, विनय कुमार चिथापुरम भास्कर, रविशंकर सुगुमरण, संतोष कुमार शांतीलाल जैन, बाबू कुप्पुस्वामी, अलगुराजन शिवासामी, नल्लापेटा आदिशैया रवितेजा सर्व तामीळनाडू , श्रीधर मुडियम (आंध्र प्रदेश), जया लक्ष्मी गेल्ली (आंध्र प्रदेश). एविकोट चेरियन थामस (केरळ), लोवेनी थामस (केरळ) मृतांमधील १५ पैकी १० जण एकट्या तमिळनाडूमधील आहेत. आंध्र प्रदेशचे तीन आणि केरळचे दोन नागरिक आहेत.

**पंतप्रधान मोदींकडून शोक व्यक्त-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिएतनाममधील घटनेनंतर एक्सवर पोस्ट शेअर करत शोक व्यक्तकेला. व्हिएतनाममधील फु क्वोकजवळ घडलेली बोट अपघाताची दुःखद बातमी ऐकून अत्यंत दुःख झाले. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्या कुटुंबियांप्रति माझ्या मनपूर्वक संवेदना व्यक्त करतो. भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावास सर्वतोपरी मदत करत आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदींनी दिली.

# राज्यावर मान्सून पुन्हा रूसला



**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यासह देशावर अल निनोच्या संकटाचे ढग आहेत. अशातच जूनमध्ये रुसून बसलेल्या पावसाने जुलैच्या पहिल्या आठवड्यात दमदार हजेरी लावत बहुतांश जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढले. मात्र जुलै महिन्याच्या सुरुवातीला बरसणा-या पावसाने पुन्हा एकदा विश्रांती घेतली आहे. राज्यात मान्सूनने दमदार बॅटिंग करत जून महिन्यातील पावसाची तूट भरून काढली. तर कुठे जलसंकटाचे ढग काहीसे निवळले होते. असे असताना परत एक चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. प्रशांत महासागरात सक्रिय होत असलेल्या अल निनोमुळे मान्सूनचा वेग अचानक मंदावला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, १० जुलै ते १५ जुलै दरम्यान उत्तर, पश्चिम आणि मध्य भारतासह महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर पावसाचे प्रमाण कमालीचे घटणार आहे. सध्या अरबी समुद्रात आणि उत्तर भारतात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा कमकुवत होउन पुढे निघून गेल्यामुळे ढगांची दाटी विरळ झाली आहे. १९ जुलैपर्यंतही हीच स्थिती कायम राहू शकते. दरम्यान, मुंबई-कोकणात मध्यम स्वरूपाचा पाउस, तर उर्वरित महाराष्ट्रात उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्रात ⇨(पान २ वर)

# नागपुरात हायप्रोफाइल सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

## ■ राहुल आणि पूजाचे ‘लॉगिन पर्सनल मीटिंग’ वरून सेक्स रॅकेट

## ■ नागपुरात दिल्ली, कोलकाता, पंजाबच्या सेक्स वर्कर सापडल्या



**नागपूर/प्रतिनिधी :** देश-विदेशात नेटवर्क असलेल्या ऑनलाइन सेक्स रॅकेटचा गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने शुक्रवारी पर्दाफाश केला. पोलिसांनी सापळा रचून एका विदेशी महिलेसह पाच महिला सेक्स वर्कर, तसेच त्यांच्याकडून देहविक्रय करवून घेणा-या आरोपीला जेरबंद केले. सचिन माणिकराव महाजन (वय ३८), असे या दलालाचे नाव आहे. या रॅकेटचा मुख्य सूत्रधार समीर उर्फ मनीष उर्फ गगन ठाकूर, तसेच राहुल आणि पूजा नावाची महिला मात्र फरार झाले.

आरोपी ठाकूर, महाजन, राहुल आणि पूजाने लॉगिन पर्सनल मीटिंग नावाने ॲप तयार केले आहे. ॲपवर गेल्यास देशभरातील कोणत्याही मोठ्या शहरात देश-विदेशातील सेक्स वर्कर ते उपलब्ध करून देतात. गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाला (एसएसबी) हे कळताच त्यांनी सापळा रचला. त्यानुसार, नागपुरात महिला सेक्स वर्कर हवी असल्याचे ॲपवर सांगण्यात आले. आरोपींनी १५ हजार रुपयांत सेक्स वर्कर पुरविण्याची तयारी दाखवली. ठरल्याप्रमाणे शुक्रवारी ⇨(पान २ वर)

# तेलंगणात एका रात्रीत सहा जणांची निर्घृण हत्या

**रंगा रेड्डी (तेलंगणा) :** तेलंगणातील रंगा रेड्डी जिल्ह्यात एका धक्कादायक आणि अंगावर शहारे आणणा-या हत्याकांडाने संपूर्ण देश हादरला आहे. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात तुरुंगवास भोगून जामिनावर बाहेर आलेल्या एका आरोपीने कथित सूडाच्या भावनेतून एका रात्रीत सहा जणांची निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. मृतांमध्ये तक्रार करणारी अल्पवयीन मुलगी, तिची आई, आजी तसेच आरोपीची स्वतःची पत्नी आणि दोन लहान मुलांचा समावेश आहे. या घटनेनंतर आरोपी फरार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी मोठे शोध अभियान सुरू केले आहे.

**लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीचा रक्तरंजित सूड, राज्यभर खळबळ**

**पोक्सो प्रकरणानंतर सूडाची भावना-**पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, राजकुमार असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीने लैंगिक अत्याचाराची तक्रार दाखल केली होती. पीडिता अल्पवयीन असल्याने आरोपीवर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. अटकेनंतर काही काळ ⇨(पान २ वर)

# भाजपाने माझ्या आमदाराला 20-30 कोटींची ऑफर दिली

## ● मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या दाव्याने खळबळ ● ‘ऑपरेशन लोटस’चा आरोप



**श्रीनगर/वृत्तसंस्था :** श्रीनगरमध्ये शनिवारी एका सभेत बोलताना अब्दुल्ला यांनी ऑपरेशन लोटसबद्दल हे विधान केले. त्यांनी दावा केला की, ‘भाजपाच्या एका नेत्याने आणि सर्वोच्च न्यायालयाच्या एका वकिलाने माझ्या एका आमदाराशी संपर्क केला होता. पक्षांतर करण्यासाठी त्याला २० ते ३० कोटी रुपये, मंत्रिपद आणि राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आमिष दाखवण्यात आले.‘

**ते आमच्या एकाही आमदाराल खरेदी करू शकले नाही-**‘भाजपाने त्याला २०-३० कोटी रुपये, मंत्रिपद आणि राज्याचा दर्जा देण्याची ऑफर दिली. पण ते आमच्या एकाही आमदाराला खरेदी करू शकले नाहीत,‘ असे गौप्यस्फोट अब्दुल्ला यांनी केला. भाजपाने आमच्या पक्षाच्या प्रत्येक आमदाराला १०० कोटी रुपये दिले, तरीही ते यशस्वी होणार नाहीत, असेही अब्दुल्ला म्हणाले आहेत. ९० सदस्यसंख्या असलेल्या जम्मू-काश्मीर विधानसभेत अब्दुल्ला यांच्याकडे स्पष्ट बहुमत आहे. जम्मू काश्मीरमध्ये बहुमताचा आकडा ४६ आहे. नॅशनल कान्फरन्सकडे ४१ आमदार आहेत, तर काँग्रेसच्या सहा आमदारांनी बाहेरून पाठिंबा दिला आहे. पाच अपक्ष आणि एका माकप आमदाराचाही अब्दुल्ला सरकारला पाठिंबा आहे.अब्दुल्ला यांनी भाजपाच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर निशाणा साधला आणि जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करण्याच्या मुद्द्यावर माझ्या संयमाला कमजोरी समजू नका, असा इशारा त्यांनी दिला. हे पाउल उचलण्यासाठी योग्य वेळ म्हणजे नक्की काय? असा प्रश्न त्यांनी केंद्राला केला. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, संयम म्हणजे शांत बसणे नव्हे आणि याचा गैरफायदा घेउ नका, असा इशारा त्यांनी दिला. ‘मी त्यांना विचारतोय की, देवाच्या कृपेने, ती योग्य वेळ आली आहे⇨(पान २ वर)

# मी 25 वर्षांपूर्वीची मफलर घालून न्यूझीलंडला आलो-पंतप्रधान

## आमच्यासाठी देशाची लोकसंख्या नाही, तर त्यांच्या भावना महत्त्वाच्या



**ऑकलंड/वृत्तसंस्था :**पंतप्रधान मोदींनी शनिवारी न्यूझीलंडमधील ऑकलंड येथे भारतीय समुदायाला संबोधित केले. यावेळी पंतप्रधानांनी सुमारे तीन दशके जुना किस्सा सांगितला. पंतप्रधान म्हणाले- २५-३० वर्षांपूर्वी जेव्हा मी कोणत्याही सरकारचा भाग नव्हतो, तेव्हा मला येथे येण्याची संधी मिळाली होती.

त्यावेळी मला कोणीतरी भेट म्हणून ३ वस्तू दिल्या, ज्या मी भारतात घेउन गेलो. एक- मफलर, दुसरी- टोपी आणि तिसरा- एक सेट हातमोजे. त्यापैकी एक वस्तू मी आजही या कार्यक्रमात घेउन आलो आहे. या मफलरचा मी अनेकदा वापर केला आणि आजही ती जपून ठेवली आहे.

पंतप्रधान पुढे म्हणाले की, आमच्यासाठी समोरच्या देशाची लोकसंख्या नाही, तर जनकल्याणाची भावना महत्त्वाची आहे. आणि म्हणूनच आम्ही न्यूझीलंडकडून खूप काही शिकलो आहोत आणि आजही शिकत आहोत. यापूर्वी मोदींनी पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेतली. यात १८ मोठे निर्णय आणि १० करारांवर स्वाक्ष-या करण्यात आल्या. दोन्ही नेत्यांनी २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून सुमारे ३५ हजार कोटी करण्याचे लक्ष्य ठेवले. ही कोलेबची वेळ आहे, दोन्ही देश एकत्रः जर आपण कंटेंट क्रिएटर्सच्या भाषेत बोललो तर ही कोलेबची वेळ आहे. दोन्ही देश स्पोर्ट्समध्येही खूप शानदार कोलेब करू शकतात. रग्बी हे याचे खूप मोठे उदाहरण आहे. भारत रग्बीमध्ये न्यूझीलंडकडून शिकू इच्छितो. आम्हाला कोच हवे आहेत, एक्सपर्ट हवे आहेत. न्यूझीलंड आपली खूप मदत करू शकतो.

चंद्रयानच्या लँडिंगवर न्यूझीलंड नाचत होताः भारत आणि न्यूझीलंडचे भविष्य जोडलेले आहे. स्पेस सेक्टर हे याचे खूप मोठे उदाहरण आहे. भारताचे चंद्रयान जेव्हा चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरले,⇨(पान २ वर)






# एटीएसची राज्यभर कारवाई; 100 हून अधिक जणांची चौकशी

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) पाकिस्तानी दहशतवादी शहजाद भट्टीशी संबंधित नेटवर्कविरोधात राज्यभर मोठी कारवाई केली असून, १०० हून अधिक संशयितांची चौकशी करण्यात आली आहे. ही कारवाई अद्याप सुरू असल्याची माहिती राज्याचे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली. ते नागपूर विमानतळावर आज (११ जुलै) प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



पंकज भोयर म्हणाले, शहजाद भट्टी हा पाकिस्तानात बसून महाराष्ट्र आणि देशाविरोधात कट रचत असल्याची अत्यंत गोपनीय माहिती एटीएसला मिळाली होती. त्यानुसार एटीएसने वेळेत कारवाई करून त्याचा कट उधळून लावला. ते पुढे म्हणाले की, शहजाद भट्टीचे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी एटीएसने राज्यातील १५७ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईदरम्यान राज्यभरातील १०० हून अधिक जणांना ताब्यात घेउन त्यांची चौकशी करण्यात आली आहे. चौकशीत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आणखी काही ठिकाणी कारवाई होण्याची शक्यता असल्याचंही त्यांनी सांगितलं. संबंधित प्रकरणाचा पुढील तपास एटीएसकडून सुरू असून, या कारवाईतून मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढील पावलं उचलली जाणार असल्याचेही भोयर यांनी स्पष्ट केले.

ऑनलाईन पैशांच्या माध्यमातून शस्त्रे पुरवण्याचा कट शहजाद भट्टीच्या समर्थकांना शस्त्रे उपलब्ध करून देण्यासाठी ऑनलाईन माध्यमातून आर्थिक व्यवहार केले जात असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. मात्र, महाराष्ट्र एटीएसने वेळीच कारवाई करून हा कट उधळून लावल्याची माहिती गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.

# उपाहारगृहे, मध्यान्ह भोजनाची होणार कडक तपासणी

**मुंबई :** अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यातील अन्नसुरक्षा मोहिमेला आणखी वेग दिला असून, दूध भेसळीनंतर आता शाळांमधील मध्यान्ह भोजन आणि उपाहारगृहांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार, सुरक्षित आणि सकस अन्न मिळावे, या उद्देशाने मुंबईतील खासगी शाळांमधील कँटीन तसेच मध्यान्ह भोजन पुरवणा-या किचन शेडची व्यापक तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात शुक्रवारी मुंबईत शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, बचत गटांचे प्रतिनिधी आणि संबंधित अधिका-यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत शाळांमधील अन्नसुरक्षा मानकांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. अन्न सुरक्षा मानके अधिनियम २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिले जाणारे अन्न स्वच्छ, पौष्टिक आणि सुरक्षित असणे ही संबंधित संस्थांची जबाबदारी असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आयुक्तपी. आर. सिंगरवाड यांनी बैठकीत स्पष्ट इशारा दिला की, अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणा-या शाळा, कँटीन चालक किंवा मध्यान्ह भोजन पुरवठादारांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल. ही मोहीम आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात असल्याचे त्यांनी सांगितले.




# बाल लैंगिक शोषणाच्या आक्षेपार्ह सामग्री प्रकरणी सायबर पोलिसांत गुन्हा दाखल

## केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचनेनंतर संशयित सोशल मीडिया अकाउंटधारकाविरुद्ध कारवाई

**अमरावती/ प्रतिनिधीः-** इंस्टाग्रामवरून बाल लैंगिक शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओंची देवाणघेवाण होत असल्याची माहिती केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मिळाल्यानंतर अमरावती शहर सायबर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत एका संशयित इंस्टाग्राम अकाउंटधारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. संबंधित व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी तांत्रिक तपास सुरू असून, विविध डिजिटल पुरावे संकलित करण्यात येत आहेत. सायबर पोलिसांकडून सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बाल लैंगिक शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह सामग्रीवर सातत्याने नजर ठेवली जाते. केंद्रीय पातळीवर संशयास्पद अकाउंट्सची माहिती संबंधित राज्यांच्या पोलीस यंत्रणांना पाठविली जाते. त्याच अनुषंगाने ४ मार्च रोजी अमरावती शहर सायबर पोलीस ठाण्याला एका संशयित सोशल मीडिया अकाउंटची माहिती ई-मेलद्वारे प्राप्त झाली होती. प्राथमिक

### डिजिटल पुराव्यांच्या आधारे तपास वेगात

पडताळणी आणि तांत्रिक विश्लेषणादरम्यान संबंधित अकाउंटवरून बाल लैंगिक शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओंची देवाणघेवाण झाल्याचा संशय बळावला. त्यानंतर उपलब्ध डिजिटल पुरावे, तांत्रिक माहिती आणि प्राथमिक तपासाच्या आधारे सायबर पोलिसांनी गुन्हा नोंदविण्याची कारवाई केली. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार यांच्या फिर्यादीवरून संशयित अकाउंटधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाचा भाग म्हणून संबंधित सोशल मीडिया अकाउंटचे लॉगिन तपशील, आयपी अ‍ॅड्रेस, वापरलेली उपकरणे आणि इतर डिजिटल माहिती मागविण्यात आली असून, संशयिताची ओळख निश्चित करून पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याची माहिती सायबर पोलिसांनी दिली.

# चिअर्स बार परिसरात गंभीर गुन्ह्याच्या तयारीत असलेले दोघे जेरबंद; तलवारी, चाकू जप्त

**अमरावती/ प्रतिनिधीः-** शहरात गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडविण्याच्या तयारीत असलेल्या दोन तरुणांना अमरावती शहर गुन्हे शाखेने घातक शस्त्रांसह ताब्यात घेत मोठी कारवाई केली. आरोपींकडून दोन तलवारी, दोन चायना चाकू आणि एक लोखंडी चाकू असा एकूण ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांच्याविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात आर्म अ‍ॅक्टसह संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरात अवैधरित्या घातक शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेचे पथक शहरात गस्त व गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करीत आहे. दरम्यान, गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिअर्स बारच्या मागील रस्त्यावर दोन इसम घातक शस्त्रे घेऊन गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने थांबल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातील प्लास्टिकच्या पोत्याची झडती घेतली असता त्यामध्ये दोन लोखंडी तलवारी, दोन चायना चाकू आणि एक लोखंडी चाकू आढळून आला.पोलिसांनी वेळेत कारवाई केल्यामुळे संभाव्य गंभीर गुन्हा टळल्याचे सांगण्यात आले. आरोपींविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात आर्म अ‍ॅक्टचे कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यातील कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये अमित साहेबराव तंतरपापळे (वय १९, रा. अशोकनगर) आणि अभिषेक भिमराव खडसे (वय २५, रा. अशोकनगर) यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या पथकाने केली.

## १ व १० वरिल उर्वरित

### अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना

प्रमाणात नुकसान झाले होते. अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर पंचनामे करुन अमरावती, नागपूर, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकण विभागांच्या विभागीय आयुक्तांनी नुकसानीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव राज्य शासनाला सादर केला होता. त्यानुषंगाने मदत निधी शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार ८४ कोटी २३ लक्ष ६५ हजार रुपयांचा निधी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वितरीत करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

थेट बँक खात्यात 'डीबीटी' द्वारे जमा होणार मदत निधी :

शासनाने स्पष्ट केले आहे की, कोणतीही मध्यस्थी किंवा गैरव्यवहार टाळण्यासाठी सर्व बाधित शेतकऱ्यांना ही मदत थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल. शेतकऱ्यांना देण्यात येणारा हा मदतीचा निधी बँकांनी त्यांच्या जुन्या कर्ज खात्यात किंवा इतर कोणत्याही वसुलीसाठी वळता करू नये, अशा कडक सूचना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सर्व बँकांना देण्याचे आदेश शासनाने दिले आहेत.

**पारदर्शकतेसाठी विशेष अटी व शर्ती :** मदत वाटप प्रक्रियेत पारदर्शकता राहावी आणि एकाच शेतकऱ्याला दुबार मदत मिळू नये (द्विरुक्ती टाळण्यासाठी), याची संपूर्ण जबाबदारी संबंधित तहसीलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर सोपवण्यात आली आहे. तसेच, एकदा मदत वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व लाभार्थ्यांची यादी आणि मदतीचा तपशील जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अनिवार्य करण्यात आले आहे. हा मदत निधी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकष आणि दरानुसार मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे हवालदिल झालेल्या बळीराजाला या आर्थिक मदतीमुळे पुढील हंगामासाठी निश्चितच मोठा आधार मिळणार आहे.

### अमरावतीच्या अतिरिक्त

जागा नोटीफाईड करण्यात आली असून यामध्ये विविध उद्योग घटकांवर जागेचे अलॉटमेंट करण्यात आले आहे. त्यातील ४०० हेक्टर जागेवर टेक्स्टाईल पार्क साकारण्यात आला आहे. अजूनही इंडस्ट्रियल नोटीफाईड २६०० हेक्टर जागा उद्योगांसाठी अधिग्रहित झाली नसल्याने त्याठिकाणी नव्या उद्योगांच्या निर्मितीसाठी राज्य सरकारकडे तातडीने ठोस निर्णय घेण्याची गरज असल्याचे मत सुद्धा आ. संजय खोडके यांनी व्यक्त केले. अमरावती विभागात एखादा ऑटोमोबाईल सारखा मोठा प्रकल्प उभारल्यास उद्योग, गुंतवणूक व रोजगार निर्मितीला चालना मिळणार असल्याचे सुद्धा त्यांनी नमूद केले.

**रेमंड व भारत डायनॅमिक्स उद्योगांना शुल्कात सूट-** अमरावतीच्या अतिरिक्त औद्योगिक वसाहतीमधील रेमंड कंपनीला प्लांटसाठी ५०० एकर जागा देण्यात आली असून त्यापैकी केवळ ३८ एकरावर काम सुरू आहे. तसेच ठरल्याप्रमाणे ३ शिफ्टमध्ये काम अद्याप सुरू न झाल्याने ते तातडीने पूर्ण शिफ्टमध्ये काम सुरू करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे,भारत डायनॅमिक्सला ४०० एकर जागा देऊनही तो प्रकल्प अद्याप सुरू झाला नसल्याने स्थानिक विकासाचे उद्दिष्ट साध्य होण्यात अडथळे येत आहेत. या संदर्भातील अडचणी जाणून घेण्यासाठी एखादी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्ट ची समिति स्थापन करणे सुद्धा आवश्यक असल्याचे मत आ.संजय खोडके यांनी व्यक्त केले. यावर मंत्रिमहोदयांनी सांगितले कि, रेमंड प्रकल्प आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेड प्रकल्प यांच्यासमोरील प्रलंबित अडचणी दूर करण्यासाठी अधिवेशन संपल्या नंतर संबंधित दोन्ही कंपन्यांचे एम.डी. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ च्या प्रादेशिक अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेऊन सर्व प्रश्न मार्गी लावण्यात येतील, तसेच औद्योगिक विकासाच्या बाबतीत पश्चिम विदर्भाला अजून काही इन्सेन्टिव्ह देता येईल का ? यासाठी आम्ही एक प्रशासकीय कमेटी करणार असून त्यांना तज्ज्ञ मार्गदर्शन करणारी एक लोकप्रतिनिधींची कमिटी करून त्या कमेटीमध्ये आ. संजय खोडके यांचा समावेश करू. असेही मंत्री ना. उदय सामंत म्हणालेत.

### अंजनगाव सुर्जी येथील 'त्या'

परंतु, सातत्यपूर्ण पाठपुराव्याअभावी आजवर यात अपयश आले होते.शहराचा रखडलेला विकास लक्षात घेता, अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष इंजि. अविनाश गायगोले यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घातले. तर त्यांना महत्वाची साथ आमदार रवी राणा आश्वासन समितीचे अध्यक्ष यांची लाभली.या ३४ एकर जमिनीपैकी परतवाडा रोडच्या पश्चिम बाजूला असलेली आणि पूर्व दिशा लाभलेली १.४ हेक्टर म्हणजेच सुमारे ७ एकर जमीन नगरपरिषदेला हस्तांतरित करण्याची आग्रही मागणी शासनाकडे केली. त्यांच्या या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर राज्य शासनाने याची गंभीर दखल घेतली आहे.महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने जारी केलेल्या अधिकृत पत्रानुसार, या जमिनीच्या हस्तांतरणाबाबत कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील मुख्य इमारत मंत्रालयात बैठक होणार आहे. पूर्वी नियोजित असलेल्या वेळेत बदल करण्यात आला असून, आता ही बैठक १४ जुलै २०२६, मंगळवारी दुपारी ३ वाजता कृषी मंत्र्यांच्या दालन क्र. ३०१ येथे पार पडेल. या बैठकीत ७ एकर जमीन शहराच्या शाश्वत विकासासाठी देण्याबाबत सविस्तर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेतला जाईल. या बैठकीचे गांभीर्य लक्षात घेऊन कृषी आयुक्तालयाचे आयुक्त, संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण), अमरावतीचे विभागीय कृषी सहसंचालक आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना संबंधित सर्व आवश्यक माहिती आणि कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या महत्त्वपूर्ण बैठकीची अधिकृत माहिती पत्राद्वारे अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार रवी राणा, माजी खासदार नवनीत रवी राणा आणि नगराध्यक्ष इंजि. अविनाश गायगोले यांच्यासह सर्व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. या बैठकीत सकारात्मक निर्णय झाल्यास अंजनगाव सुर्जी शहराच्या विकासाला मोठी गती मिळणार आहे.

### भूमिपूजन आज, फलक मार्च

फलक आज लावला. फलकावर तारिख मात्र २० मार्च आहे. हे विशेष सामान्य जनतेच्या माहित होऊ नये म्हणून काम किती रुपयाचे आहे. याचाही उल्लेख या फलकावर केलेला नसल्याने दर्यापूर नगर परिषद आपल्या कामात किती तत्पर आहे. हे सामान्य नागरिकांना दाखवून दिले तर दुसरीकडे दर्यापूर नगर परिषदचे नगरसेवक रामेश्वर तांडेकर हे काही दिवसापूर्वीच मृत्यू पावलेत त्यांच्याही नावाचा उल्लेख या फलकावर आहे.

तर काँग्रेस सोडून शिवसेनेत गेलेले सुधाकर भारसाकळे यांच्या नावाखाली अध्यक्ष दर्यापूर तालुका काँग्रेस असा उल्लेख असल्याने हा विषय पाटील पुन्यात चर्चेचा बनला.

ज्या ठिकाणचे काम नगर परिषदला करायचे आहे. त्या ठिकाणी काम करीत नाही. आठवडी बाजारातील जो रोड खराब आहे. त्या रोडचे काम नगर परिषद करीत नाही. हा रोड चांगला असूनही केवळ कमिशन पोटी या रोडचे भूमिपूजन करण्यात आले.

**-आतिष शिरभाते** -माजी अध्यक्ष, दर्यापूर शहर काँग्रेस कमिटी

### परतवाडा व्हिडिओकांड प्रकरणातील

खान तस्लीम खान,मो. इम्रान मो. साजिद यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.अहफाज खान आणि शेख नावेद यांच्यातर्फे एड. मुस्तफा अली यांनी तर तस्लीम खान आणि मो. इम्रान यांच्यातर्फे एड. नावेद आणि एड. समीर यांनी बाजू मांडली. जुडवा नगरीतील बहुचर्चित अयान प्रकरणात पोलिसांनी काही दिवसांपूर्वीच न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणाची न्यायालयात सुनावणी सुरू असून अंतिम निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच मुख्य आरोपी आयान अहमद याच्या याचिकेवर सुनावणी पूर्ण झाली आहे. न्यायालयाने निर्णय राखीव ठेवला आहे. अचलपुर आणि परतवाडा मध्ये बहुचर्चित आणि संवेदनशील हे प्रकरण आहे.

### अचलपूर शहरातून नागरिकांचे

असलेली अचलपूर नगरपरिषद हद्दीत अचलपूर- परतवाडा जुडवा शहर येतो.मात्र परतवाडा शहरात अचलपूर नगर परिषद कार्यालय ,विविध शासकीय कार्यालय असो महाविद्यालय, शाळा आणि शासकीय रुग्णालय ,कृषी उत्पन्न बाजार समिती ,व्यापार संकुल सह अनेक मूलभूत सुविधा व रस्त्याचे रुंदीकरण ,गार्डन उपलब्ध आहेत .याउलट अचलपूर शहर आजही विविध मूलभूत सुविधांपासून वंचित असून विविध समस्यांचे माहेरघर बनलेला आहेत. यामुळे अचलपूर शहरातील नागरिकांना शासकीय कार्यालय व व्यापार संबंधित व शैक्षणिक कामासाठी परतवाडा शहरात जावे लागते.अचलपूर शहर हा ऐतिहासिक शहर म्हणून प्रसिद्ध आहे .जुनी वस्ती आणि अरुंद रस्ते व मूलभूत सुविधांचा अभाव आजही अचलपूर शहरात अनेक भागात दिसतो. यामुळे गेल्या आठ ते दहा वर्षापासून परतवाडा शहरासह आजूबाजूला असलेल्या देवमाळी ,नारायणपूर ,कांडली ग्रामपंचायत मध्ये नवनवीन लेआउट निर्माण झाले. आणि यामध्ये मोठ्या प्रमाणात अनेकांनी आपले नवीन घर बांधण्यासाठी प्लॉट घेतले होते. यात अचलपूर शहरातील नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. अनेकांनी आपले भव्य दिव्य घर या भागात बांधले आणि अचलपूर शहरातील असलेले जुने घर आज फक्त शोभेची वस्तू बनलेले आहे. या घरात कोणीही राहत नाही. यामुळे परतवाडा शहराचा आजूबाजूला असलेल्या ग्रामपंचायतीमधील नवीन लेआउट मध्ये नागरिकांची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. पण अचलपूर शहरातून अनेक भागातील नागरिकांचे असलेले भव्यदिव्य घर फक्त शोभेची वस्तू बनलेले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे अचलपूर शहरातील अरुंद रस्ते , मूलभूत सुविधांचा अभाव ,साफसफाई चा अभाव आणि अति संवेदनशील तेचा अचलपूर शहरावर असलेला ठपका हे प्रमुख कारण मानले जात आहे अचलपूर शहरातील अनेक भागात आजही अरुंद रस्ते असल्याने चार चाकी वाहन जात नाही. दुचाकी वाहन सुद्धा वाहतूक करताना नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो. आणि अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत आहे .याकडे अचलपूर नगरपरिषद प्रशासनाने कोणती ही ठोस उपाय योजना राबवलेली दिसत नाही .दुसरीकडे पाणीटंचाई, साफसफाईचा अभाव, रस्त्यांची दुरावस्था ,अरुंद रस्ते आणि उद्यान ,मैदानाचा अभाव हे प्रमुख कारण मानले जात आहे .यामुळे परतवाडा शहरासह अनेक ग्रामपंचायती मध्ये नवनवीन लेआउट निर्माण झाले आहे.या लेआऊट मध्ये मोठे रस्ते ,गार्डन ,मैदान आणि मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याने अचलपूर शहरातील अनेक व्यापारी ,शासकीय कर्मचारी,प्रतिष्ठित नागरिकांनि आपआपले भव्य दिव्य घर बांधलेले आहे .याउलट अचलपूर शहरात बोटावर मोजण्याइतके नवीन घराचे बांधकाम करण्यात आले. अचलपूर शहरातील नागरिकांची गर्दी आता परतवाडा शहरासह देवमाळी , नारायणपूर, कांडली, संतोष नगर या भागात प्लॉटमध्ये घर बांधण्यासाठी दिसत आहे. या भागात दीड ते दोन हजार स्क्वेअर फुट प्लॉटची किंमत झालेली आहे .अचलपूर शहरात मात्र प्लॉटची किंमत दिवसेंदिवस घसरत आहे .याचे विविध कारण आहे. याचाच तपास स्थानिक प्रशासन ,जनप्रतिनिधी घेणार का ? आणि अचलपूर शहरात नागरिकांनी आता घर निर्माण करण्यासाठी गर्दी करावी ? यासाठी ठोस उपाय योजना राबवणार काय ? की यापुढेही अचलपूर शहरातील नागरिकांचे स्थलांतरित असेच वाढतच राहणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे .

### अयोध्या राम मंदिरातील कथित दान

यावेळी नेतेमंडळी ,पदाधिकारी व कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या प्रसंगी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी प्रतिक्रिया देताना सर्वांना रामभक्तीचे सर्टिफिकेट वाटणारेच रावण निघाले. असा घणाघात करीत लाखो भाविकांच्या श्रद्धेची लूट' रामभक्तांच्या भावना व श्रद्धेचा गैरफायदा घेणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. हा सत्याग्रह केवळ राजकीय नसून, श्रद्धेच्या रक्षणासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रभू श्रीराम मंदिर हे राष्ट्राच्या एकतेचे प्रतीक आहे. त्यांच्या मंदिरातील देणग्यांचा गैरव्यवहार हा संपूर्ण हिंदू समाजावर घाला घालणारा आहे. पारदर्शक चौकशी होऊन दोषींना शिक्षा व्हावी व भाविकांच्या देणग्या सुरक्षित राहाव्या याकरिता हा सत्याग्रह करण्यात आल्याचं प्रतिपादन डॉ. सुनील देशमुख यांनी केले.यावेळी राममंदिर देणगी चोरी प्रकरणी खऱ्या दोषींना शिक्षा देण्याच्या मागणीच्या प्रचंड घोषणा देण्यात आल्या.

प्रभू श्रीरामाच्या अयोध्या येथील मंदिराच्या बाबत कायम राजकीय फायदा घेण्याच्या प्रयत्नात असलेले भारतीय जनता पक्षाचे सरकार राम भक्तांद्वारे प्रभू श्रीरामाला अर्पण केलेल्या दानपात्रात झालेल्या लुटीवर एक शब्दही बोलायला तयार नाहीत. या देणग्यांच्या लूट प्रकरणात पहिला एफआर दाखल करायला १८ दिवसांचा वेळ लागला. आणि एवढे असूनही या ट्रस्ट मधील जबाबदार असलेले महत्त्वपूर्ण घटक जे की एका विशिष्ट संघटनेच्या प्रभावात आहेत त्यांना याच्यापासून नामनिराळे सोडून छोट्या मोठ्या लोकांवर कारवाईचा फार्स करण्यात आलेला आहे. हे केवळ निषेधार्य नसून हा समस्त देशातील राम भक्तांच्या श्रद्धेवर घातलेला दरोडा आहे. आणि या दरोड्यातील बडे मासे 'मोठा डाका.. मोठी लूट...मोठे मासे ' या स्वरूपाचा असून आता देशभरातील खरे संत सुद्धा विशिष्ट संघटनेच्या लोकांनाच अयोध्या श्रीराम मंदिराच्या ट्रस्टमध्ये समावेश करून हे घडून आणलेले षडयंत्र असल्याची चौफेर टीका करीत आहेत. तसे पाहता या प्रकरणाची सुरुवात वर्ष २०२१ मध्येच झाली. अयोध्येतील अनेक मोक्यावरच्या जमिनी विशिष्ट विचारधारेच्या या ट्रस्टमधील लोकांच्या संगनमताने कवडीमोल भावाने खरेदी करून अवघ्या पाच मिनिटाच्या फरकाने दोन कोटी पाच कोटीच्या जमिनी १८ कोटी ५४ कोटी रुपयांत ट्रस्ट ला खरेदी करून देऊन भाविकांनी दिलेल्या दानाच्या रकमेचा अपहार करण्यात आला. त्यावेळी सुद्धा यावर मोठा गदारोळ झाला होता पण कागदोपत्री पुरावे व तक्रार दिल्यानंतर सुद्धा कोणतीही चौकशी यावर करण्यात आलेली नाही व दोषींना थेट सरकारच्या वरिष्ठ स्तरावरून अभय देण्यात आले. हा जमीन घोटाळाच शेकडो कोटी रुपयांपर्यंत असण्याची दाट शक्यता आहे.

याप्रसंगी प्रामुख्याने माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत,माजी महापौर तथा मनपा विरोधीपक्ष नेते विलास इंगोले,प्रदेश प्रवक्ते दिलीप एडतकर,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर,युवक काँग्रेस अमरावती विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख,अमरावती महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे,नगरसेवक प्रशांत महल्ले,नगरसेविका अनिता जितेंद्र काळे,नगरसेविका लुबना तनवीर मुन्ना नवाब,नगरसेविका राजश्री राजेंद्र जठाळे,पुजारी रामरावजी मैदानकर,निरीक्षक अविनाश पांडे,अमरावती युवक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष नितीन काळे,सुजाता अनिल झाडे,अशोक डोंगरे,सतीश मेटांगे,प्रदीप बनारसे, डॉ.दिनेश गवळी. प्रदीप अरबट,दिनेश मेश्राम,विजय बर्वे,गजानन रडके,सतीश काळे,मंगेश ठाकरे,भैय्यासाहेब निचळ, विजय वानखडे,गजानन जाधव,समीर जवंजाळ,मुकेश गिरी,अरुण रामेकर,गौतम नाईक,मंगेश ठाकरे ,विकी उर्फ मयूर शेवने,गणेश भोरे,राहुल साबळे,सारंग दामोदर,आशिष यादव,कुणाल गावंडे,शुभम बांबल,धनंजय बोबडे,अजय कुबडे,ओम कुबडे,प्रमिला निंभोरकर, सविता काकडे,अस्मिता कठाने,सारिका देशमुख,योगिता झढळे,प्रकाश बहाळे,सुभाष निचीत, विनायकराव देशमुख, सोपानराव इंगोले,पुरुषोत्तमजी बारबुद्धे,रमेशपंत तराळ,श्याम बाबा निचित,ॲड.अचल कोल्हे, वासुदेव केने,गजानन मनोहरे गजानन व्यवहारे,प्रशांत महल्ले, प्रा.अनिल देशमुख,शीतल देशमुख,किरण चांदवडकर, दिनेश जांभूळकर,गजानन वानखडे, प्रफुल इंगोले,सुरेश बंड,मनोहर दुर्गे,नारायण भुसारी,जोगेंद्र तोमर, दिनेश मेश्राम,दिनेश खासणे,चंद्रशेखर भोंगाडे,सागर धानोरकर,सुनील कथलकर, शुभम भुयार,नाना धोटे,करण खेरडे,ओम भाकरे,विनायकराव डिके,श्रीकृष्ण घोंगडे,अरुण डवरे,आयुष रडके,देवेंद्र मुनघाटे,सारंग दामोदर,शशिकांत महाले,तुराब पटेल प्रामुख्याने उपस्थित होते.

### आ. प्रताप अडसड यांनी स्वीकारला

निवेदिता चौधरी ,आ. राजेश वानखडे ,आमदार चंदू यावलीकर ,जिल्हा प्रभारी अविनाश देव ,विदर्भ संयोजक दिनेश सूर्यवंशी यांनी आपले मनोगत व्यक्त करून नवनियुक्त भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार प्रताप अडसड यांना शुभेच्छा दिल्या.

**कार्यकर्त्यांना पाठबळ देणार -** भाजपात सर्वात प्रथम राष्ट्र, समाज नंतर आपण आहोत. भाजप पक्ष हा कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळे उभा आहे. भाजपा कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य माणसाची कामे करावी. त्यांच्या अडचणी आपणा पर्यंत आणाव्यात ते सोडविण्याचे काम आपले आहे. आपण भाजपा कार्यकर्त्यांना पाठबळ देणार असल्याचे यावेळी नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आमदार प्रताप अडसड म्हणाले.

यावेळी जिल्ह्यातील मंडळ अध्यक्ष , शक्ती प्रमुख, बूथ प्रमुख नगराध्यक्ष तसेच नगरसेवक, भाजपाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते. संचालन भाजपा जिल्हा सरचिटणीस सुमित पवार तर आभार शंतनु देशमुख यांनी मानले. ढोल ताशाच्या गजरात आमदार प्रताप अडसड यांचे स्वागत करण्यात आले. तर जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांनी त्यांना पुष्पगुच्छ देत शुभेच्छा दिल्यात.

### तिवसा नगरपंचायतमध्ये भव्य

रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.या निधीतून प्रभाग क्रमांक १६ मधील खुल्या जागेवर भव्य इनडोअर स्टेडियम उभारले जाणार आहे. यात कबड्डी,बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस इत्यादी इनडोअर खेळांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. स्थानिक खेळाडूंना उच्च दर्जाच्या क्रीडा सुविधा मिळाल्याने तिवसा परिसरातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळेल

**दीड वर्षात १६ कोटींचा निधी मंजूर-** आमदार राजेश वानखडे यांच्या प्रयत्नांमुळे दीड वर्षाच्या कालावधीत तिवसा नगरपंचायतसाठी लक्षणीय निधी मंजूर करण्यात त्यांना यश मिळाले आहे. इनडोअर स्टेडियमसाठी ४ कोटी, मूलभूत सुविधांच्या विकासासाठी ५ कोटी,विशिष्टयपूर्ण योजनाच्या क्रियान्वयनाकरिता व अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी २ कोटी अशा एकूण १६ कोटी रुपयांचा निधी नगर विकास विभागामार्फत मंजूर करण्यात आला आहे. आमदार राजेश वानखडे म्हणाले, 'खेळांचा विकास हा माझा प्राधान्यक्रम आहे. तिवसा नगरपंचायत क्षेत्रातील नागरिकांना मूलभूत सुविधांसह दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहिलो आहे. हे इनडोअर स्टेडियम भव्य व उत्कृष्ट दर्जाचे होईल यासाठी मी कटिबद्ध आहे.' त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे जाहीर आभार व्यक्त केले.नगर पंचायत तिवसा परिसरात इनडोअर स्टेडियम उभारल्याने स्थानिक खेळाडूंना वर्षभर सरावाची सोय होणार आहे. सध्या उपलब्ध असलेल्या मर्यादित सुविधांमुळे अनेक खेळाडूंना अडचणी येत होत्या. नवीन स्टेडियममुळे कबड्डी, बॅडमिंटनसह इतर खेळांमध्ये प्रावीण्य मिळवणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन मिळेल व राज्य व राष्ट्रीय स्तरावर चांगले प्रदर्शन करता येईल.आमदार राजेश वानखडे यांनी तिवसा नगरपंचायत क्षेत्रातील सर्व विकास कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही दिली. 'नागरिकांना कोणत्याही सुविधेची कमतरता भासू देणार नाही,' असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

### फुलसावंगी येथे खुलेआम मटकाचा

'विजेच्या वेगाने' पसरत चाललेल्या या अवैध धंद्यांमुळे दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. मात्र, कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेले पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप स्थानिक सुजाण नागरिकांकडून केला जात आहे.बाजारपेठेचे मुख्य केंद्र असल्याने गावात दररोज मोठी आर्थिक उलाढाल होते. याचाच गैरफायदा घेत मटका चालकांनी आपले जाळे भक्कम केले आहे. मटक्याच्या या व्यसनामुळे अनेक गरिबांचे संसार उघड्यावर आले असून, तरुण वर्गही या दलदलीत अडकत चालला आहे. पोलीस चौकीच्या हाकेच्या अंतरावर २५-३० काउंटर खुलेआम चालतातच कसे? प्रशासनाचा मटका बहाद्दरांना छुपा पाठिंबा आहे का? स्थानिक पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने आता जिल्हा पोलीस प्रमुखांनीच या प्रकरणात थेट लक्ष घालावे,अशी मागणी जोर धरू लागली आहे. फुलसावंगी येथील हे अवैध मटका काउंटर तात्काळ उद्ध्वस्त करून संबंधित चालकांवर आणि त्यांना पाठबळ देणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

### तहसील कार्यालयाच्या आवारातील

यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट)च्या वतीने चांदूर रेल्वेचे उपविभागीय अधिकारी यांना शुक्रवारी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गणेश रॉय, तालुकाध्यक्ष विनोद काळमेघ, शहराध्यक्ष पांडुरंग डोंगरे, शहर उपाध्यक्ष सुरेश इमले, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष मोहम्मद समीर जानवानी, बंडू भैसे, अतुल मेटे, महिला तालुकाध्यक्ष माधुरी देशमुख, महिला शहराध्यक्ष नीलिमा शिरभाते, रेखा मोरे तसेच शहरवासी राजू वडतकर, मारोती डोंगरे, अशोक सोमकुंवर, प्रकाश कदम, शेख हसन, लक्ष्मण दर्येकर, मारोतराव गिरासे, मोहन रॉय, कमलकिशोर पनपालिया आदी पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

### राज्यावर मान्सून पुन्हा

ऊन्हाचा चटका वाढण्याची शक्यता

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईत जूनमध्ये पावसाने ओढ दिल्यानंतर जुलै महिन्याच्या पहिल्या पाच दिवसांतच पावसाने दमदार हजेरी लावली आहे. जुलै महिन्याच्या ३१ दिवसांत मिळून पडणा-या पावसाच्या सरासरीहून अधिक पाउस अवघ्या पाच दिवसांत पडला आहे. अल निनोच्या प्रभावामुळे मान्सून एकाच दमात पडण्याऐवजी तुकड्या-तुकड्यांमध्ये पडतो. म्हणजे काही दिवस अतिवृष्टी होते आणि त्यानंतर सलग अनेक दिवस कडक उन किंवा कोरडा दुष्काळ पडतो. जुलैच्या उत्तरार्धात म्हणजेच शेवटच्या आठवड्यात मान्सूनचा दुसरा सक्रिय टप्पा येण्याची आशा असली, तरी तोपर्यंत शेतक-यांना आभाळाकडे डोळे लावून बसावे लागणार आहे.

### नागपुरात हायप्रोफाइल सेक्स

रात्री १०:४८ वाजता आरोपी सचिन महाजन एमएच ३१/ एफसी ९१३० क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायरमध्ये रशियन (उझबेकिस्तान) सेक्स वर्करला घेउन आला. त्याचवेळी एसएसबीच्या पथकाने आरोपी सचिनला जेरबंद केले.

वेश्या व्यवसाय करणा-या महिलेने आपण उझबेकिस्तानची असून, समीर उर्फ मनीष उर्फ गगन ठाकूर याच्या सांगण्यावरून वेश्या व्यवसायासाठी येथे आल्याची कबुली दिली. अन्य दोन महिलांसह आपण ह?टेल पेटल इनमध्ये राहत असल्याचेही तिने सांगितले. त्यावरून पोलिसांनी तेथे आणि नंतर धंतोलीतील एका ह?टेलमध्ये छापा टाकून आणखी चार सेक्स वर्करना ताब्यात घेतले. दरम्यान, ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी महिलेकडून ८ हजार रुपये, मोबाइल, आरोपी सचिनकडून स्विफ्ट कार, असा सव्वापाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अंबाझरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या दोन सेक्स वर्कर उझबेकिस्तानच्या, तर एक दिल्ली, दुसरी पंजाब आणि तिसरी कोलकाता येथील आहे. या पाचही जणी गेल्या आठवड्यात वेश्या व्यवसाय करण्यासाठी नागपुरात आल्या. आरोपी देश-विदेशातील महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करीत होते. एका ग्राहकाकडून १५ हजार रुपये घेत होते.

### तेलंगणात एका रात्रीत

तुरुंगात राहिल्यानंतर त्याला न्यायालयाने जामीन मंजूर केला. मात्र, जामिनावर सुटल्यानंतरही आरोपीच्या मनातील सूडाची भावना कायम असल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

### भाजपाने माझ्या आमदाराला

हे आम्हाला कसे कळणार? ती योग्य वेळ आणण्यासाठी माझ्या सहकाऱ्यांना आणि मला काय करावे लागेल?' असे अब्दुल्ला म्हणाले. अब्दुल्ला म्हणाले की, माझे सरकार स्थापन झाल्यानंतर मी सुरुवातीला केंद्राला दिलेली आ□ासने पूर्ण करण्यासाठी वेळ दिला होता, परंतु वस्तुस्थिती अशी आहे की 'त्यांना जैसे थे परिस्थिती कायम ठेवायची आहे', असा आरोप त्यांनी केला.

### मी २५ वर्षांपूर्वीची मफलर

तेव्हा न्यूझीलंड नाचत होता. त्या दिवशी आम्हाला अभिमान वाटला. येथील स्पेस कंपन्यांनी अनेकदा आमच्यासोबत मिळून काम केले आहे. हजारो किमीचे अंतर, पण मनात हिंदुस्तानः हजारो किमी दूर राहत असतानाही तुमच्या मनाच्या एखाद्या कोप-यात कुठेतरी हिंदुस्तान वसलेलाच असतो. शरीर इथे असेल, मन भारतात असेल. म्हणून तुम्ही भारताच्या प्रत्येक यशावरही लक्ष ठेवता. देशाची लोकसंख्या नाही, जनकल्याणाची भावना महत्त्वाचीः आमच्यासाठी समोरच्या देशाची लोकसंख्या नाही, तर जनकल्याणाची भावना महत्त्वाची आहे. आणि म्हणूनच आम्ही न्यूझीलंडकडूनही खूप काही शिकलो आहोत आणि अजूनही शिकत आहोत.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, १२ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# पावसाळी अधिवेशनात बच्चू कडूंचा जनतेच्या प्रश्नांवर सरकारला जाब

## शेतकरी, बेरोजगारी, शिक्षणासह नऊ मुद्द्यांवर लक्षवेधी मांडणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्याच्या पावसाळी अधिवेशनात प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा आमदार बच्चू कडू यांनी राज्यातील शेतकरी, विद्यार्थी, बेरोजगार, दिव्यांग, महिला, कामगार आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडत सरकारला थेट जाब विचारला. शेतकरी कर्जमाफीपासून रोजगारनिर्मितीपर्यंत आणि सिंचनापासून सामाजिक सुरक्षा योजनांपर्यंत विविध विषय सभागृहात मांडत त्यांनी सरकारकडून ठोस निर्णयांची अपेक्षा व्यक्त केली.*

कर्जमाफीच्या मुद्द्यावर बोलताना बच्चू कडू यांनी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही न्याय मिळाला पाहिजे, अशी भूमिका मांडली. वेळेवर कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर आर्थिक लाभाचे धोरण सरकारने जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी केली.

शेतीमालाच्या हमीभावाचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी कापूस, सोयाबीन, तूर आणि दूध उत्पादकांना उत्पादन खर्चावर आधारित योग्य दर मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. किमान आधारभूत किंमत (एमएसपी) प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांचे उत्पन्न सुरक्षित करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.खत, बियाणे आणि कीटकनाशकांच्या वाढत्या किमतींमुळे शेतीचा खर्च वाढत असल्याचे नमूद करत कृषी निविष्ठांवरील अनुदान वाढविण्याची मागणी त्यांनी केली. वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत असल्याचे त्यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिले.

शिक्षण क्षेत्रातील खासगीकरणाचा मुद्दा उपस्थित करत सरकारी शाळा अधिक सक्षम करण्याची तसेच रिक्त शिक्षक पदे तातडीने भरण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी सरकारी शिक्षण व्यवस्थेला बळकटी देण्याची गरज त्यांनी मांडली.

राज्यातील रिक्त सरकारी पदांमुळे बेरोजगारी वाढत असल्याचे सांगत युवकांना पारदर्शक पद्धतीने रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. भरती प्रक्रिया गतीमान करण्यासाठी सरकारने स्पष्ट कृती आराखडा जाहीर करावा, असेही त्यांनी नमूद केले.



ग्रामीण भागातील पाणीपुरवठा आणि सिंचनाच्या रखडलेल्या योजनांवरही त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. अपूर्ण प्रकल्पांमुळे शेतकरी आणि ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने हे प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करावेत, अशी मागणी त्यांनी केली. दिव्यांग, महिला, निराधार आणि अनाथांसाठीच्या सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी निधी वाढवून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

असंघटित आणि कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर बोलताना किमान वेतन कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी त्यांनी केली. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.ग्रामीण रस्ते, आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी आणि इतर मूलभूत सुविधांसाठी जिल्हानिहाय विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करत त्यांनी ग्रामीण विकासाला अधिक प्राधान्य देण्याचे आवाहन केले.अधिवेशनात मांडलेले हे प्रश्न राज्यातील विविध घटकांच्या दैनंदिन आयुष्याशी संबंधित असून, त्यावर सरकार कोणते ठोस निर्णय घेते, याकडे शेतकरी, युवक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# औद्योगिक विकासासह हरित विकासाची गरज

## अकोला एमआयडीसीत वृक्षारोपण अभियान



### एमआयडीसी प्लॉट ऑनर्स असोसिएशनचा अभिनव उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

पर्यावरण संरक्षणाला चालना देत औद्योगिक क्षेत्र अधिक हरित करण्याच्या उद्देशाने एमआयडीसी प्लॉट ओनर्स असोसिएशनच्या वतीने अकोला औद्योगिक वसाहतीत वृक्षारोपण अभियान उत्साहात पार पडले. उद्योग क्षेत्रातील पदाधिकारी, उद्योजक आणि विविध औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभागी होत पर्यावरण संवर्धनाचा सामूहिक संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाला एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र जाधव, क्षेत्र व्यवस्थापक महेंद्र खोड, फेडरेशन ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री असोसिएशनचे चेअरमन सुरेश काबरा तसेच सचिव विमल जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. औद्योगिक प्रगतीबरोबरच हरित विकासाला समान महत्त्व देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी वाढत्या औद्योगिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक उद्योग, संस्था आणि नागरिकाने वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. केवळ वृक्ष लावणे पुरेसे नसून त्यांचे संगोपन आणि नियमित देखभाल केल्यासच पर्यावरण संरक्षणाचा उद्देश साध्य होऊ शकतो, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

या अभियानात एमआयडीसी प्लॉट ओनर्स असोसिएशनचे आनंद लोखंडे, दिनेश फाटे, इंद्रराज छतवाल, शैलेंद्र भूतडा तसेच अकोला इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, नितीन बियाणी यांच्यासह विविध औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी आणि उद्योजक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी स्वतः वृक्षारोपण करत अधिकाधिक वृक्ष लागवड आणि पर्यावरण संरक्षणासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**मालेगाव :** येथील तहसील कार्यालया जवळील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या द्वारे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत दरवर्षी प्रमाणे याही वर्षी निकालाची परंपरा कायम राखत गौरवित यश संपादन केले. या परीक्षेमध्ये शाळेतील इयत्ता पाचवी मधील ५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यापैकी मेरिट नुसार सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले. त्यामध्ये कु.समृद्धी घुगे, अश्विनी दुधडमल, अश्विनी धोटे,धनश्री भालेराव, राशी खंदारे, आरोही खाडे या सर्व विद्यार्थिनींना शासनाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती मानधनास हे पात्र झाले आहेत.या विद्यार्थ्यांना हे यश शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांच्या मार्गदर्शनात व परीक्षा विभाग प्रमुख अनिलकुमार सरकटे यांच्या सहकार्याने संपादन केले.

# हिवरखेड रेल्वे स्थानकावर मालधक्का उभारण्याची मागणी

## हिवरखेड विचार मंच व व्यापारी बांधवांचे खासदार अनुप धोत्रे यांना निवेदन

### शेतकरी, व्यापारी व रोजगाराला मिळणार चालना

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

अकोला-खंडवा नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गावरील नव्याने उभारण्यात येत असलेल्या हिवरखेड रेल्वे स्थानकावर मालधक्क्याची सुविधा निर्माण करण्यात यावी, तसेच या स्थानकाला 'हिवरखेड रेल्वे स्टेशन' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी हिवरखेड विचार मंच व व्यापारी बांधवांनी खासदार अनुप धोत्रे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अकोला-खंडवा ब्रॉडगेज रेल्वे मार्गाचे काम सध्या प्रगतीपथावर असून या मार्गामुळे हिवरखेड व परिसराला मुख्य रेल्वे नेटवर्कशी थेट जोडणी मिळणार आहे. या मार्गावरील हिवरखेड येथे नवीन रेल्वे स्थानकाची उभारणी सुरू असल्याने स्थानिक नागरिकांनी विविध सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हिवरखेड ही परिसरातील प्रमुख व्यापारी बाजारपेठ असून अनेक गावांचा व्यापार या शहरावर अवलंबून आहे. परिसरात केळीसह विविध फळपिके व शेतीमालाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत



असून हा माल राज्यासह परराज्यात पाठविला जातो. रेल्वे स्थानकावर मालधक्का उपलब्ध झाल्यास कृषी मालाची वाहतूक अधिक सुलभ होईल, व्यापाऱ्यांचा खर्च कमी होईल आणि स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील. त्यामुळे रेल्वे स्थानकावर सुरुवातीपासूनच मालधक्क्याची सुविधा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर हिवरखेड विचार मंचचे संदीप इंगळे, अनिल कराळे, राजेश वानखडे, दीपक रायबोले, बजरंग तिडके, तुषार गावंडे, जितेश कारिया, अर्जुन खिरोडकर, सूरज चौबे, अरुण रहाणे, बाळासाहेब नेरकर, केशव कोरडे तसेच व्यापारी आनंद बोहरा, प्रवीण येऊल, मुन्ना माधानी, पंकज अग्रवाल, धिरज बजाज, अजय मालपाणी यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

'अकोला-खंडवा नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग हा विदर्भाच्या विकासासाठी महत्त्वाचा प्रकल्प आहे. या मार्गाच्या दुहेरीकरण आणि विद्युतीकरणासाठीही केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. हिवरखेड रेल्वे स्थानकावर मालधक्क्याची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी रेल्वे मंत्रालय आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे निश्चितपणे पाठपुरावा करणार असून स्थानिकांची मागणी पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहू.'

**खासदार अनुप धोत्रे,**
अकोला लोकसभा मतदारसंघ

# रिसोड-मालेगाव तालुक्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधींनी सहकार क्षेत्रात स्वाहा:कार केला – सुभाष देवढे पाटील यांचे टीकास्त्र

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मागील अनेक वर्षापासून गैरव्यवहाराची श्रृंखला सुरू आहे.या गैरव्यवहारातून आजी—माजी सभापती ,त्यांचे पाठीराखे पुढारी आणि सहकार विभागातील अधिकारी करोडपती झाल्याचे वास्तव आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात सावनेरचे आमदार आशीष देशमुख यांनी रिसोड बाजार समितीच्या आवारात असलेल्या ११ भूखंडाच्या बेकायदेशिर भाडेपट्टा कराराबाबत तारांकीत प्रश्न उपस्थित केला. विधानसभेच्या सभागृहात हा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने 'त्या ११ भूखंडाचा भाडेपट्टा रद्द करण्यात आला आहे. रिसोड व मालेगाव तालुक्यातील सहकार क्षेत्राची वाट लावण्यासाठी या दोन्ही तालुक्यातील आजी—माजी लोकप्रतिनिधीच जबाबदार असल्याचे टीकास्त्र सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी सोडल्याने दोन्ही तालुक्यातील सहकारातून स्वाहा:कार करणा—या कथित पुढा—यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची सर्वत्र चर्चा आहे.

रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या असलेल्या रिसोड येथील गट क्रमांक १०/६ मधील विकास आराखड्याला पुणे येथील पणन संचालनालयाने २९ मे २०१९ रोजी मंजुरी दिली होती. ही मंजुरी देताना त्या विकास आराखड्याला स्थानिक सक्षम प्राधिकरण म्हणजेच रिसोड नगर परिषदेची अंतिम मंजुरी घेणे कायदेशिररित्या बंधनकारक होते.परंतु,रिसोड बाजार समितीने 'या' अटीला स्वत:च्या स्वार्थापोटी दुर्लक्षीत केले.तसेच कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची व पुणे येथील पणन संचालकांची पुर्व परवानगी न घेता विकास आराखड्यामध्ये परस्पर व बेकायदेशिर बदल केलेत.हा गंभीर प्रकार मे २०२६ मध्ये शासनाच्या निदर्शनास आला.या नियमबाह्य व बेकारदेशिर प्रकरणाची तात्काळ चौकशी करण्याचे आदेश नांदगाव खंडेश्वर येथील सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या चौकशी समितीला वरिष्ठांनी दिले होते.या समितीने सखोल तपास करून २५ मे २०२६ रोजी शासनाला अहवाल सादर केला.या अहवालात रिसोड बाजार समितीने अटीचे उल्लंघन केल्याचे सिद्ध झाले.या अहवालाच्या अनुषंगाने पणन मंत्र्याच्या वतीने ना.जयकुमार रावल यांनी विधानसभेत आमदार आशीष देशमुख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पणन संचालनालयाने ११ जून २०२६ रोजीच्या आदेशान्वये रिसोड बाजार समितीने १५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या सभेत मंजुर केलेला वादग्रस्त ठराव क्रमांक ५ (१) पुर्णपणे रद्दबातल केला आहे.शासनाने फक्त हा ठराव रद्द करून न थांबता रिसोड बाजार समितीच्या मुख्य आवारामधील सर्व्हे नंबर १०/२ मधील भूखंड आणि सर्व्हे नंबर १०/६ मधील भूखंड अशा एकूण ११ भूखंडाबाबत करण्यात आलेले भाडेपट्टा करारनामे तात्काळ रद्द करण्याची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.तसेच, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी या ११ भूखंडाना भाडेपट्याने देण्याबाबत जी मूळ मान्यता देण्यात आली होती, ती मान्यताही पणन संचालनालयाने ११ जून २०२६ च्या पत्राद्वारे अधिकृतपणे रद्द केली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य पाहता, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाचे अवर सचिव माधव शिंदे यांनी २३ जून २०२६ रोजी पत्र पाठवून पणन विभागाचे कार्यकारी संचालक आणि पणन संचालक,पुणे यांना तात्काळ या तारांकीत प्रश्नाबाबतचा भागनिहाय वस्तुस्थिती दर्शक उत्तर आणि अनुषंगिक सुस्पष्ट माहिती दोन दिवसात सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# एम. बी. आश्रम परिसरातील पाणीटंचाईचा संताप अनावर

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील एम. बी. आश्रम परिसरातील नागरिकांना गेल्या दोन महिन्यांपासून अपुऱ्या व अनियमित पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दि. १० जुलै २०२६ रोजी तर या परिसरातील पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता. त्याआधीच्या शुक्रवारी अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा झाला होता, तर सोमवार आणि बुधवार या दिवशी नळाला पाणीच आले नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

वारंवार होणाऱ्या या त्रासामुळे संतप्त झालेल्या पाणीधारक ग्राहकांनी शुक्रवारी दुपारी ४.०० वाजता तक्रार नोंदविण्यासाठी जीवन प्राधिकरण कार्यालय, कारंजा येथे धाव घेतली. मात्र, नागरिकांच्या म्हणण्यानुसार त्या वेळी कार्यालयात एकही अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नव्हता. कार्यालयातील सर्व खुर्च्या रिकाम्या असल्याचे दिसून आले, तर दुसरीकडे लाईट व पंखे मात्र सुरू असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले. 'पाणी नाही, अधिकारी नाहीत आणि नागरिकांच्या समस्यांकडे कोणीच लक्ष देत नाही,' अशी संतप्त प्रतिक्रिया उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधेबाबत प्रशासनाची ही उदासीनता गंभीर असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

सदर घटनेचा व्हिडीओही नागरिकांनी तयार केला असून, तो संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. वारंवार होणाऱ्या पाणीटंचाईची समस्या तातडीने सोडवून नियमित व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात यावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.


### जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. वासुदेव ज्ञानदेव शेगावकार रा. गोरेगाव बु ता. जि. अकोला यांनी खालील वर्णनाची मालमत्ता जना स्मॉल फायनान्स बँक लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे ग्रा. पं. गोरेगाव बु. ता. जि. अकोला च्या हद्दीतील मालमत्ता क्र. ६५८ व ६५९ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ८३.६१चौ.मी. असून ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : सुनील शेगावकर, पश्चिमेस : वासुदेव ज्ञा. शेगावकर, ऊत्तरेस : रस्ता व दक्षिणेस : गजानन शेगावकर

येणे प्रमाणे वरील मालमता हि श्री. वासुदेव ज्ञानदेव शेगावकार ह्यांना वडिलोपार्जित मिळालेली असून गावठाण हद्दीतील आहे. श्री. वासुदेव ज्ञानदेव शेगावकार हे वरील मालमत्ता विजया वासुदेव शेगावकार यांना बक्षिस देऊन सदर मालमत्ता जना स्मॉल फायनान्स बँक लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, आक्षेप अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन जना स्मॉल फायनान्स बँक लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ११/०७/२०२६

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०१४/२०२६ — प्रोसेस नं.८६१०/२०२६
चौ.ता. १७/०८/२०२६ — दिनांक : ०९/०७/२०२६

**अर्जदार :** १. सुरेंद्र हरी रेंगे २. श्याम सुरेंद्र रेंगे दोघेही रा. निराट, ता. जि. अकोला. ३. सौ. रेखा अरूण सरप रा. तळोकार पुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : द्रोपदाबाई सुरेंद्र रेंगे
**पत्ता :-** रा. निराट, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत द्रोपदाबाई सुरेंद्र रेंगे यांचे दि. १०/०२/२०२६ रोजी सियाराम नगर, पोपटखेड रोड, अकोट, जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर सुचना

ज्याअर्थी सर्वत्र लोकांना हया जाहीर सुचनेद्वारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार १) श्रीमती मिनाक्षी विनोद काळे, रा. गजानन नगर, पावसाळे ले-आउट कौलखेड, अकोला ता. जि. अकोला, २) वैशाली हनुमंत आगरकर, रा. श्रीराम विद्यालया जवळ, खेतान नगर कौलखेड, अकोला ता. जि. अकोला यांनी १) विनायक महादेव झटाले, रा. गायगांव, ता. बाळापुर, जि. अकोला, २) बाळकृष्ण महादेव झटाले, रा. गायगांव, ता. बाळापुर, जि. अकोला, हयांच्या सोबत त्यांच्या मालकी व प्रत्यक्ष ताब्यातील खालील वर्णनाच्या मालमत्तेचा सौदा कायम केला आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :** मौजे गायगांव ता. बाळापुर जि. अकोला ग्रा.पं. गायगांव चे हददीतील शेत जमीन

अ.क्रं., मौजे, गट नं, क्षेत्रफळ, आकार, हिस्सा, भो-वर्ग, पो.ख.
१ गायगांव ४८६ २.०० हे. ०० आर ८.७२ पुर्ण १ ० हे १३ आर
१ गायगांव ४८६ २.०० हे. ०१ आर ८.७७ पुर्ण १ ० हे ०० आर

२.००.०० हे पुर्ण शेत जमीन व त्यात येणारे सर्व प्रकारचे झाडा झुडपासह आमचे पक्षकारास विकण्याचा सौदा कायम केला आहे.

**विनायक महादेव झटाले यांच्या शेताच्या चतुः सिमा :** पुर्वेस :- वसंतराव आगरकर यांचे शेत, पश्चिम :- राजेश साठे यांचे शेत, उत्तरेस :- बाळकृष्ण महादेव झटाले यांचे शेत, दक्षिण :- बेबी बंड यांचे शेत. २.०१०० हे आर पुर्ण शेत जमीन जमीन व त्यात येणारे सर्व प्रकारचे झाडा झुडपासह आमचे पक्षकारास विकण्याचा सौदा कायम केला आहे.

**बाळकृष्ण महादेव झटाले यांच्या शेताच्या चतुः सिमा :** पुर्वेस :- वसंतराव आगरकर यांचे शेत, पश्चिम :- संतोष झटाले यांचे शेत, उत्तरेस :-विनायक महादेव झटाले यांचे शेत, दक्षिण :- शिवदांड. त्याअर्थी वरील वर्णनाच्या मालमत्ते संबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, मालकी, ताबा. हितसंबंध, गहाण, वारसाहक्क, तसेच इतर कोणत्याही प्रकारची तकार असल्यास ही सुचना प्रसीध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्या सह लेखी हरकत नोंदवावी. जर मुदतीत हरकत नोंदवीली नाही, तर आमचे पक्षकार वरील वर्णनाच्या मालमत्तेची ठरल्यानुसार खरेदीखत नोंदणीकृत करुन घेतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, उजर चालनार नाही. याची नोंद घ्यावी.

अकोला
दि. ११-०७-२०२६

**Adv. Rajesh R. Karale**
B.Com, LL.B.
Regd. No. MAH/2561/2000
Indira Colony, Dabki Road, AKOLA

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०१२/२०२६ — प्रोसेस नं.८३६१/२०२६
चौ.ता. १७/०८/२०२६ — दिनांक : ०४/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती तुळसा एकनाथ बरगे २. दीपक एकनाथ बरगे क्र. १ व २ रा. संतोष नगर, गुरूकुल नगरी, बालाजी प्रोव्हिजन जवळ, अकोला. ता. जि अकोला. ३. ज्योती अंबादास भोसले रा. तानाजी व्यायाम शाळा, शिवाजी नगर, खामगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा. ४. सीता संतोष मांडवे रा. मोठी विहीर देशमुख फैल, अकोला. ता. जि. अकोला. ५. गीता संजय सराफ रा. राधे श्याम किराणा शॉप जवळ, डाबकी रोड, रेणुका नगर, अकोला. ता. जि. अकोला. ६. रितु मनोज बारस्कर रा. खामगाव रोड, शिवाजी नगर, वार्ड नं. ३, नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : एकनाथ रंगनाथ बरगे
**पत्ता :-** रा.संतोष नगर, गुरूकुल नगरी, बालाजी प्रोव्हिजन जवळ, अकोला. ता. जि अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत एकनाथ रंगनाथ बरगे यांचे दि. १९/०३/२००६ रोजी मानकर क्रिटीकेल केअर हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०१३/२०२६ — प्रोसेस नं.८३६५/२०२६
चौ.ता. १७/०८/२०२६ — दिनांक : ०४/०७/२०२६

**अर्जदार :** १. संजय सुखदेव वानखडे रा. मु. गोपालखेड, पोस्ट गांधीग्राम, ता. जि. अकोला. २. नंदा लक्ष्मण मेसरे रा. मु. पो. सुकोडा, ता. जि. अकोला. ३. संगिता गजानन मेसरे रा. मु. पो. पंढरी, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती. ४. मंगला संजय कवनपुरे रा. मु. पो. वडगाव फतेपूर, सुर्जी, जि. अमरावती. ता. परतवाडा, जि. अमरावती. ५. सावित्री राजेश सत्रोटे रा. अंजनगाव सुर्जी, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुखदेव संपत वानखडे २. मनकर्णाबाई सुखदेव वानखडे
**पत्ता :-** रा. मु. गोपालखेड, पोस्ट गांधीग्राम, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुखदेव संपत वानखडे यांचे दि. २०/०१/२०२६ रोजी गोपालखेड, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत मनकर्णाबाई सुखदेव वानखडे यांचे दि. २२/०१/२०११ रोजी जे. जे. हॉस्पिटल, मुंबई येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २१४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २२५ ■ रविवार, १२ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# वर्धा पोलिसांचा एकाच वेळी चार ठिकाणी धडाका, देहव्यापाराचे जाळे उघड

## चार पीडित महिलांची सुटका, सात आरोपींवर गुन्हे, सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहर आणि पवनार परिसरात सुरू असलेल्या देहव्यापाराच्या अड्ड्यांवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष तथा स्थानिक गुन्हे शाखेने शुक्रवारी समन्वित कारवाई करत मोठा प्रहार केला. या कारवाईत चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून सात आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींकडून एक लाख २५ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे बनावट ग्राहक तयार करून पवनार येथील मंगलम लॉजवर छापा टाकण्यात आला. तेथे लॉज व्यवस्थापक मुरली पुंडलीकराव पुसतोडे आणि सुमीत गणेश सोडिया हे आर्थिक फायद्यासाठी महिलांना पैशाचे आमिष दाखवून देहव्यापार करण्यास भाग पाडत असल्याचे उघड झाले.

छाप्यात एका पीडित महिलेसह बनावट ग्राहक आढळून आला. चौकशीत महिलेला पैशाचे आमिष दाखवून देहव्यापारासाठी आणल्याची माहिती समोर आली. आरोपी ग्राहकांशी संपर्क साधणे तसेच लॉजच्या परिसरावर लक्ष ठेवण्याचे कामही करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

या कारवाईत तीन अँड्रॉइड मोबाईल. रोख चार हजार ८७० रुपये तसेच देहव्यापारासाठी वापरले जाणारे साहित्य असा ३४ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी सेवाग्राम पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

याचवेळी वर्धा शहरातील सावंगी मेघे. नखाते लेआउट वैष्णवी कॉम्प्लेक्स कारला रोड. भामटीपुरा येथील पवन लॉज या ठिकाणीही धाड टाकण्यात आली. या कारवाईत आणखी आरोपींना ताब्यात घेण्यात आले. एकूण सात आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून चार पीडित महिलांची सुटका करून त्यांना महिला सुधारगृहात पाठविण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल. अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी. सहाय्यक पोलीस निरीक्षक माधुरी वाघाडे. पोलीस उपनिरीक्षक गीतांजली गारगोटे. दिशा ताजने तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

दरम्यान जिल्ह्यात कुठेही अवैधरित्या देहव्यापार सुरू असल्याची माहिती नागरिकांनी तातडीने पोलीस विभागाला द्यावी असे आवाहन पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी केले आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांविरोधात कठोर कारवाईची मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

# वाघांच्या डरकाळीने बोरची तिजोरी भरली

## जंगल पर्यटनातून तब्बल ६२ लाखांचा महसूल, १७ हजारांहून अधिक पर्यटकांची बोरला पसंती

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील बोर व्याघ्र प्रकल्प राज्यातील वेगाने लोकप्रिय होत असलेल्या जंगल पर्यटन केंद्रांपैकी एक ठरत आहे. पट्टेदार वाघांचे दर्शन. समृद्ध जैवविविधता आणि रोमांचकारी जंगल सफारीमुळे यंदा ३० जूनपर्यंत तब्बल १७ हजारांहून अधिक पर्यटकांनी बोर व्याघ्र प्रकल्पाला भेट दिली. या पर्यटनातून प्रकल्प प्रशासनाच्या तिजोरीत तब्बल ६२ लाख रुपयांचा महसूल जमा झाला असून बोर व्याघ्र प्रकल्पाने जंगल पर्यटनात नवा विक्रम नोंदविला आहे.




सेलू तालुक्यातील बोर व्याघ्र प्रकल्पाचे १३ हजार ८०० हेक्टर कोअर आणि ६७ हजार ८१४ हेक्टरपेक्षा अधिक बफर क्षेत्र जैवविविधतेने समृद्ध आहे. विशेष सर्वेक्षणात येथे १३१ प्रजातींच्या आरोही वनस्पतींची नोंद झाली आहे. त्याचबरोबर पट्टेदार वाघ. बिबट. अस्वल. सांबर. चितळ. रानडुक्कर आणि विविध वन्यजीवांच्या मुक्त वावरामुळे हा परिसर पर्यटकांसाठी मोठे आकर्षण ठरत आहे.

बोर व्याघ्र प्रकल्पातील बीटीआर १ अंबिका. बीटीआर ३ कॅटरिना. बीटीआर ७ पिंकी यांसारख्या पट्टेदार वाघांचे दर्शन घेण्यासाठी राज्यासह देशातील विविध भागांतून पर्यटक येथे पोहोचत आहेत. जंगलातील शांतता. नैसर्गिक सौंदर्य आणि वाघाच्या डरकाळीचा थरार अनुभवण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.

बोरधरण आणि अडेगाव येथून सुरू होणारी कोअर जंगल सफारी मान्सूनमुळे ३० जूनपासून बंद करण्यात आली असली तरी बफर क्षेत्रातील सफारी सुरू आहे. रहाटी आणि ढगा या प्रवेशद्वारांमधून पर्यटकांना पावसाळ्यातही जंगल सफारीचा आनंद घेता येत आहे.

विशेषतः रहाटी गेटवर पर्यटकांची मोठी गर्दी होत असून ढगा मार्गावरील सफारीही पर्यटकांसाठी अविस्मरणीय अनुभव ठरत आहे.

### गतवर्षीपेक्षा दुप्पट प्रतिसाद

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे जंगल पर्यटनातून मिळणाऱ्या महसुलातही मोठी वाढ झाली आहे.

बोर व्याघ्र प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून जंगल पर्यटनाला चालना मिळत आहे. वन विभागाच्या संवर्धनाच्या प्रयत्नांना पर्यटकांकडून मिळणारा वाढता प्रतिसाद हा बोर व्याघ्र प्रकल्पाच्या यशाची नवी ओळख ठरत आहे.

# गिरडच्या जंगलात व्याघ्रांची चाहूल टीएफ १ ने दिला चार बछड्यांना जन्म

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील गिरड खुर्सापार जंगलाने पुन्हा एकदा व्याघ्रसंवर्धनातील आपले महत्त्व अधोरेखित केले आहे. टीएफ १ या पट्टेदार वाघिणीने सलग दुसऱ्यांदा चार बछड्यांना जन्म दिला असून सध्या ती आपल्या चार महिन्यांच्या बछड्यांसह जंगलात मुक्त संचार करत आहे. या घटनेमुळे वर्धा जिल्ह्याच्या वनसंपदेत मोठी भर पडली असून गिरड खुर्सापार परिसर व्याघ्रांसाठी सुरक्षित अधिवास असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे.

यापूर्वीही टीएफ १ ने याच परिसरात चार बछड्यांना जन्म दिला होता. त्यापैकी एक बछडा रस्ता अपघातात दगावला. उर्वरित बछड्यांचे संगोपन आणि शिकारीचे प्रशिक्षण तिने याच जंगलात केले. नंतर मानवी वस्तीकडे वावर वाढल्याने वन विभागाने दोन बछड्यांना पकडून सुरक्षितस्थळी हलविले होते.



या सर्व घडामोडीनंतर टीएफ १ हा परिसर सोडेल अशी चर्चा होती. मात्र तिने पुन्हा गिरड खुर्सापार जंगलाचीच निवड करत चार नव्या बछड्यांना जन्म दिला आहे. त्यामुळे या परिसरातील जंगल. पाणवठे. कुरणे आणि नैसर्गिक अधिवास व्याघ्रांच्या संवर्धनासाठी अत्यंत पोषक असल्याचे अधोरेखित झाले आहे. दरम्यान गिरड खुर्सापार येथे जंगल सफारी प्रकल्पाचे कामही वेगाने सुरू आहे. पाणवठ्यांचे संवर्धन. कुरण विकास. वन्यजीव संरक्षण आणि पर्यटनासाठी आवश्यक सुविधा उभारल्या जात आहेत. जंगल सफारी सुरू झाल्यानंतर पर्यटकांना व्याघ्रांचे नैसर्गिक अधिवासात दर्शन घेण्याची संधी मिळणार असून स्थानिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होणार आहेत.

# पालकमंत्री डॉ.पंकज भोयर आजपासुन जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.

दि. १२ जुलै रोजी सकाळी १० वाजता पारस आईस फॅक्टरी चौक परिसरातील सुपर मॉल च्या उद्धघाटन समारोहास उपस्थित राहतील.सकाळी १०.३० वाजता नवोदय विद्यालय सेलूकाटे येथे महाराष्ट्र शासनाच्या व्हिजन ३०० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत आयोजित वन महोत्सव कार्यक्रमास उपस्थित राहतील सकाळी ११:३० वाजता केळकरवाडी येथे वर्धापन दिनानिमित्त व्हिजन २०२६ विशेषांकाचे प्रकाशन सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी १२:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य अमृत महोत्सव संदर्भात तसेच इतर शासकीय विभागांच्या आयोजित केलेल्या आढावा बैठकीस उपस्थित राहतील. सायंकाळी ५.३० वाजता वर्धा येथून हिंगणघाट कडे प्रयाण करतील. सायंकाळी ६ वाजता हिंगणघाट नगर परिषद च्या विविध विकास काम व योजनाच्या आढावा घेतील.सायंकाळी ७ वाजता गिमाटेक्स ऑडिटोरियम वणी हिंगणघाट येथे आयोजित रोटरी स्थापना दिवस कार्यक्रमास उपस्थित राहतील.

# महात्मा फुले विचारांचा जागर आज आर्वीत

## द्विशताब्दी जयंतीनिमित्त काँग्रेसचा भव्य बहुजन मेळावा, राज्यातील दिग्गज नेते राहणार उपस्थित - कार्यकर्त्यांमध्ये उत्साह



**आर्वी जनमाध्यम :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी आणि महात्मा फुले द्विशताब्दी उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आज रविवार १२ जुलै रोजी दुपारी १ वाजता सिलाराम सभागृह येथे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त भव्य उत्सव आणि बहुजन कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुकुल वासनिक यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी हर्षवर्धन सपकाळ राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल जयहिंद. खासदार चंद्रकांत हंडोरे. आमदार विजय वडेट्टीवार. खासदार बलवंत वानखडे. यशोमती ठाकूर. माणिकराव ठाकरे. वसंतराव पुरके. रंजीत कांबळे. राजेंद्र मुळक. अभिजीत वंजारी. किशोर कन्हेरे. अनिरुद्ध वनकर. शिवराज मोरे. सागर साळुंखे. सुनील कोल्हे. विजय राऊत. तुषार पेंढारकर यांच्यासह अनेक नेते उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादनाने होईल. त्यानंतर दीपप्रज्वलन. मान्यवरांचा सत्कार. समाजसेवकांचा गौरव. माणसाची शिदोरी या मुखपत्राच्या महात्मा फुले विशेषांकाचे प्रकाशन. मार्गदर्शन तसेच सांस्कृतिक आणि वैचारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

आर्वी विधानसभा क्षेत्रात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर काँग्रेसचा वैचारिक आणि संघटनात्मक मेळावा होत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून जिल्ह्याचे लक्ष या कार्यक्रमाकडे लागले आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी भानुदास माळी यांच्या मार्गदर्शनाखाली आर्वी. आष्टी आणि कारंजा तालुक्यातील काँग्रेसच्या विविध आघाड्या. महिला काँग्रेस. युवक काँग्रेस. एनएसयूआय. सोशल मीडिया विभाग. अनुसूचित जाती काँग्रेस. आदिवासी काँग्रेस. अल्पसंख्याक काँग्रेस तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्ते तयारीत व्यस्त आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी अनंत मोहोड यांनी स्वीकारली असून भानुदास माळी. विजय राऊत. दिगंबर राऊत. तुषार पेंढारकर. चंद्रशेखर जोरे. चंद्रशेखर वनस्कर. सुधाकर भुयार. सुधाकर वाघमारे. पंकज गोडबोले. कैलास अवथडे. अक्षय निस्ताने. शुभम नागपुरे आणि प्रितम गायकी यांच्यासह पदाधिकारी आयोजनात सहभागी आहेत.

# हजारो बांधकाम कामगारांचे अनुदान सहा महिने होल्ड; आता अधिकाऱ्यांच्या मंजुरीही चौकशीच्या फेऱ्यात

## समान निकष लावण्याची कामगार संघटनांची मागणी; लॉगिन रेकॉर्ड तपासण्याची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या हक्कांवरच प्रशासकीय कात्री चालली आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. सुमारे १००० ते १२०० पात्र बांधकाम कामगारांचे मंजूर लाभ अर्ज पुनर्तपासणीच्या नावाखाली तब्बल सहा महिन्यांपासून होल्ड ठेवण्यात आले आहेत. मात्र, त्याच काळात सरकारी कामगार अधिकारी सीमा शिंदे यांच्या लॉगिन आयडीवरून मोठ्या प्रमाणात अर्ज निकाली काढण्यात आल्याचा दावा समोर आल्याने संपूर्ण प्रकरणावर संशयाचे सावट गडद झाले आहे. उपलब्ध अधिकृत पत्रानुसार, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सीमा शिंदे यांनी १७ फेब्रुवारीला मंजूर झालेले लाभ अर्ज होल्ड ठेवण्याची विनंती केली होती. अल्प कालावधीत मोठ्या प्रमाणात अर्ज मंजूर झाल्याने पुनर्तपासणी आवश्यक असल्याचे कारण देण्यात आले.

मात्र, हे अर्ज संबंधित नोंदणी अधिकाऱ्यांनी नियमांनुसार तपासूनच मंजूर केले होते, असा दावा कामगार संघटनांनी केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पुनर्तपासणीचे कारण पुढे करून हजारो गरीब कामगारांचे लाभ थांबविण्यात आले; पण सहा महिने उलटूनही चौकशीचा अहवाल नाही, निर्णय नाही आणि लाभही नाही. त्यामुळे अनेक पात्र कामगार शासनाच्या योजनांपासून वंचित राहिल्याचा आरोप करण्यात येत आहे.

याचवेळी मागील महिन्यात सीमा शिंदे यांच्या लॉगिन आयडीवरून मोठ्या प्रमाणात अर्ज निकाली काढण्यात आल्याचे दस्तऐवज उपलब्ध असल्याचा दावा स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेने केला आहे. मग त्या मंजुरींवरही 'पुनर्तपासणी'चा निकष का लावला गेला नाही एकाच नियमाचे दोन वेगवेगळे मापदंड का असा प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे.

या प्रकरणामुळे कामगारांमध्ये संतापाची लाट उसळली असून, सर्व लॉगिन रेकॉर्ड, मंजुरी प्रक्रिया, डिजिटल नोंदी, आदेश आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या निर्णयप्रक्रियेची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेने होल्ड केलेले सर्व पात्र अर्ज तातडीने निकाली काढावेत, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करावी, सर्व मंजुरींवर समान निकष लागू करावेत आणि चौकशीत अधिकारांचा गैरवापर किंवा अनियमितता आढळल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शासनाकडे केली आहे.

# टोल सुरू पण रस्ता खड्ड्यात

## वडनेर दारोडा टोल प्रशासनाला शिवसेनेचा इशारा, दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन

**हिंगणघाट जनमाध्यम :** नागपूर हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील वडनेर दारोडा टोल प्लाझा हद्दीतील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. टोलची वसुली नियमित सुरू असताना महामार्गाची दुरवस्था कायम असल्याने शिवसेनेने टोल प्रशासनाला धारेवर धरत खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी केली. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.



जनतेच्या सातत्याने येणाऱ्या तक्रारीनंतर शिवसेना पदाधिकाऱ्यांनी वडनेर दारोडा टोल प्लाझा येथे व्यवस्थापकांची भेट घेत महामार्गाच्या दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. पावसामुळे महामार्गावर मोठमोठे खड्डे पडले असून शालेय बस. दुचाकीस्वार. शेतकरी. मालवाहू वाहने आणि सर्वसामान्य नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावर खड्डे आहेत की खड्ड्यांत रस्ता अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

टोल प्लाझावर प्रवाशांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली. यावर टोल प्लाझा व्यवस्थापकांनी संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून महामार्गावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात येईल तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील असे आश्वासन दिले.

ही भेट विधानपरिषद सदस्य डॉ मनिषा कायंदे आणि शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख राजजी दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख शुभांगी ठमेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उपजिल्हाप्रमुख अमित गावंडे. उपतालुकाप्रमुख वैभव ढगले. अनिल ढगले. निखिल नांदेकर. संघर्ष तिजारे. प्रशांत दुधलकर. सुजल बोरकर. विशाल आत्राम यांच्यासह शिवसैनिक. विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शुभांगी ठमेकर यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी शिवसेना कायम रस्त्यावर उतरेल असे स्पष्ट केले. तर नागरिकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या जीविताशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून महामार्ग वाहतुकीस सुरक्षित करावा. अन्यथा तीव्र आंदोलन उभारले जाईल असा इशारा अमित गावंडे यांनी दिला.

# गुन्हेगारांना थारा नाही:एसपी अग्रवाल यांचा पोलिसांना सज्जड दम

## मोक्का, दारूबंदी, ड्रग्जविरोधी कारवायांना वेग चोरी घरफोडी उघडकीस आणण्यासाठी एलसीबीसह ठाणेदारांना कडक आदेश

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील गुन्हेगारांना कोणतीही सवलत देऊ नका. चोरी, घरफोडी, जबरी चोरी आणि पळवून नेण्याचे गुन्हे तातडीने उघडकीस आणा. टोळीने गुन्हे करणाऱ्यांवर मोक्का आणि भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये कठोर कारवाई करा. उपद्रवी ठिकाणी संयुक्त धाडी टाका. दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी करा. ड्रग्जच्या साखळीचा कायमचा बंदोबस्त करा, अशा स्पष्ट आणि कडक शब्दांत पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना आदेश दिले. शनिवारी पोलीस अधीक्षक कार्यालयात झालेल्या जून महिन्याच्या गुन्हे आढावा बैठकीत गुन्हेगारीविरोधात आक्रमक भूमिका जाहीर करण्यात आली.

जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांतील गुन्हेगारीचा बारकाईने आढावा घेताना उघडकीस न आलेल्या चोरी, घरफोडी, जबरी चोरी आणि अपहरणाच्या गुन्ह्यांबाबत संबंधित पोलीस ठाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखेकडून थेट माहिती घेण्यात आली. प्रत्येक प्रकरणाचा पाठपुरावा करून गुन्हे उघडकीस आणण्यासाठी ठोस कृती आराखडा राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत जिल्ह्यातील दारूबंदीची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यावर विशेष भर देण्यात आला. अवैध दारू विक्री, वाहतूक आणि निर्मिती करणाऱ्यांवर सातत्याने धाडसत्र सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले. त्याचबरोबर अंमली पदार्थांविरोधातील ड्रग्ज फ्री वर्धा मोहिमेला अधिक गती देण्याचे निर्देश देत शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी जनजागृतीसोबतच कठोर कारवाईची भूमिकाही स्पष्ट करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेने ड्रग्जविरोधी मोहिमेचा आढावा सादर केला, तर सायबर पोलीस ठाण्याने ऑनलाइन फसवणूक रोखण्यासाठी एनसीसीआरपी, सीईआयआर आणि इतर राष्ट्रीय पोर्टलच्या प्रभावी वापराबाबत माहिती दिली. हरविलेले मोबाईल शोधणे, गोठवलेली रक्कम परत मिळवून देणे आणि सायबर गुन्ह्यांतील तपास अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला.

कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर सतत नजर ठेवण्याचे आदेश देताना उपद्रवी भागात स्थानिक गुन्हे शाखा, संबंधित पोलीस ठाणे आणि दंगा नियंत्रण पथक यांच्या संयुक्त कारवाया राबविण्याचे निर्देश एसपी अग्रवाल यांनी दिले. टोळीने गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांवर मोक्का, तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम १११ आणि ११२ अंतर्गत कठोर कारवाई करण्याचेही स्पष्ट आदेश बैठकीत देण्यात आले.

अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांनी नव्या फौजदारी कायद्यांतील तरतुदी, ई एफआयआर, ई चार्जशीट, समन्स व वॉरंट बजावणी आणि निर्धारित मुदतीत दोषारोपपत्र दाखल करण्याबाबत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. संवेदनशील स्थळांची सुरक्षा, आगामी सण उत्सव आणि संभाव्य कायदा सुव्यवस्था प्रश्नांवर विशेष नियोजन करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार आणि शाखा प्रमुख या बैठकीस उपस्थित होते. गुन्हेगारीविरोधात अधिक आक्रमक मोहीम राबविण्याचा स्पष्ट संदेश या बैठकीतून संपूर्ण पोलीस यंत्रणेला देण्यात आला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय




# लाडकी बहीण योजनेत तब्बल ३५०० कोटींचा जादा खर्च

## ‘कॅग’च्या खुलाशाने सरकार अडचणीत?

**मुंबई / प्रतिनिधी-** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या खर्चाबाबत नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी केलेल्या निरीक्षणांमुळे राज्य सरकारसमोर अनेक आर्थिक प्रश्न उभे राहिले आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात या योजनेवर मंजूर तरतुदीपेक्षा तब्बल ३,५४१.१६ कोटी रु पयांचा अतिरिक्त खर्च झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या वाढीव खर्चामागील कारणांबाबत संबंधित विभागाकडून समाधानकारक माहिती उपलब्ध करून न देण्यात आली नसल्याची नोंदही करण्यात आली आहे. अहवालानुसार, महिला व बालविकास विभागासाठी सुरु वातीला २६,२००कोटी रु पयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर लेक लाडकी योजनेतील ३,४९०.७५ कोटी रु पये या योजनेकडे वळवण्यात आले. त्यामुळे उपलब्ध निधीची रक्कम २९,६९३.०९ कोटी रु पयांपर्यंत पोहोचली. मात्र, प्रत्यक्ष खर्च ३३,२३७.२४ कोटी रु पये इतका झाल्याने मोठ्या प्रमाणात अतिरिक्त आर्थिक भार पडल्याचे समोर



आले आहे.कॅगने सांगितले आहे की, अशा मोठ्या थेट लाभ हस्तांतरण योजनांसाठी निधीचे नियोजन करताना लाभार्थ्यांची संख्या, निधीची आवश्यकता आणि संभाव्य खर्च यांचे अधिक अचूक मूल्यमापन होणे आवश्यक आहे. अन्यथा वारंवार अतिरिक्त निधीची गरज निर्माण होउन आर्थिक व्यवस्थापनावर परिणाम होउ शकतो. अहवालात आणखी एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत सुमारे १५,५८६ कोटी रु पये काढून ते व्हर्च्युअल पर्सनल डिपाझिट अकाउंट्समध्ये ठेवण्यात आल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. तातडीची आवश्यकता नसताना निधी अशा खात्यांमध्ये ठेवणे हे अर्थसंकल्पीय शिस्तीच्या तत्त्वांशी विसंगत असल्याचे कॅगने म्हटले आहे.

महिला कल्याणासाठीचा खर्च २०२३-२४ मधील २६१. ७८ कोटी रु पयांवरून २०२४-२५ मध्ये ३३,५५४.३६ कोटी रु पयांपर्यंत वाढल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. हा खर्च महिलांना थेट आर्थिक मदत देण्यासाठी उपयुक्त ठरला असला, तरी गृहनिर्माण आणि इतर सामाजिक पायाभूत सुविधांवरील खर्चात घट झाल्याने भविष्यातील विकासकामांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याची चिंता कॅगने व्यक्त केली आहे.

# दिवे घाट ते सासवड लाखो पावलांतून उमटणारा विठ्ठलनामाचा जयघोष



**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात जर एखाद्या परंपरेने शेकडो वर्षे काळाच्या कसोटीवर टिकून समाजाला दिशा दिली असेल, तर ती म्हणजे आषाढी वारी. विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघालेली ही यात्रा केवळ धार्मिक सोहळा नाही; ती समता, बंधुता, श्रमसंस्कृती, लोकजीवन, अध्यात्म आणि सामाजिक परिवर्तन यांचा अखंड प्रवाह आहे. लाखो वारकरी वर्षानुवर्षे कोणत्याही निमंत्रणाशिवाय, कोणत्याही प्रसिद्धीशिवाय आणि कोणत्याही वैयक्तिक अपेक्षेशिवाय विठ्ठलाच्या भेटीसाठी चालत राहतात. या प्रवासात असंख्य गावे, नद्या, घाट आणि मुक्काम येतात; परंतु पुण्याहून दिवे घाट ओलांडून सासवडमध्ये होणारा पालखीचा मुक्काम हा वारीतील सर्वात भावस्पर्शी, नयनरम्य आणि ऐतिहासिक टप्प्यांपैकी एक मानला जातो. दिवे घाटाच्या उंच कड्यांवरून खाली उतरणारी वारक-यांची अखंड रांग पाहताना असे वाटते की, डोंगरच भक्तीच्या महासागरात स्नान करत आहे. भगव्या पताका वा-यावर डोलत असतात, टाळ-मृदंगाचा निनाद संपूर्ण घाटमाथ्यावर घुमत असतो आणि ज्ञानोबा-तुकोबाचा गजर निसर्गालाही भक्तिरसात रंगवून टाकतो. हजारो नव्हे, लाखो पावले एकाच दिशेने, एकाच श्रद्धेने आणि एकाच ध्येयाने पुढे सरकत असतात. हे दृश्य पाहणारा प्रत्येकजण क्षणभरासाठी का होईना, या परंपरेचा भाग बनून जातो.

**दिवे घाट : केवळ डोंगररस्ता नव्हे, श्रद्धेची कठीण परीक्षा-**पुणे शहरातून पालखी मार्गस्थ झाल्यानंतर हडपसरमार्गे दिवे घाटाकडे प्रवास सुरू होतो. हा घाट वारीतील सर्वाधिक लक्षवेधी टप्पा म्हणून ओळखला जातो. उंच-सखल वळणे, चढ-उतार, बदलणारे हवामान आणि हजारो वारक-यांची शिस्तबद्ध वाटचाल या सर्वांचा संगम येथे अनुभवायला मिळतो. दिवे घाट हा केवळ भौगोलिक अडथळा नाही; तो संयम, सहनशक्ती आणि सामूहिक शिस्त यांची परीक्षा आहे. उन्हाळ्याची कडक उन असो, पावसाच्या सरी असोत किंवा वा-याचा वेग वारक-यांच्या पावलांची लय कधीही खंडित होत नाही. त्यांच्या मुखी विठ्ठलाचे नाम असते आणि मनात सेवाभाव. म्हणूनच दिवे घाट हा वारीचा आत्मा मानला जातो. घाटावरून खाली पाहिल्यास भगव्या पताकांचा लोंढा डोंगराच्या कुशीतून वाहणा-या नदीसारखा दिसतो. छायाचित्रकार, संशोधक, पर्यटक आणि भाविकांसाठी हे दृश्य अविस्मरणीय ठरते. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे हे एक जिवंत चित्र आहे.

**झेंडेवाडीचा अल्पविराम, सासवडकडे नव्या उत्साहाने-**दिवे घाट पार केल्यानंतर झेंडेवाडी येथे पालखीचा अल्प विश्रांतीचा टप्पा असतो. वारकरी येथे थोडी विश्रांती घेतात, पाणी पितात, प्रसाद ग्रहण करतात आणि पुन्हा नव्या उत्साहाने सासवडच्या दिशेने मार्गस्थ होतात. या विश्रांतीमागेही एक संस्कार दडलेला आहे. वारी शिकवते की, प्रवास कितीही मोठा असला तरी सामूहिक आधार, संयम आणि शिस्त यामुळे तो सहज होतो. थकवा असतो, पण निराशा नसते; कष्ट असतात, पण तक्रार नसते. कारण प्रत्येक पाउल विठ्ठलाकडे जात असते.

**सासवड : संत सोपानकाकांच्या भूमीतील भक्तीचा महोत्सव-**सासवड हे केवळ एक ऐतिहासिक शहर नाही. ते संत सोपानकाकांच्या स्मृतींनी पावन झालेले तीर्थक्षेत्र आहे. संत ज्ञानेस्वर महाराजांचे बंधू आणि वारकरी परंपरेतील महत्त्वाचे संत म्हणून सोपानकाकांचे स्थान अत्यंत आदराचे आहे. त्यामुळे सासवडचा मुक्काम हा भक्तांसाठी विशेष आध्यात्मिक महत्त्वाचा मानला जातो. पालखी सासवडमध्ये दाखल होताच संपूर्ण शहर उत्सवमय होते. रस्त्यांवर फुलांची उधळण, घराघरांतून स्वागत, मंदिरांमध्ये हरिनाम सप्ताह, अभंगगायन, कीर्तन, भजन आणि सामूहिक आरत्या संपूर्ण शहर भक्तीच्या रंगात रंगून जाते. पालखीचा येथे साधारण दोन दिवसांचा मुक्काम असतो. या काळात हजारो वारकरी, स्थानिक नागरिक आणि देशभरातून आलेले भाविक एकत्र येउन भक्तीचा महासोहळा अनुभवतात.

**दोन दिवसांचा मुक्काम : समाजजीवनाची खुली शाळा-** सासवडमधील मुक्काम म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे जिवंत विद्यापीठ आहे. येथे कोणी मोठा नाही, कोणी लहान नाही. कोणी श्रीमंत नाही, कोणी गरीब नाही. सर्वजण वारकरी आहेत. अन्नछत्रांमध्ये हजारो लोक एकत्र बसून प्रसाद ग्रहण करतात. कुणी पाणी वाटतो, कुणी औषधे देतो, कुणी स्वच्छतेची जबाबदारी घेतो, तर कुणी हरवलेल्या भाविकांना मदत करतो. कोणताही मोबदला, कोणतीही अपेक्षा किंवा प्रसिद्धीची इच्छा नसताना चालणारा हा सेवाभाव भारतीय समाजव्यवस्थेसाठी प्रेरणादायी आहे.आजच्या स्पर्धात्मक आणि स्वार्थी होत चाललेल्या काळात वारी आपल्याला सांगते की, समाज टिकवायचा असेल तर सहकार्य, परस्पर आदर आणि समता आवश्यक आहे.

**वारी : लोकशाही मूल्यांचा संस्कार**

भारतीय राज्यघटनेने समता, बंधुता आणि न्याय यांचा पुरस्कार केला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही मूल्ये वारकरी परंपरेत शेकडो वर्षांपासून प्रत्यक्ष जगली जात आहेत. दिंडीत चालताना कोणाचे पद विचारले जात नाही, संपत्ती विचारली जात नाही किंवा जात विचारली जात नाही. प्रत्येक जण एकाच रांगेत चालतो, एकाच पंगतीत बसतो आणि एकाच विठ्ठलाचे नाम घेतो. संतांच्या अभंगांनी समाजाला दिलेला हा समतेचा संदेश आजही तितकाच जिवंत आहे. त्यामुळे वारी ही केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक लोकशाहीचीही चालती-बोलती शाळा आहे.

**तंत्रज्ञानाच्या युगातही न बदललेली परंपरा-** डिजिटल युगात जग कृत्रिम बुद्धिमत्ता, आभासी संवाद आणि वेगवान जीवनशैलीकडे वाटचाल करत आहे. तरीही लाखो लोक दरवर्षी शेकडो किलोमीटर पायी चालण्याचा संकल्प करतात. हा विरोधाभास नाही;

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतले श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांचे दर्शन

**पुण/प्रतिनिधी-** आषाढी वारीच्या भक्तिमय वातावरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी रात्री पुण्यातील भवानी पेठेतील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला भेट देत माउलींच्या पवित्र चलपादुकांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी वारकरी संप्रदायाच्या अखंड श्रद्धेला सलाम करत, वारीतील प्रत्येक भाविकाच्या सुरक्षित आणि सुखकर प्रवासासाठी राज्य प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याची ग्वाही दिली.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते माउलींचे दर्शन झाल्यानंतर श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या पदाधिका-यांनी त्यांचा सत्कार करून माउलींची प्रतिमा आणि प्रसाद भेट दिला. या प्रसंगी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ तसेच विविध लोकप्रतिनिधी आणि



वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.पालखी तळावर वारक-यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, यंदा वारीपूर्वी राज्यातील अनेक भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या. मात्र, संकटांवर मात करत विठ्ठल दर्शनाच्या ओढीने लाखो वारकरी उत्साहाने पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाले आहेत. हीच वारकरी संप्रदायाची खरी ताकद आणि परंपरेचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी नमूद केले. वारीत यंदा मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाल्याने शासनाने विशेष तयारी केली असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी रस्त्यांची दुरुस्ती, फिरती आरोग्य सेवा, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सुरक्षा यावर विशेष भर देण्यात आल्याची माहिती दिली. वारकरी मार्गावर कोणतीही गैरसोय होउ नये, यासाठी संबंधित यंत्रणांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून सर्व विभाग समन्वयाने कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# तेल बाजारावर संकटाचे सावट

## अमेरिका-इराण तणावामुळे पेट्रोल-डिझेल महागण्याची शक्यता; IEA चा मोठा इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे जगासमोर पुन्हा एकदा तेल संकट उभे राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय उर्जा संस्था (IEA) ने इशारा दिला की, हा तणाव मोठ्या युद्धात बदलल्यास त्याचा थेट परिणाम जागतिक कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर होउ शकतो. परिणामी पेट्रोल, डिझेलसह इतर इंधनांच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. आयईएच्या अहवालानुसार, सध्या जागतिक तेल बाजार हळूहळू स्थिर होत असला तरी पश्चिम आशियातील वाढता तणाव ही परिस्थिती कोणत्याही क्षणी बदलू शकतो. या भागातील तेल उत्पादन किंवा महत्त्वाचे सागरी मार्ग बाधित झाल्यास कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम होउ शकतो.

**हार्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यास मोठा फटका-**आयईएने विशेषतः हार्मुझ सामुद्रधुनी संदर्भात गंभीर चिंता व्यक्त केली आहे. जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या तेल वाहतूक मार्गांपैकी हा एक असून, दररोज मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची निर्यात याच मार्गातून विविध



देशांकडे केली जाते. अहवालानुसार, हार्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यास दररोज सुमारे १.४ कोटी बॅरल कच्च्या तेलाचा पुरवठा ठप्प होउ शकतो. त्यामुळे जागतिक स्तरावर इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याबरोबरच कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

**जागतिक अर्थव्यवस्थेवर होउ शकतो परिणाम-**पश्चिम आशिया हा जगातील सर्वात मोठ्या कच्चे तेल निर्यात करणा-या प्रदेशांपैकी एक आहे. त्यामुळे या भागातील कोणताही लष्करी संघर्ष केवळ प्रादेशिक न राहता जागतिक अर्थव्यवस्थेवरही परिणाम करू शकतो. तेल उत्पादक देशांमधील उत्पादन घटल्यास किंवा तेलवाहू जहाजांच्या वाहतुकीत अडथळे निर्माण झाल्यास कच्च्या तेलाचा जागतिक पुरवठा कमी होईल. त्याचा परिणाम पेट्रोल, डिझेल, विमान इंधन आणि नैसर्गिक वायूच्या किमतींवर होण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढेल, महागाईला चालना मिळेल आणि सर्वसामान्य नागरिकांच्या खर्चावर अतिरिक्त भार पडू शकतो.

**सध्या तेलाचा पुरेसा साठा; मात्र धोका कायम-**आयईएने स्पष्ट केले आहे की, सध्या जागतिक बाजारात कच्च्या तेलाचा पुरेसा पुरवठा उपलब्ध असून परिस्थिती नियंत्रणात आहे. मात्र बाजार अत्यंत संवेदनशील असल्याने अमेरिका आणि इराणमधील तणाव वाढल्यास हे संतुलन अल्पावधीतच बिघडू शकते. संस्थेच्या मते, सध्या भूराजकीय धोके हे जागतिक तेल बाजारासाठी सर्वात मोठे आव्हान ठरत आहेत.

**OPEC+ कडून दिलासा मिळण्याची शक्यता-** अहवालानुसार, OPEC+ समूहातील सदस्य देश यापूर्वी लागू केलेली उत्पादन कपात टप्प्याटप्प्याने मागे घेत असून, गरज पडल्यास बाजारात अतिरिक्त कच्च्या तेलाचा पुरवठा करू शकतात. याशिवाय OPEC+ बाहेरील अनेक तेल उत्पादक देशही उत्पादन वाढवत आहेत. त्यामुळे काही प्रमाणात पुरवठ्यातील तूट भरून काढता येउ शकते. मात्र, खाडी प्रदेशातून होणारी तेल निर्यात खंडित झाली किंवा प्रमुख सागरी मार्गांमध्ये अडथळे निर्माण झाले, तर अतिरिक्त उत्पादनही परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात ठेवण्यासाठी पुरेसे ठरणार नाही, असा इशारा आयईएने दिला आहे.

# कुंभमेळ्याच्या तोंडावर धक्कादायक कारवाई 5 साधू-महंत आखाड्यातून आजीवन हद्दपार

**नाशिक :** नाशिकमध्ये होणारा आगामी कुंभमेळा आता जवळ आला आहे. त्यापार्श्वभूमीवर एकीकडे प्रशासनाकडून जोरदार तयारी सुरू आहे. तर दुसरीकडे मात्र, कुंभमेळा आखाड्यांमधील साधू-महंतांमध्ये असलेले अंतर्गत वाद उघड होत आहेत. त्यातून आता पाच साधू-महंतावर कारवाई झाल्याची माहिती समोर आली आहे.

श्री पंचायत बडा उद्वासीन आखाड्याने पाच साधू महंतांना आखाड्यातून आजीवन हद्दपार करण्याचा निर्णय घेतला आहे. या पाच साधू-महंतांचे वर्तन आखाड्याच्या परंपरा व शिस्तीच्या विरुद्ध असल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवत ही कारवाई करण्यात आली आहे. यासंदर्भात आखाड्याचे श्री महंत दुर्गादास महाराज यांनी माहिती दिली आहे.

तामिळनाडूमधील कांचीपूरम येथे श्री पंचायत आखाडा बडा उद्वासी निर्वाणची बैठक झाली. बैठकीस उपस्थित संतांनी आखाड्याच्या संघटनेशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. या चर्चेदरम्यान, पाच साधूंना आजीवन हद्दपार करीत त्यांचा हुक्का-पाणी बंद करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या पाच साधूंमध्ये त्र्यंबकेश्वर येथील श्री महंत रघुमुनी यांचाही समावेश असल्याने नाशिकच्या धार्मिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. याशिवाय स्थानिक महंत उग्रदास, जयेंद्र मुनी (कनखल), स्वामी शिवानंद (प्रयागराज), सेवादास (हरिद्वार) यांनाही आजीवन हद्दपार करण्यात आले आहे.



संबंधितांनी आखाडा आणि श्री सतपंच परमेश्वर यांच्या प्रतिष्ठा आणि हिताच्या विरोधात न्यायालयासह इतर मंचांवर कारवाई केल्याचा आरोप आहे. त्याचबरोबर त्यांच्याशी सहकार्य करणा-या इतर व्यक्तींचे वर्तनही आखाड्याच्या परंपरा व शिस्तीच्या विरुद्ध असल्याचे म्हटले जात होते.

कांचीपूरम येथे झालेल्या बैठकीला उपस्थित संत आणि महात्म्यांनी केलेल्या विचारमंथनानंतर वरील पाचही महंतांना श्री उद्वासी वेश भगवान आणि श्री पंचायत आखाडा बडा उद्वासी निर्वाणमधून हद्दपार करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. आखाड्याची प्रतिष्ठा, शिस्त आणि परंपरांचे रक्षण करणे सर्वतोपरी असून, भविष्यातही संस्थेच्या हिताविरुद्ध कोणत्याही प्रकारच्या कृतीवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे या बैठकीत सांगण्यात आले.महंत रघुमुनी यांना आखाडा परिषदेच्या दुस-या गटाने बडा उद्वासीन आखाड्याचे प्रतिनिधी म्हणून घेतल्याचे नुकतेच त्र्यंबकेश्वर येथे जाहीर केले होते. त्या वेळी अध्यक्ष निरंजनी आखाड्याचे श्री महंत रवींद्रपुरी महाराज आणि महामंत्री जुना आखाड्याचे श्री महंत हरीगिरी महाराज यांनी घोषणा करीत मागच्या काही वर्षांपासून बडा उद्वासीन आखाड्यातून निष्कासित झालेले महंत रघुमुनी यांना व्यासपीठावर स्थान देउन त्यांच्या सहकार्याने त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळा होईल.

त्यांच्या माध्यमातून बडा उद्वासीन आखाडा आपल्याबरोबर असल्याचे जाहीर केले होते. दरम्यान, आताच्या निर्णयाने आखाडा परिषदेतील दोन्ही गटांचा संघर्ष तीव्र होणार असल्याचे दिसत आहे.

# राम मंदिर देणगी चोरी प्रकरणात नवे वळण

**अयोध्या :** राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरण दिवसेंदिवस गंभीर होत असून या प्रकरणात नवे घडामोडी समोर येत आहेत. देणगीतील अपहाराची रक्कम कथितपणे शेअर बाजारात गुंतवण्यात आल्याचा तपासात संशय व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर देणगी मोजणी विभागातील



२३ कर्मचा-यांनी सामूहिक राजीनामे दिल्याची माहिती समोर आली असून श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या प्रशासनात खळबळ उडाली आहे.

देणगी चोरीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राम मंदिर प्रशासनाने रोख रक्कम हाताळणा-या कर्मचा-यांसाठी सुरक्षा नियम अधिक कडक केले आहेत. खिसेविरहित गणवेश, वाढीव तपासणी, कठोर देखरेख आणि कामाच्या तासांमध्ये वाढ अशा उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. या बदलांमुळे कामकाज अधिक कठीण झाल्याचे कर्मचा-यांचे म्हणणे आहे.

कर्मचा-यांच्या मते, जबाबदा-या वाढल्या असल्या तरी वेतनात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे सामूहिक राजीनाम्याचा निर्णय घेण्यात आला. दुसरीकडे, देणगी व्यवस्थापन अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी हे बदल आवश्यक असल्याचे मंदिर प्रशासनाचे म्हणणे आहे.

दरम्यान, देणगी अपहार प्रकरणात आरोपी आणि त्याच्या नातेवाईकांची ३० बँक खाती गोठवण्याची कारवाई करण्यात आली आहे. तपासात अपहाराची रक्कम शेअर बाजारात गुंतवल्याचा संशय असून उत्तर प्रदेश सरकारचे विशेष तपास पथक(एसआयटी) विविध स्तरांवर तपास करत आहे.

या प्रकरणात आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच, राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणाची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपवावी आणि श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक यांच्यामार्फत लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.या याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार असून सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जायमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

# माझे 1000 मिसाईल्सच्या खटक्यावर बोट आहे; तर इराण बेचिराख करणार

**न्यूयार्क :** अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच इराणसोबतचा शांती करार रद्द झाल्याची घोषणा केली होती. आता त्यांनी इराणला बेचिराख करणार अशी धमकी सोशल मीडिया प्लॅटफार्म ट्रु थवरून दिली. त्यांनी दावा केला आहे की अमेरिकेची १००० मिसाईल लाक्ट अँड लोडेड आहेत. इराणला धमकी देत त्यांनी जर इराणने त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला किंवा तसा कट रचला तर अमेरिकेचे लष्कर वर्षभर इराणच्या प्रत्येक भागात सतत हल्ला



करण्यासाठी सज्ज आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, जर इराण सरकारने जगाच्या कोणत्याही कोप-यात माझी हत्या करण्याचा प्रयत्न केला तर अमेरिका इराणच्या सर्व भागांना बेचिराख करून टाकेल. याचा आदेश आधीच देण्यात आला आहे. अमेरिकेचे सैन्य पूर्ण तयार आहे. ट्रम्प यांचे हे वक्तव्य अशावेळी आले आहे ज्यावेळी अमेरिका आणि इराण यांच्यात संघर्ष पुन्हा शिगेला पोहोचला आहे. जूनमध्ये दोन्ही देशांनी मोठ्या संघर्षानंतर एक तात्पुरता युद्धविराम केला होता. मात्र नुकत्याच झालेल्या लष्करी कारवाईनंतर पुन्हा या भागातील वातावरण बिघडले आहे.

**ट्रम्प इराणच्या हिट लिस्टवर-**नुकतेच ट्रम्प यांनी नाटो बैठकीवेळी आपण इराणच्या हिट लिस्टवर आहोत असे सांगितले होते. या यादीत आपण सर्वोच्च स्थानावर आहोत. ही माहिती अमेरिकेच्या गुप्तचर संस्थेकडून मिळाली असल्याचे सांगण्यात आले. इराण त्यांच्याविरुद्ध कट रचत आहे असा दावा त्यांनी केला. त्यानंतर अमेरिकी लष्कराला अजून कडक लष्करी कारवाईची तयारी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**इस्त्रायलने दिली गुप्त माहिती-**ट्रम्प यांचे वक्तव्य अशावेळी आले आहे ज्यावेळी इस्त्रायलकडून अमेरिकेला इराणच्या कथित कटाची माहिती देण्यात आली. असे असले तरी या दाव्याची पुष्टी अजून झालेली नाही. मात्र यावरून वाशिंग्टन आणि तेहरान यांच्यात शाब्दिक चकमक वाढली आहे.

# हिंगोली जिल्ह्याला पुन्हा भूकंपाचा धक्का

**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्याला पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का बसला आहे. आज(दि.११) सकाळी ११:२६ वाजण्याच्या सुमारास जिल्ह्याला भूकंपाचे हादरे जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू औंढा नागनाथ तालुक्यातील ‘वसई’ येथे असून, त्याची खोली ५ किलोमीटर असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून भूकंपाचे धक्के सातत्याने जाणवत आहेत. वसमत तालुक्यातील ‘पांगरा शिंदे’ येथे गेल्या आठ वर्षांपासून भूकंपाचे धक्के बसत असून, या धक्क्यांमुळे गावकरी दहशतीखाली आहेत. याआधी ८ जुलै रोजी मध्यरात्री जिल्हाभरात भूकंपाचे चार मोठे धक्के जाणवले होते, त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्या चारही भूकंपांचा केंद्रबिंदू वसमत तालुक्यातील ‘पांगरा शिंदे’ आणि औंढा नागनाथ तालुक्यातील ‘काकडधाबा’ परिसरात होता. विशेष म्हणजे, मागील काही वर्षांतील सर्वात मोठा ४.६ रिश्टर स्केलचा भूकंप ८ जुलैला नोंदवला गेला होता. जिल्ह्यातील नागरिक या धक्क्यांतून सावरत नाहीत तोच शनिवारी सकाळी ३.५ रिश्टर स्केलच्या तीव्रतेचा भूकंप झाला.भूकंपाचा केंद्रबिंदू हळूहळू सरकत असल्याची भीती जिल्हावासियांमध्ये निर्माण झाली आहे.

# पार्थ पवार-कायनात धार यांचा २९ जुलैला पुण्यात साखरपुडा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रातील चर्चेत असलेले नाव पार्थ पवार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेसशी संबंधित पवार कुटुंबातील सदस्य असलेल्या पार्थ पवार आणि कायनात धार यांचा साखरपुडा येत्या २९ जुलै रोजी पुण्यात पार पडणार असल्याची माहिती समोर आली आहे. या सोहळ्याच्या तयारीला दोन्ही कुटुंबांनी सुरुवात केल्याचे सांगितले जात असून, राजकीय,



सामाजिक आणि उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. साखरपुड्याच्या वृत्तानंतर राजकीय वर्तुळासह सोशल मीडियावरही पार्थ पवार यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. हा समारंभ कुटुंबीय आणि निवडक पाहुण्यांच्या उपस्थितीत पार पडणार असल्याचे समजते. मात्र, विवाह सोहळ्याच्या तारखेबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. अधिकच्या माहितीनुसार, कायनात धार या मूळच्या जम्मू-काश्मीरमधील असून सध्या त्या दिल्लीत वास्तव्यास आहेत. पवार कुटुंबाशी त्यांचे जुने कौटुंबिक संबंध असल्याचे सांगितले जाते. गेल्या काही महिन्यांत त्या पार्थ पवार यांच्यासोबत विविध कार्यक्रमांमध्ये दिसून आल्याने त्यांच्या नात्याबाबत चर्चा रंगू लागली होती. काही महिन्यांपूर्वी पार्थ पवार आणि कायनात धार यांनी मध्य प्रदेशातील प्रसिद्ध महाकाल मंदिरात एकत्र दर्शन घेतले होते. त्या भेटीचे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. त्यानंतर विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्येही दोघांची उपस्थिती चर्चेचा विषय ठरली. अलीकडेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संस्थापक शरद पवार यांची नात आणि खासदार सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती यांच्या विवाह सोहळ्यात पार्थ पवार यांची उपस्थिती विशेष चर्चेत राहिली होती. त्या वेळी कायनात धार देखील त्यांच्यासोबत उपस्थित होत्या. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह दोघांची उपस्थिती पाहून त्यांच्या नात्याबाबतच्या चर्चांना अधिक उधाण आले होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## मैत्री दूरगामी हिताची

भारतीय परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने जुलै महिना ऐतिहासिक ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी गेल्या काही वर्षांमध्ये भारताचे आर्थिक,व्यापारी,सांस्कृतिक आणि सामरिक संबंध असणाऱ्या विविध राष्ट्रांसोबतची मैत्री घनिष्ट करण्यासाठी जी बीजपेरणी केली,त्यांना अंकुर फुटून आता या रोपट्यांची फळे चाखण्याचा कालखंड सुरू झाला आहे.जपानच्या पंतप्रधान साने ताकाईची यांच्या दौऱ्यात १२९ सामंजस्य करारांमुळे भारतात मोठी आर्थिक गुंतवणूक येणार असून तंत्रज्ञान,संशोधन,शिक्षण,संरक्षण क्षेत्रांना यामुळे चालना मिळेल. १५ जुलैपासून भारत आणि इंग्लंड यांच्यातील मुक्त व्यापार करार प्रत्यक्षात येत आहे. हा करार 'गेम चेंजर' ठरणार आहे. पंतप्रधान मोदींच्या इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड दौऱ्याची सांगता होत आहे.आशिया प्रशांत क्षेत्रातील सत्तासमतोलाच्या राजकारणाला आणि मोदी सरकारच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाला नवे आयाम या दौऱ्यातून लाभले. उल्लेखनीय बाब म्हणजे युरेनियम पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागला. भारताला युरेनियमची प्रत्यक्ष निर्यात सुरू करण्याचा ऑस्ट्रेलियाचा निर्णय ऐतिहासिक आहे. मेलबर्न येथे तिसऱ्या भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषदेत दोन्ही देशांच्या पंतप्रधानांनी संरक्षण, आर्थिक सहकार्य आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये १८ करारांची घोषणा केली. 'क्वाड' व्यासपीठांवरून वाढलेली लष्करी जवळीक आता ऊर्जा आणि आर्थिक क्षेत्रात परावर्तित झाली आहे.सायबर,एआय,सेमीकंडक्टर्स आणि महत्त्वपूर्ण खनिजांच्या पुरवठा साखळीसाठी दोन्ही देशांनी 'पॅक्टस' नावाच्या नवीन धोरणात्मक चौकटीची घोषणा केली. या अंतर्गत बॅटऱ्या आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक लिथियमसारख्या महत्त्वपूर्ण खनिजांच्या प्रक्रियेसाठी 'क्रिटिकल मिनरल्स कॉरिडॉर' विकसित केला जाईल. पंतप्रधान मोदींनी ऑस्ट्रेलियाच्या ४ ट्रिलियन डॉलरपेक्षा जास्त निधी असलेल्या सुपरएन्युएशन फंडांना भारतातील पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीचे आवाहन केले. दोन्ही देशांच्या संरक्षण स्टार्टअप्सना जोडण्यासाठी भारत-ऑस्ट्रेलिया संरक्षण नवोपक्रम 'कॉरिडॉर' सुरू करण्यात येणार आहे. हिंदी आणि पॅसिफिक महासागरातील सागरी मार्गांच्या सुरक्षेसाठी 'सागरी सुरक्षा सहकार्य आराखडा' (रोडमॅप) देखील तयार केला असून, भारतीय तटरक्षक दल आणि ऑस्ट्रेलियाच्या 'मेरिटाईम बॉर्डर कमांड' यांच्यात सामंजस्य करार झाला.साधारण दशकभरापूर्वी दोन्ही देशांमध्ये नागरी अणुऊर्जा सहकार्य करार होऊनही प्रत्यक्षात युरेनियमची एकही खेप भारतात येऊ शकली नव्हती.ऑस्ट्रेलियाच्या मनात भारताचे अणुदायित्व कायदे आणि नियामक चौकटीबाबत असलेल्या शंकांमुळे हा व्यवहार प्रलंबित होता. परंतु,आता हा अडथळा संपुष्टात आला आहे.ऑस्ट्रेलियाकडून भारताला युरेनियम पुरवठा करण्याच्या प्रशासकीय प्रक्रियेला अंतिम स्वरूप मिळाले. भारताने २०४७ पर्यंत अणुऊर्जा उत्पादन क्षमता सध्याच्या ८ गिगावॅटवरून थेट १०० गिगावॅटपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. ऑस्ट्रेलिया हा जगातील सर्वाधिक ज्ञात युरेनियम साठा असलेला देश आहे. स्वतःकडे अणुऊर्जा प्रकल्प नसतानाही ऑस्ट्रेलिया संपूर्ण युरेनियम उत्पादन निर्यात करतो. त्यामुळे भारतासारख्या मोठ्या ऊर्जा बाजारासाठी ऑस्ट्रेलिया हा दीर्घकालीन आणि विश्वासार्ह भागीदार ठरू शकतो. दोन्ही देशांमध्ये नागरी अणुऊर्जा सहकार्याचा करार २०१४ मध्ये झाला होता. मात्र,आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या सुरक्षा निकषांशी संबंधित प्रशासकीय प्रक्रिया, देखरेख व्यवस्था आणि तांत्रिक अटी पूर्ण होण्यासाठी दहा वर्षांहून अधिक काळ गेला.सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे भारतीय अणुऊर्जा प्रकल्पांना ऑस्ट्रेलियन युरेनियमचा मार्ग खुला झाला आहे. भारताने डिसेंबर २०२५ मध्ये संमत केलेला 'शांती कायदा' हा या ऐतिहासिक अणुकराराचा मुख्य पाया ठरला. या कायद्याने देशाच्या कालबाह्य ठरलेल्या नागरी अणुऊर्जा चौकटीत आमूलाग्र सुधारणा केल्या. या कायद्यान्वये भारताने अणू क्षेत्रामध्ये नियंत्रित परवाना पद्धती लागू करत खासगी आणि परदेशी गुंतवणुकीचे मार्ग खुले केले. अणुसुरक्षेबाबत ऑस्ट्रेलियाच्या सर्व शंकांचे निरसन या कायद्याने प्रभावीपणे केले. अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर स्वाक्षरी करणाऱ्या देशांनाच ऑस्ट्रेलिया युरेनियम पुरवतो. भारताने या करारावर स्वाक्षरी केलेली नसल्याने २०१० मध्ये ऑस्ट्रेलियाने युरेनियम देण्यास नकार दिला होता. ११ वर्षांनंतरही भारताने या करारावर स्वाक्षरी केलेली नाही. तरीही ऑस्ट्रेलिया युरेनियम देणार आहे,हा भारताच्या जबाबदार अणू पार्श्वभूमीचा विजय आहे.भारतात सध्या ७ वेगवेगळ्या ठिकाणी एकूण २४ अणुऊर्जा केंद्रे आहेत. या सर्व अणुभट्ट्यांची मिळून क्षमता ८७८० मेगावॅट आहे. ६ एप्रिल २०२६ रोजी कल्पक्कम (तामिळनाडू) येथील ५०० मेगावॅट क्षमतेच्या 'प्रोटोटाईप फास्ट ब्रीडर रिॲक्टर'ने पहिली क्रिटिकॅलिटी यशस्वीपणे गाठली. यामुळे भारताने त्रि-स्तरीय अणुऊर्जा कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात अधिकृतपणे प्रवेश केला. वाढते औद्योगिकीकरण, कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे दडपण आणि होर्मुझ संकटाचा धडा म्हणून भारताला अणुऊर्जेकडे वळणे अपरिहार्य आहे. यासाठी युरेनियम इंधनाच्या सातत्यपूर्ण आणि शाश्वत पुरवठ्याची नितांत गरज आहे.ऑस्ट्रेलियाकडे जगातील एकूण ज्ञात युरेनियम साठ्यांपैकी तब्बल २८ टक्के साठा असल्याने ते भारतासाठी सर्वात मोठे, किफायतशीर आणि हक्काचे इंधन पुरवठादार ठरणार आहेत. त्यादृष्टीने हा करार भारत ऑस्ट्रेलिया संबंधांना 'नवे इंधन' देणारा ठरेल.अणुभट्टया एकदा सुरू झाल्यानंतर त्यांना सलग ५० ते ६० वर्षे इंधनाची आवश्यकता असते. यात खंड पडल्यास उत्पादन थांबण्याचा धोका असतो. त्यामुळे दीर्घकालीन करार आणि विश्वासार्ह पुरवठादार ही अणुऊर्जा क्षेत्राची मूलभूत गरज असते. ऑस्ट्रेलियासोबत झालेला करार भारताला हीच खात्री देणारा असल्याने त्याकडे माईलस्टोन म्हणून पाहावे लागेल. भारत आणि ऑस्ट्रेलिया संबंधांना नव्या उंचीवर नेण्यात तेथील अनिवासी भारतीयांची भूमिका महत्त्वाची आहे. मेलबर्न येथील मार्व्हल स्टेडियमवर झालेला 'मेलबर्न मीटस मोदी' हा सुमारे ३० हजार अनिवासी भारतीयांच्या उपस्थितीत झालेला सोहळा जगभरात चर्चिला गेला. ऑस्ट्रेलियाच्या अर्थव्यवस्थेत, सामाजिक जडणघडणीत आणि बहुसांस्कृतिक ओळखीमध्ये १० लाखांपेक्षा जास्त मूळ भारतीय नागरिकांचे योगदान अतुलनीय आहे. कोणत्याही राष्ट्रीय संकटावेळी मदतीसाठी भारतीय समुदाय आघाडीवर असतो, हे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अल्बानीज यांचे गौरवोद्गार सूचक आहेत. हिंद-प्रशांत क्षेत्रात चीनच्या वाढत्या विस्तारवादाला आणि लष्करी आक्रमकतेला शह देण्यासाठी दोन्ही देशांची वाढती मैत्री दूरगामी हिताची आहे.

# कर्जमाफीच्या घोषणा;पण शेतकऱ्याच्या घामाला न्याय कधी?

राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार रणधीर सावरकर यांनी ही घोषणा प्रसारमाध्यमांतून केली.कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्याला तात्पुरता दिलासा मिळणार असेल,तर त्याचे स्वागतच केले पाहिजे.परंतु या घोषणेच्या टाळ्यांच्या गजरात एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न पुन्हा दडपला जात आहे.शेतकऱ्याला पुन्हा पुन्हा कर्जमाफीची वेळ का येते?

हा प्रश्न नवीन नाही. याचे उत्तर युगद्रष्टे शरद जोशी यांनी दशकांपूर्वी दिले होते. ते म्हणायचे,'सरकार शेतकऱ्यांच्या घरावर सोन्याचे कौल घालून देईल, पण शेतकऱ्याला त्याच्या उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव कधीच देणार नाही.' आजही हे वाक्य तितकेच सत्य वाटते.

भारतीय शेतीसमोरील संकटाचे मूळ कर्ज नाही, तर किमतीवरील अन्याय आहे.शेतकरी कर्जबाजारी जन्माला येत नाही.त्याला कर्जबाजारी बनवले जाते.त्याच्या उत्पादनाचा खर्च सातत्याने वाढतो बियाणे, खते, औषधे, वीज, मजुरी, सिंचन, वाहतूक यांचा खर्च दिवसेंदिवस वाढत जातो; पण त्याच्या मालाची किंमत मात्र सरकारच्या धोरणांवर, बाजारातील हस्तक्षेपावर आणि दलालांच्या साखळीवर अवलंबून राहते.उत्पादन खर्चापेक्षा कमी दर मिळाल्यावर शेतकरी कर्ज काढणार नाही तर काय करणार?

देशातील कोणत्याही उद्योगपतीला त्याच्या उत्पादनाची किंमत सरकार ठरवून देत नाही. डॉक्टर आपल्या सेवेचे मानधन स्वतः ठरवतात. वकील आपल्या परिश्रमाची फी ठरवतात. व्यापारी नफा ठेवून व्यवहार करतात.मग केवळ अन्नदाता शेतकरीच असा का, ज्याला स्वतःच्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार नाही?

**आज सरकार कर्जमाफी जाहीर करते, उद्या अनुदान जाहीर करते, परवा नुकसानभरपाई देते.या सर्व योजना ऐकायला आकर्षक वाटतात; पण त्या शेतकऱ्याला स्वावलंबी बनवत नाहीत. उलट त्याला सरकारी घोषणांच्या प्रतीक्षेत उभे राहण्याची सवय लावतात. हा स्वाभिमानाचा मार्ग नाही; ही अवलंबित्वाची व्यवस्था आहे.**



आज सरकार कर्जमाफी जाहीर करते, उद्या अनुदान जाहीर करते, परवा नुकसानभरपाई देते.या सर्व योजना ऐकायला आकर्षक वाटतात; पण त्या शेतकऱ्याला स्वावलंबी बनवत नाहीत. उलट त्याला सरकारी घोषणांच्या प्रतीक्षेत उभे राहण्याची सवय लावतात. हा स्वाभिमानाचा मार्ग नाही; ही अवलंबित्वाची व्यवस्था आहे.

शरद जोशी यांनी याच व्यवस्थेला सर्वात मोठे आव्हान दिले. त्यांनी शेतकऱ्यांना दान मागितले नाही.त्यांनी भीक मागितली नाही.त्यांनी मागितला तो न्याय. त्यांनी मागितले घामाचे दाम.त्यांनी सांगितले की शेतकऱ्याला कर्जमाफीची गरज पडणारच नाही, जर त्याच्या उत्पादनाला मुक्त बाजारपेठेत स्पर्धात्मक आणि लाभदायक किंमत मिळाली.

आजही कांदा असो,कापूस असो, सोयाबीन असो, ऊस असो किंवा डाळी सरकारचे धोरण अनेकदा ग्राहककेंद्री दिसते; उत्पादककेंद्री नाही. महागाई रोखण्याच्या नावाखाली निर्यातबंदी केली जाते, साठेबंदी केली जाते, आयातशुल्क कमी केले जाते.या निर्णयांचा सर्वात मोठा फटका शेतकऱ्याला बसतो. ग्राहकाला स्वस्त अन्न देण्याची जबाबदारी जर सरकार स्वीकारत असेल, तर त्याचा खर्च फक्त शेतकऱ्यानेच का उचलावा?

कर्जमाफी म्हणजे जखमेवर लावलेली मलमपट्टी आहे;पण जखम होण्याचे कारण दूर केले जात नाही.पुढील हंगामात पुन्हा तोच खर्च, पुन्हा तोच तोटा आणि पुन्हा तेच कर्ज.हा अंतहीन दुष्टचक्र आहे. सरकारे बदलतात, घोषणा बदलतात,पण शेतकऱ्याची अवस्था बदलत नाही.

देशाला जर खरोखर विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर शेतीला उद्योगाचा दर्जा देण्यापेक्षा आधी शेतीला आर्थिक स्वातंत्र्य द्यावे लागेल.शेतकऱ्याला मुक्त बाजारपेठ,निर्यात स्वातंत्र्य,आधुनिक जैवतंत्रज्ञान, जागतिक स्पर्धेत उतरायची संधी आणि स्वतःच्या उत्पादनाची योग्य किंमत मिळविण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. त्याशिवाय शेतीचे उत्पन्न वाढणार नाही.

सरकारे कर्जमाफीची घोषणा करून राजकीय लाभ मिळवू शकतात;पण इतिहासात नाव त्यांचेच राहील जे शेतकऱ्याला कायमस्वरूपी न्याय देतील. शेतकरी हा मतांचा कारखाना नाही; तो देशाच्या अन्नसुरक्षेचा निर्माता आहे. त्याला सन्मानाने जगायचे आहे, कर्जमाफीच्या रांगेत उभे राहायचे नाही.

आज गरज आहे ती एका मूलभूत धोरणात्मक बदलाची. सरकारने ठरवावे शेतकरी हा कायमचा कर्जदार राहणार की स्वतंत्र उद्योजक होणार?कर उदार दुसरे असेल, तार कर्जमाफीपेक्षा अधिक धाडसी निर्णय घ्यावे लागतील.मुक्त बाजारपेठेवरील निर्बंध कमी करावे लागतील. शेतीमालाच्या व्यापारातील सरकारी हस्तक्षेप मर्यादित करावा लागेल. शेतकऱ्याला जागतिक बाजाराशी थेट जोडावे लागेल.

कर्जमाफीच्या घोषणा आज आहेत, उद्या विसरल्या जातील.पण उत्पादन खर्चावर आधारित लाभदायक भावाचे धोरण आले,तर ते अनेक पिढ्यांचे भविष्य बदलू शकते. म्हणूनच आज पुन्हा शरद जोशी यांच्या शब्दांची आठवण करून द्यावीशी वाटते.'दान नको, न्याय हवा; कर्जमाफी नको, घामाचे दाम द्या.'

देशातील प्रत्येक सरकारने हा संदेश समजून घेतला,तर कर्जमाफीची गरज उरणार नाही. कारण स्वाभिमानी शेतकरी कर्जमाफी मागत नाही; तो आपल्या श्रमाचा योग्य मोबदला मागतो. आणि तो मोबदला देणे ही कोणाची कृपा नसून, त्याचा घटनात्मक, आर्थिक आणि नैतिक हक्क आहे.

**विलास तुळशीराम ताथोड**
राज्य कार्यकारणी सदस्य शेतकरी संघटना,अकोला
मो.७०२०५८५२६१

# अन्नदाता म्हणून गौरव.. पण शेतकरी म्हणून अपमान!

'जय जवान, जय किसान','बळीराजा','अन्नदाता' अशा घोषणा देण्यात आपण जगात अग्रेसर आहोत.पण वास्तव इतके कटू आहे की,या देशात शेतकरी म्हणून जगणे हा अनेकांच्या दृष्टीने सन्मानाचा नव्हे तर कमीपणाचा विषय मानला जातो.ही वस्तुस्थिती केवळ वेदनादायक नाही, तर आपल्या समाजाच्या दुटप्पी मानसिकतेचे जिवंत उदाहरण आहे.

शेती व्यवसायाला पाप म्हणणे हा केवळ अज्ञानाचा नव्हे,तर नीचपणाचा कळस आहे. कारण ज्या हातांच्या घामातून आपल्या ताटातील प्रत्येक घास तयार होतो, त्या हातांनाच कमी लेखण्याइतका कृतघ्नपणा दुसरा कोणताच असू शकत नाही. अन्न पवित्र मानायचे, पण अन्न निर्माण करणाऱ्या माणसाला दुय्यम वागणूक द्यायची..यापेक्षा मोठा विरोधाभास कोणता?

मी हे कोणाच्या सांगण्यावरून लिहित नाही.हे माझ्या आयुष्याचे वास्तव आहे. आम्ही दोघेही..मी आणि माझी पत्नी उच्चशिक्षित आहोत.आधुनिक शेतीचा अभ्यास करतो,नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारतो, समाजात सक्रियपणे वावरतो. पण आमची ओळख 'शेतकरी' अशी झाली की अनेकांच्या नजरेतील आदर एका क्षणात बदलतो.शिक्षण, विचार, कर्तृत्व किंवा अनुभव यांची किंमत राहत नाही; उरते ती फक्त एक ओळख'हे शेती करतात.'

ही वेदना अनोळखी लोकांमुळेच नाही.. अनेकदा आपल्या नातेवाईकांमध्ये, गणगोतात, मित्रपरिवारातही तीच भावना जाणवते. शहरात नोकरी करणारा किंवा उद्योग करणारा व्यक्ती आपोआप 'यशस्वी'ठरतो;पण शेती करणारा माणूस अजूनही अनेकांच्या दृष्टीने मागासलेला, असहाय किंवा पर्याय नसल्यामुळे शेती करणारा असतो. ही मानसिकता शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या नव्हे, तर आत्मसन्मानाने गरीब बनवते.

आज आम्ही शहरात राहायला आलो आहोत. तेव्हापासून हा अनुभव अधिक तीव्र झाला आहे.'अजूनही शेती करता','त्यातून काही उरते का?','इतकं शिकून शेतीच?' असे प्रश्न अनेकदा ऐकायला मिळतात. या प्रश्नांमध्ये माहिती घेण्यापेक्षा कमीपणाची भावना जास्त असते. शहरातील अनेकांना शेती म्हणजे मागासलेपणाचे प्रतीक वाटते. त्यांच्या दृष्टीने शेतकरी म्हणजे चिखलात राबणारा माणूस;पण त्या चिखलातून उगवणाऱ्या अन्नावर त्यांचे संपूर्ण जीवन उभे आहे,हे मात्र ते विसरतात.

सर्वात जास्त दुःख तेव्हा होते,जेव्हा शेतीतून बाहेर पडलेले लोकच शेतीकडे तुच्छतेने पाहतात.ज्यांच्या आई-वडिलांनी शेती करून त्यांना शिकवले,मोठे केले, शहरात पोहोचवले,तेच लोक आपल्या मातीला कमी लेखू लागतात. म्हणूनच जुनी म्हण आजही खरी वाटते..'बाटगा जास्त कडवा असतो.'स्वतःच्या मुळांचा विसर पडला की माणूस त्या मुळांचाच अपमान करू लागतो.

शेती हा व्यवसाय नाही,तर निसर्गाशी दररोजची लढाई आहे.पाऊस पडेल की नाही,पडला तर किती पडेल, गारपीट होईल का, बाजारभाव काय मिळेल,सरकारचे धोरण काय असेल, आयात-निर्यात काय होईल..यापैकी एकाही गोष्टीवर शेतकऱ्याचे नियंत्रण नसते.एवढ्या अनिश्चिततेतही तो पुन्हा उभा राहतो,पुन्हा पेरणी करतो,पुन्हा आशा पेरतो.तरीही त्याला समाजात सन्मान मिळत नाही.

खरं तर भारतातील सर्वात मोठी सामाजिक शोकांतिका म्हणजे शेतकऱ्याची प्रतिमा. भाषणांमध्ये त्याला'देशाचा पोशिंदा'म्हणायचे आणि प्रत्यक्ष आयुष्यात त्याच्याकडे कमीपणाने पाहायचे. शेतकरी मुलाशी लग्न करण्यास नकार द्यायचा.'शेती करतो' हे ऐकताच त्याची किंमत कमी करायची. ही मानसिकता बदलली नाही, तर शेतीचे संकट केवळ आर्थिक राहणार नाही; ते सामाजिक संकट बनेल.

आज देशाला कृत्रिम बुद्धिमत्ता,ड्रोन,जैवतंत्रज्ञान आणि आधुनिक शेतीची गरज आहे. पण त्याहून मोठी गरज आहे ती समाजाच्या विचारांमध्ये परिवर्तनाची. कारण समस्या शेतीमध्ये नाही; समस्या शेतीकडे पाहण्याच्या नजरेत आहे.

ज्या दिवशी समाज एखाद्या शेतकऱ्याचा परिचय तितक्याच अभिमानाने स्वीकारेल, जितका तो एखाद्या अधिकारी, डॉक्टर किंवा उद्योगपतीचा स्वीकारतो, त्या दिवशी भारत खऱ्या अर्थाने विकसित होईल. अन्यथा 'अन्नदाता' हा शब्द केवळ भाषणापुरताच राहील. शेतकरी हा दयेचा विषय नाही. तो राष्ट्रनिर्माता आहे. त्याच्या घामातून अन्न, अर्थव्यवस्था आणि संस्कृती जिवंत राहते. त्यामुळे शेतीला दयेची नव्हे, तर प्रतिष्ठेची गरज आहे. अनुदानापेक्षा सन्मान मोठा असतो. आर्थिक मदतीपेक्षा सामाजिक स्वीकार महत्त्वाचा असतो.

आज मी अभिमानाने सांगतो होय,मी शेतकरी आहे.माझ्या हाताला माती लागते, पण तीच माती लाखो लोकांच्या ताटात अन्न बनून पोहोचते. मला माझ्या शेतीचा, माझ्या श्रमांचा आणि माझ्या मातीचा अभिमान आहे.

प्रश्न एवढाच आहे..ज्या समाजाचे पोट भरतो, त्या समाजाच्या मनात शेतकऱ्याला कधी स्थान मिळणार?

जोपर्यंत या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर मिळत नाही, तोपर्यंत 'अन्नदाता'हा शब्द गौरवाचा नसून समाजाच्या दुटप्पीपणाचा आरसा राहील.

# 'कारभारी', हे वागणे बरं नव्हे? !

राज्यात राम मंदिर दानपेटी दरोडा, पावसाच्या हाहाकाराने झालेल्या दुर्घटना, भाजप आमदार अमित साटम यांनी केलेले वादग्रस्त विधान, मीसिंग लिंक गळतीवर मुख्यमंत्र्यांनी दिलेले स्पष्टीकरण आदी मुद्यांवरून जोरात राजकारण चालू आहे. हे कमी पडत होते की काय म्हणून, डोंबिवलीचा शिवसेनेचा नगरसेवक रमेश म्हात्रे याच्या 'कारनाम्या'ची यात भर पडली.नगरसेवक म्हणून मिरवणा-या या भिकू म्हात्रेवर विविध पोलिस ठाण्यांत एक नव्हे, दोन नव्हे तर, तब्बल १८ गंभीर स्वरूपाचे, तर त्याच्या टपोरी गँगमधील सराईत गुन्हेगारांवरही अनेक गुन्हे दाखल आहेत. म्हात्रे हा 'शिवसेने' चा आणि त्यातही एकनाथ शिंदेंचे सुपूत्र खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या मतदार संघातील असल्याने 'आदूबाळा' ला चांगलाच कंठ फुटला.त्याने त्वरित म्हात्रेंचे नगरसेवक पदच रद्द करण्याची मागणी केली. श्रीकांत शिंदे यांनी सर्व आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले आहे. म्हात्रेवर चोहोबाजुंनी टीका होऊ लागताच, त्याने पत्रकार परिषद घेत दिलगिरी व्यक्त केली. या सर्व घटनांवरून हे 'लोकप्रतिनिधी' आहेत की 'गुंड'? अशी म्हणण्याची वेळ आली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, या तिन्ही निंदनीय घटना असताना डोंबिवलीची घटना वगळता इतर दोन घटनांचा एकाही विरोधी पक्षाने निषेध व्यक्त केला नाही. तसेच, केरळच्या वायनाड येथेही 'भूस्खलन' होऊन काही नागरिकांचा जीव गेला. तेथे काँग्रेसचे सरकार असल्याने; आणि प्रियंका वडेराचा मतदार संघ असल्याने आदूबाळ, उधोजीराव आणि त्यांच्या 'भडगुंज्या' नोकराची 'ब्र' शब्द काढण्याची हिंमत झाली नाही. याचा सरळ अर्थ असा होतो की, त्यांना फक्त एकनाथ शिंदेंनाच 'लक्ष्य' करायचे होते. यावरून, महाराष्ट्रात आज किती स्वार्थी आणि सुडाचे राजकारण चालू आहे, याचे दर्शन होते. तर, आज महाराष्ट्राचे राजकारण मृत्यूशय्येवर आहे की काय'?असा चिंताग्रस्त प्रश्नही पडतो. या घटनांनी मात्र पुन्हा एकदा गुंड कारभा-यांच्या 'भाईगिरी'चा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या पहिल्यांदाच घडलेल्या घटना नाहीत.

मागील वर्षी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांनी व्यासपीठावर एका पोलीस अधिका-याच्या कानाखाली मारण्याचा प्रयत्न केला होता. अधिकारी तावडतोब मागे सरकल्याने वाचला. पण, अपेक्षेप्रमाणे त्याचा स्वाभिमान मात्र दुखावला गेला. दुस-याच दिवशी त्या अधिका-याने राजीनामा देत,तो त्वरित स्वीकारून आपल्याला सेवेतून मुक्त करावे, अशी सरकारला विनंती केली होती. मागच्या पावसाळी अधिवेशनावेळी शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी महाराष्ट्राची मान शरमेने खाली जाईल, असे कृत्य केले होते. त्यांनी विधानभवनाच्या कँटीनमधून जेवण मागितले होते. त्यात भात हा शिळा तर, वरणाला दुर्गंधी येत असल्याचे गायकवाड यांचे म्हणणे होते. खराब जेवण आल्यामुळे साहेब खवळले. जाब विचारण्यासाठी त्यांनी आपल्या समर्थकांसह कँटीन गाठले. जाब विचारण्यात गैर काहीच नव्हते. तेथील तक्रार वहीत ते तक्रार लिहू शकले असते. पण, आमदार असल्याचा 'अहंकार' असल्याने त्यांनी काहीही विचार न करता, काउंटरवर बसलेल्या कर्मचा-याशी वाद घालत, त्याची कॉलर पकडून त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. संतापजनक म्हणजे, गायकवाड हे फक्त बनियन आणि कमरेला टॉवेल गुंडाळलेल्या अवस्थेत होते. निर्लज्जपणाचा कळस म्हणजे, सदर घटनेचे चित्रीकरण करून ते समाज माध्यमावरही टाकण्यात आले होते. मारहाण केल्यानंतर, या महाशयांनीही 'मला कोणताच पश्चाताप होत नाही', अशा मग्रुर भाषेत प्रतिक्रिया दिली होती.

खरेतर, डोंबिवलीच्या घृणास्पद घटनांमुळे विरोधकांना 'आनंदाच्या उकळ्या फुटण्या'ची काहीच गरज नाही. कारण, ते सत्तेवर असताना त्यांचा कारभार हा काही 'धुतल्या तांदळासारखा अजिबात स्वच्छ' नव्हता.



'मविआ' सत्तेवर असताना, जितेंद्र आव्हाड यांनी आंदोलनाच्या नावाखाली चित्रपटगृहात घुसून आपल्या काही समर्थकांसह धुडगूस घातला होता.आजही आव्हाडांवर कोणतीच कारवाई झालेली नाही. मागील पावसाळी अधिवेशना दरम्यान, जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर या आमदारद्वयींमध्ये प्रचंड खडाजंगी झाली होती. तर, त्यांच्या गुंड प्रवृत्तीच्या समर्थकांमध्ये मंदिरासारख्या पवित्र असलेल्या विधानभवन परिसरात तुफान राडा झाला होता. यातही कोणावर कारवाई झाली नाही.

सत्तेच्या ढेपेला मुंगळ्यासारखे चिकटता यावे, यासाठी राजकारणात आकड्यांचे गणित फार महत्त्वाचे असते.आणि हे गणित पूर्ण होण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात अंतर्गत 'साटेलोटे' असते. त्यामुळेच जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी 'यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल', 'एसआयटी स्थापन करू' अशा पोकळ घोषणा करून वेळ मारून नेण्यात येते. प्रत्यक्षात काहीच कारवाई होत नसल्याने; आणि तशी सत्ताधा-यांचीही मनापासून प्रामाणिक इच्छा नसल्याने अशा गुन्हेगार लोकप्रतिनिधींची भीड चेपली जाऊन, काही दिवसांतच ते पुढील 'कारनामा' करण्यास सज्ज होतात.

'मविआ'च्या सरकारमध्ये खुद्द मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलिस महासंचालक, सरकारी वकील यांनी कायदा आणि अधिकार धाब्यावर बसवून अनेक गैरकृत्य केले होते. 'दगडापेक्षा विट मऊ' असा विचार करत,मतदारांनी पुन्हा एकदा अत्यंत विश्वासाने राज्याचा कारभार कार्यक्षम फडणवीस आणि शिंदे यांच्या हाती सोपवला आहे. खासदार श्रीकांत शिंदे हे स्वतः डॉक्टर आहेत. त्यांच्या मतदार संघात हा घृणास्पद प्रकार घडला आहे. डॉक्टरांना मारहाण करणे हा गंभीर गुन्हा तर आहेच. पण, अशा गुन्ह्यासाठी आरोपींना कठोर शिक्षा आणि मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. 'महायुती' सरकार मतदारांच्या विश्वासाला तडा देणार नाही, अशी आशा करूया. कदाचित, उद्या या गुंड लोकप्रतिनिधींना शासन होईल, असे आपण मानु या. खरेतर भ्रष्ट व्यवस्था सुधारणे ही 'काळाची गरज' बनली आहे. अशा या गुंड प्रवृत्तीच्या लोकप्रतिनिधींना एवढेच सांगावेसे वाटते की,'कारभारी, हे वागणं बरं नव्हं!

**प्रदीप खोलमकर**
मो-८७६७५९२९८०

भारत का राजपत्र
The Gazette of India
सी. जी. - एम. एच. अ.-16062026-273487
CG-MH-E-16062026-273487
असाधारण
EXTRAORDINARY
भाग ११-खण्ड ३-उप- खण्ड (ii)
PART II-Section 3 - Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
सं. 2949] नई दिल्ली, शुक्रवार, जून १2, 2026/ ज्येष्ठ 22, 1948
No. 2949] NEW DELHI, FRIDAY, JUNE 12, 2026/JYAISTHA 22, 1948

रेल मंत्रालय
(मध्य रेलवे)
अधिसूचना
मुंबई, १० जून, २०२६

## रेलवे (संशोधन) अधिनियम 2008 की धारा 20A के तहत

**का.आ. ३०५५ (अ).**— केन्द्रीय सरकार ने रेल अधिनियम, 1989 ( 1989 का 24 ), एवं रेलवे (संशोधन) अधिनियम 2008 (2008 का 11 ) (जिसे इसमे इसके पश्चात उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 20 'ए' के खंड (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात की लोक प्रयोजन के लिए, वह भूमि, जिसका संक्षिप्त विवरण इससे उपाबद्ध अनुसूची मे दिया गया है, महाराष्ट्र राज्य के **जलगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती और वर्धा जिला** में **'भुसावल - बडनेरा - वर्धा** 3rd & 4th लाईन (313 किलोमीटर ) ' की विशेष रेल परियोजना के निष्पादन, अनुरक्षण, प्रबंधन, और प्रचालन के लिए अपेक्षित है, ऐसी भूमि का अर्जन करने के आशय कि घोषणा करती है।

उक्त भूमि मे हितबद्ध कोई व्यक्ति, राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन कि तारीख से तीस दिन के भीतर, उक्त अधिनियम कि धारा 20घ कि उप-धारा (1) के अधीन उपर्युक्त प्रयोजन के लिए एसी भूमि के अर्जन और उपयोग के संबंध मे आक्षेप कर सकेगा।

प्रत्येक ऐसा आक्षेप, सक्षम प्राधिकारी अर्थात **उपविभागीय अधिकारी अकोला अकोला भाग, जिला अकोला** महाराष्ट्र को लिखित मे किया जाएगा और उसके आधार उपवर्णित करेगा और सक्षम प्राधिकारी आक्षेपकर्ता को व्यक्तिगत रूप से या विधि व्यवसायी के माध्यम से सुनवाई का अवसर प्रदान करेगा और ऐसे आक्षेपों कि सुनवाई करने तथा ऐसी जांच करने के पश्चात यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा, या तो आक्षेपों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 20 घ की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अधीन आने वाली भूमि का रेखांकन और भूमि के अन्य ब्यौरे उपलब्ध है और हितबद्ध व्यक्ति द्वारा सक्षम प्राधिकारी के उपर्युक्त कार्यालय मे उनका निरीक्षण किया जा सकता है।

### अनुसूची

महाराष्ट्र राज्य के अकोला जिले के अंतर्गत १२ गाँव का विशेष रेल परियोजना 'भुसावल - बडनेरा - वर्धा 3rd & 4th लाईन (313 किलोमीटर )' के लिए अर्जित की जाने वाली भूमि का संरचना या उसके रहित संक्षिप्त विवरण।

| अ. क. | भूमि अधिग्रहण प्रकरणाची संख्या | गावाचे नाव | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का जमीनधारकाचे नाव | सर्वेक्षण संख्या | [illegible] | ७/१२ नुसार कुल क्षेत्रफल (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एलएक्यु-47/ बोंदरखेड - 11/2025-2026 | बोंदरखेड | अकोला | संजय रामभाऊ बोबडे | 120 पैकी | 1 | 1.3800 | 0.1332 |
| 2 | | | | सुलभा संजय बोबडे | 119 पैकी | 1 | 0.9200 | 0.1238 |
| 3 | | | | मंगेश राजाराम पवार | 118 पैकी | 1 | 1.2100 | 0.1527 |
| 4 | | | | महेश रामलखन यादव | 117 पैकी | 1 | 1.2200 | 0.7256 |
| 5 | | | | सुमन बाबाराव ब्राह्मणकर व इतर 1 | 116 पैकी | 1 | 1.1300 | 0.1565 |
| 6 | | | | घनश्याम रामराव कळंब व इतर 1 | 101 पैकी | 1 | 2.6300 | 0.3768 |
| 7 | | | | सचिन पंजाबराव शिरसाठ व इतर 2 | 100 पैकी | 1 | 3.6900 | 0.3452 |
| 8 | | | | सुमन विष्णू आसरे व इतर ३ | 95 पैकी | 1 | 0.8100 | 0.1535 |
| 9 | | | | ईश्वर रुपराव बोबडे | 94 पैकी | 1 | 0.8100 | 0.1912 |
| 10 | | | | उद्धवराव पुंडलिक धांडे | 93 पैकी | 1 | 0.8100 | 0.1674 |
| 11 | | | | स्वप्नील विकास मलमेकर | 92 पैकी | 1 | 1.2400 | 0.2055 |
| 12 | | | | उषा संतोष घटाळे | 91 पैकी | 1 | 0.4600 | 0.0984 |
| 13 | | | | माणिक लक्ष्मण मावळे | 90 पैकी | 1 | 0.4700 | 0.1107 |
| 14 | | | | प्रमोद नागोराव चोपडे | 89 पैकी | 1 | 0.4700 | 0.0938 |
| 15 | | | | मंनकर्णाबाई यमाजी सुरवाडे व इतर 4 | 87 पैकी | 1 | 0.4700 | 0.0967 |
| 16 | | | | खुशाल श्याम अग्रवाल व इतर 1 | 86 पैकी | 1 | 1.2100 | 0.8185 |
| 17 | | | | गुलाबराव शालीग्राम पावसे व इतर 1 | 85 पैकी | 1 | 1.2400 | 0.1884 |
| 18 | | | | सुरेंद्र आत्माराम बोबडे | 82 पैकी | 1 | 0.6400 | 0.1557 |
| 19 | | | | प्रदीप दिलीप देशमुख व इतर 1 | 81 पैकी | 1 | 1.0200 | 0.1614 |
| 20 | | | | गजानन शालीग्राम कोठाळे व इतर 2 | 79 पैकी | 1 | 1.6600 | 0.3634 |
| 21 | | | | रामराव किसन मावंडे | 78 पैकी | 1 | 1.6400 | 0.2468 |
| 22 | | | | ज्ञानदेव सूर्यभान डोंगरे | 75 पैकी | 1 | 1.4200 | 0.2125 |
| 23 | | | | विमल उत्तम बोरकर व इतर 8 | 71 पैकी | 1 | 3.2300 | 0.9552 |
| 24 | | | | शबुबी बिसमिल्लाशा व इतर 4 | 70 पैकी | 1 | 1.5600 | 0.2290 |
| 25 | | | | गजानन पांडुरंग आसरे | 69 पैकी | 1 | 0.8100 | 0.1870 |
| 26 | | | | रमेश मारोती अंभोरे व इतर 1 | 65 पैकी | 1 | 1.7000 | 0.9794 |
| 27 | | | | क्रांती राजेंद्र तेलगोटे व इतर 1 | 64 पैकी | 1 | 1.8200 | 0.7000 |
| | | | | | | कुल | 35.6700 (हे.आर.) | 8.3283 (हे.आर.) |

| अ. क. | भूमि अधिग्रहण प्रकरणाची संख्या | गावाचे नाव | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का जमीनधारकाचे नाव | सर्वेक्षण संख्या | [illegible] | ७/१२ नुसार कुल क्षेत्रफल (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | सैजाकीर सै. बसीर | 627/1 | 1 | 2.8900 | 0.2025 |
| 2 | | | | सै ताहीर सै. जाकीर व इतर 3 | 627/2 | 1 | 4.0400 | |
| 3 | | | | श्री राधाकृष्ण संस्था बोरगाव मंजु तर्फेअ. प्रकाश शिवराम देशमुख व इतर 1 | 654/1 पैकी | 1 | 4.8600 | 0.9831 |
| 4 | | | | राधाकृष्ण संस्थान वो.म. गुणवंत शिवराम देशमुख | 654/2 पैकी | 1 | 2.6800 | |
| 5 | | | | विशाल प्रकाश वाडेवाले व इतर 4 | 659/1 पैकी | 1 | 2.7500 | 0.2742 |
| 6 | | | | पदमीनी नारायणराव बागडे | 659/3 पैकी | 1 | 0.8400 | |
| 7 | | | | रत्नाकर शंकरराव बागडे व इतर 7 | 659/4 पैकी | 1 | 3.8300 | |
| 8 | | | | फुलवंताबाई दामोदर बागडे | 659/5 पैकी | 1 | 0.8400 | |
| 9 | | | | शेवानंद अवधूत बागडे व इतर 2 | 659/6 पैकी | 1 | 0.8400 | |
| 10 | | | | नाजीमोद्दीन जलालोद्दीन व इतर 2 | 663/1 पैकी | 1 | 2.3400 | 0.3563 |
| 11 | | | | गजानन रामभाऊ गमे व इतर 1 | 663/2 पैकी | 1 | 2.7400 | |
| 12 | | | | रत्नाकर शंकरराव बागडे व इतर 1 | 664/1 पैकी | 1 | 1.6200 | 1.5744 |
| 13 | | | | महादेव पुंडलिक बागडे | 664/2 पैकी | 1 | 1.6200 | |
| 14 | | | | प्रशांत देवराव बागडे व इतर 2 | 664/3 पैकी | 1 | 1.6200 | |
| 15 | | | | रत्नाकर शंकरराव बागडे व इतर 6 | 664/4 पैकी | 1 | 1.6200 | |
| 16 | एलएक्यु-47/बोरगाव मंजु-1/19/2025-2026 | बोरगाव मंजु भाग 1 | अकोला | राजेश गोपालदास अग्रवाल व इतर 1 | 664/5 पैकी | 1 | 2.3600 | |
| 17 | | | | मागीराबी मे. इजाज | 665/1 पैकी | 1 | 2.4300 | |
| 18 | | | | से. खालिद से. अय्युब व इतर 6 | 665/2 पैकी | 1 | 5.4600 | |
| 19 | | | | सैय्यद मोहेल सैय्यद एजाज व इतर 11 | 673 पैकी | 1 | 6.3900 | |
| 20 | | | | सै. वाजीद सै. रशीद व इतर 1 | 675/1 पैकी | 1 | 0.6000 | |
| 21 | | | | पुरुषोत्तम श्रीनारायण अग्रवाल | 675/2 पैकी | 1 | 0.3900 | |
| 22 | | | | काशीनाथ नामदेव मुळे व इतर 1 | 675/2/1 पैकी | 1 | 0.0205 | |
| 23 | | | | राजकुमार विश्वनाथ मुळे | 675/2/2 पैकी | 1 | 0.0176 | |
| 24 | | | | रत्नकलाबाई विश्वनाथ मोनोने | 675/2/3 पैकी | 1 | 0.0176 | |
| 25 | | | | अयोध्या पुरई खरेबीन | 675/2/4 पैकी | 1 | 0.0176 | |
| 26 | | | | अयोध्या पुरई खरेबीन | 675/2/5 पैकी | 1 | 0.0172 | |
| 27 | | | | धर्मराज रमेश यादव व इतर 1 | 675/2/6 पैकी | 1 | 0.0150 | |
| 28 | | | | सखाराम तारा वाघमारे | 675/2/7 पैकी | 1 | 0.0150 | |
| 29 | | | | मो. युनुस मो. याकुब | 675/2/8 पैकी | 1 | 0.0150 | |
| 30 | | | | मो. अंजार प्यार मोहम्मद शेख | 675/2/9 पैकी | 1 | 0.0150 | |
| 31 | | | | सैय्यद साबीर सैय्यद नझीर | 675/2/10 पैकी | 1 | 0.0155 | |
| 32 | | | | सैय्यद साबीर सैय्यद नझीर | 675/2/11 पैकी | 1 | 0.0168 | |
| 33 | | | | मो. अंजार प्यार मोहम्मद शेख | 675/2/12 पैकी | 1 | 0.0150 | |
| 34 | | | | मो. युनुस मो. याकुब | 675/2/13 पैकी | 1 | 0.0150 | |
| 35 | | | | मो. इलियास मो. याकुब | 675/2/14 पैकी | 1 | 0.0150 | |

| अ. क. | भूमि अधिग्रहण प्रकरणाची संख्या | गावाचे नाव | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का जमीनधारकाचे नाव | सर्वेक्षण संख्या | [illegible] | ७/१२ नुसार कुल क्षेत्रफल (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 36 | | | | धर्मराज रमेश यादव व इतर 1 | 675/2/15 पैकी | 1 | 0.0150 | |
| 37 | | | | अयोध्या पुरई खरेबीन | 675/2/16 पैकी | 1 | 0.0172 | |
| 38 | | | | अयोध्या पुरई खरेबीन | 675/2/17 पैकी | 1 | 0.0176 | |
| 39 | | | | अजय विनोदकुमार खरेबीन व इतर 5 | 675/2/18 पैकी | 1 | 0.0176 | |
| 40 | | | | रामलाल रामअवतार पाल व इतर 5 | 675/2/19 पैकी | 1 | 0.0176 | |
| 41 | | | | काशीनाथ नामदेव मुळे व इतर 1 | 675/2/20 पैकी | 1 | 0.0163 | |
| 42 | | | | खुली जागा सार्वजनिक भूखंड | 675/2/21 पैकी | 1 | 0.0571 | |
| 43 | | | | मे विशाल निर्मिती प्रा.लि. डायरेक्टर पवनकुमार विठ्ठलदास तापडिया | 675/2/3 पैकी | 1 | 0.0189 | |
| 44 | | | | से. जमशीद से. हाशम व इतर 6 | 675/2/4 पैकी | 1 | 3.3200 | |
| 45 | | | | से. उस्मान से. जानमहमंद व इतर 6 | 674/1 पैकी | 1 | 2.8700 | 0.3861 |
| 46 | | | | से. नदीम से. रहीम | 674/2 पैकी | 1 | 2.3000 | |
| 47 | | | | से. जमशिद से. हाशम | 674/3 पैकी | 1 | 2.3000 | |
| | | | | | | कुल | 63.9551 (हे.आर.) | 6.7459 (हे.आर.) |
| 1 | एलएक्यु-47/मिर्झापूर/09/2025-2026 | मिर्झापूर | अकोला | शांताराम भैयालाल चौधरी व इतर 1 | 74/1 पैकी | 1 | 2.2300 | 0.0303 |
| 2 | | | | उदय रमेशराव देशमुख | 74/1/3 पैकी | 1 | 1.6900 | |
| 3 | | | | वृदाताई ज मदशिव बंड व इतर 1 | 74/2 पैकी | 1 | 4.3800 | |
| 4 | | | | बिलकीस बेगम सैय्यद कय्युम व इतर 3 | 90 पैकी | 1 | 7.3700 | 0.0513 |
| 5 | | | | सै तकरिम सै नईम | 91/1 पैकी | 1 | 2.3700 | 0.1499 |
| 6 | | | | मनोहर नागोजी घटाळे व इतर 2 | 91/2 पैकी | 1 | 2.3600 | |
| 7 | | | | प्रशांत सुधाकर नागो | 94/1 पैकी | 1 | 0.5500 | 0.1116 |
| 8 | | | | प्रशांत सुधाकर नागो | 94/2 पैकी | 1 | 0.5300 | |
| 9 | | | | प्रशांत सुधाकर नागो | 94/3 पैकी | 1 | 0.5300 | |
| | | | | | | कुल | 22.0100 (हे.आर.) | 0.3431 (हे.आर.) |
| 1 | एलएक्यु-47/बोरगांव मंजु भाग 3/2025-2026 | बोरगाव मंजु भाग-3 | अकोला | दिलीप वामनराव गवई | 353/1 | 1 | 2.1400 | 0.0524 |
| 2 | | | | केशव पुंजाजी व इतर 2 | 353/1/अ | 1 | 1.6200 | |
| 3 | | | | रंजना अशोकराव खेडकर | 353/2 | 1 | 0.9200 | |
| 4 | | | | रेणुका पुंजाजी व इतर 2 | 452/1 पैकी | 1 | 0.8100 | 0.1630 |
| 5 | | | | विजय उर्फ विरमणी तुकाराम जामनिक | 452/अ पैकी | 1 | 1.5900 | |
| | | | | | | कुल | 7.0800 (हे.आर.) | 0.2154 (हे.आर.) |
| 1 | एलएक्यु-47/तानखेड /10/2025- | तानखेड | अकोला | रामकृष्ण नामदेव गोलाईत व इतर 7 | 18 पैकी | 1 | 7.1900 | 0.0819 |
| 2 | | | | गजानन धनराज मावंडे व इतर 1 | 19 पैकी | 1 | 2.8300 | 0.087 |

| अ. क. | भूमि अधिग्रहण प्रकरणाची संख्या | गावाचे नाव | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का जमीनधारकाचे नाव | सर्वेक्षण संख्या | [illegible] | ७/१२ नुसार कुल क्षेत्रफल (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 2026 | | | शेख आसीफ शेख हबीब व इतर 2 | 21 पैकी | 1 | 4.7300 | 0.1833 |
| 4 | | | | सुशिला कौलास भालतिलक | 22 पैकी | 1 | 1.3400 | 0.0055 |
| 5 | | | | गणेश मधुकर गावंडे | 111 पैकी | 1 | 2.0000 | 0.0904 |
| 6 | | | | अर्चना संदीप आहेर व इतर 2 | 112 पैकी | 1 | 2.5200 | 0.344 |
| 7 | | | | अभजीत मनोहर धरडे व इतर 3 | 113 पैकी | 1 | 1.0800 | 0.1528 |
| 8 | | | | गौतम धर्माजी धरडे | 114 पैकी | 1 | 2.7000 | 0.107 |
| 9 | | | | अनिल जनार्दन मेश्राम | 116 पैकी | 1 | 1.8500 | 0.3154 |
| 10 | | | | पांडुरंग बळवंत मावंडे | 117 पैकी | 1 | 1.2200 | 0.1188 |
| 11 | | | | उषा अशोक गोलाईत व इतर 1 | 119 पैकी | 1 | 2.9900 | 0.172 |
| 12 | | | | आशिषकुमार मारोती मेश्राम | 120 पैकी | 1 | 3.6100 | 0.1359 |
| 13 | | | | कुसुमबाई बाबाराव देशमुख व इतर 6 | 121 पैकी | 1 | 1.6200 | 0.0272 |
| 14 | | | | अधिकार अभिलेखप्रमाणे | गावठाण – 2 | - | 2.5942 | 0.0115 |
| | | | | | | कुल | 38.2742 (हे.आर.) | 1.8327 (हे.आर.) |
| 1 | एलएक्यु-47/सिसा/15/2025-2026 | सिसा | अकोला | मनोहर बाबाराव हागवणे व इतर 6 | 37 पैकी | 1 | 0.6800 | 0.0105 |
| 2 | | | | अन्नपूर्णा महादेव जामनीक व इतर 4 | 38 पैकी | 1 | 0.6900 | 0.0128 |
| 3 | | | | नंदु रामकृष्ण भवाने | 39 पैकी | 1 | 0.6900 | 0.0079 |
| 4 | | | | तेजराव देविदास हागवणे व इतर 13 | 40 पैकी | 1 | 5.7300 | 0.0014 |
| | | | | | | कुल | 7.7900 (हे.आर.) | 0.0326 (हे.आर.) |

रविवार, दि. १२ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# घोषणांचा गाजावाजा, विकास मात्र ठप्प? नगराध्यक्ष-नगरसेवक निष्क्रिय,नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

**'प्रशासकीय कारभारच बरा होता', नागरिकांसह कर्मचाऱ्यांचा ही सूर.. निधीअभावाचे कारण पुढे करून विकासकामांना ब्रेक?**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** यवतमाळ नगर परिषदेच्या निवडणुकीनंतर शहराच्या विकासाला गती मिळेल, प्रत्येक प्रभागातील रखडलेली कामे मार्गी लागतील आणि लोकप्रतिनिधी थेट नागरिकांच्या समस्या सोडवतील, अशी अपेक्षा यवतमाळकरांनी व्यक्त केली होती. मात्र निवडणुकीनंतर तब्बल सहा महिने उलटूनही शहरातील विकासकामांना अपेक्षित वेग मिळालेला नसल्याने नगराध्यक्ष आणि नगरसेवकांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नगर परिषदेत प्रशासकीय कारभार सुरू असताना तत्कालीन प्रभारी मुख्याधिकारी माधुरी मडावी, दादाराव डोलारकर आणि त्यानंतर शुभम क्यातमवार यांनी अनेक विकासकामांना चालना दिली होती. त्यांच्या कार्यकाळात मर्यादित अधिकार असूनही विविध कामे मार्गी लागल्याचे नागरिक सांगतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींपेक्षा प्रशासकीय कारभार अधिक प्रभावी होता, अशी प्रतिक्रिया आता नगर परिषद कर्मचाऱ्यांसह अनेक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी निवडणुकीदरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आदिवासी विकास मंत्री अशोक उईके,आणि माजी आमदार मदन येरावार यांच्या माध्यमातून नगर परिषदेला निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे आश्वासन दिले होते. मात्र काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर नगर परिषदेकडे निधीअभाव असल्याचे सांगत रस्ते व नाल्यांची कामे उशिरा सुरू होतील, असे स्पष्टीकरण देण्यात आले.दरम्यान, शहरातील बहुतांश प्रभागांमध्ये रस्ते, नाल्या, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांची कामे रखडलेली आहेत. तसेच शहराच्या मुख्य रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर मोठ्या प्रमाणात होत असून शहरांमध्ये अपघाताचे प्रमाण सुद्धा वाढत आहे.तसेच नगरसेवकांना त्यांच्या प्रभागांसाठी आवश्यक निधीच उपलब्ध होत नसल्याची चर्चा असून त्यामुळे विकासकामे ठप्प असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे कोट्यवधी रुपयांच्या मोठ्या प्रकल्पांना मंजुरी मिळत असताना नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित छोट्या पण अत्यावश्यक कामांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य,विस्कळीत स्वच्छता आणि रखडलेली विकासकामे पाहता "सत्ता बदलली, पण परिस्थिती बदलली नाही," अशी संतप्त भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. सत्ताधारी पक्षाचे सरकार राज्यात असतानाही शहराचा विकास रखडत असल्याने, आश्वासनांचा पाऊस आणि विकासाचा दुष्काळ अशीच परिस्थिती यवतमाळकरांच्या वाट्याला आली आहे का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# महावितरण कंपनीला सात दिवसांचा अल्टिमेटम

## अन्यथा ३५ गावांचा मोर्चा, सहाय्यक अभियंता राहुल नाखले यांच्या बदलीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ११ :** महावितरण कंपनीच्या मनमानी आणि अनागोंदी कारभाराविरोधात उमरखेड-ढाणकी परिसरातील जनता आणि सर्वपक्षीय नेते कमालीचे आक्रमक झाले आहेत. प्रशासनाने लादलेली स्मार्ट मीटरची सक्ती, ग्राहकांना पाठवण्यात आलेली अवाजवी वीज बिलं आणि देखभाल-दुरुस्तीच्या कामांमधील कथित गैरव्यवहार यांविरोधात ढाणकी येथे एका आंदोलनाची ठिणगी पडली आहे.

महावितरणने सात दिवसांच्या आत आपल्या कारभारात सुधारणा न केल्यास, येत्या १६ जुलै रोजी ३५ गावांचा विराट महामोर्चा काढण्याचा जाहीर इशारा सर्वपक्षीय कृती समितीने दिला आहे. या संदर्भातील मागण्यांचे निवेदन गुरुवारी ९ जुलै रोजी महावितरणचे यवतमाळ येथील अधीक्षक अभियंता आणि बिटरगाव पोलिस ठाण्याचे ठाणेदार यांना संयुक्तपणे देण्यात आले. निवेदनात महावितरणच्या मनमानी कारभारावर कडाडून टीका करण्यात आली आहे. वीज ग्राहकांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता, केवळ फॉल्टी मीटर (दोषी मीटर) असल्याचे कारण पुढे करून जुने मिटर बदलले जात आहेत आणि त्याऐवजी 'स्मार्ट मीटर' सक्तीने बसवले जात असल्याचा आरोप नेत्यांनी केला आहे. हा ग्राहकांच्या खिशावर दरोडा असून ही सक्ती तातडीने थांबवण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर, मे महिन्यात सर्वसामान्य वीज ग्राहकांना थेट २५० युनिटचे वाढीव बिल कोणत्या आधारावर देण्यात आले, असा संतप्त सवाल या निवेदनातून विचारण्यात आला

# वारंवार फुटणाऱ्या पाईप लाईनने सिंचन नगर त्रस्त..!

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा विरोधात आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कथित हलगर्जीपणामुळे यवतमाळ शहरातील सिंचन नगर भाग क्रमांक १ मधील नागरिकांना गेल्या अनेक महिन्यांपासून गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वारंवार फुटणाऱ्या पाणीपुरवठा पाईपलाईनमुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून वाहतूक धोकादायक बनली आहे. अनेक तक्रारी करूनही केवळ तात्पुरती दुरुस्ती केली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, कायमस्वरूपी उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पाईपलाईन फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असून रस्त्यांची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. पावसाळ्यात पावसाचे व गळतीचे पाणी एकत्र साचून रस्ता चिखलमय होत असल्याने शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दुचाकीस्वारांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. अनेक ठिकाणी नागरिक घसरून पडण्याच्या घटनाही घडत असल्याचा दावा करण्यात आला. याशिवाय फुटलेल्या पाईपलाईनमुळे दूषित पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळण्याची शक्यता निर्माण झाल्याने जलजन्य आजारांचा धोका वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. परिसरातील जनावरांनाही साचलेल्या दूषित पाण्यामुळे त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गेल्या तीन महिन्यांपासून वारंवार तक्रारी करूनही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा एकही वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष पाहणीसाठी आला नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला. स्थानिक लोक प्रतिनिधींनीही या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली. सिंचन नगर भाग क्रमांक १ मधील नागरिकांनी पाईपलाईनची कायमस्वरूपी दुरुस्ती, रस्त्याची तातडीने पुनर्बांधणी, दूषित पाणीपुरवठा रोखणे आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल आणि त्यास सर्वस्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जबाबदार राहील, असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला.

# महागाव ग्रामपंचायत कर्मचारी मेळावा उत्साहात..!

**नवीन तालुका कार्यकारिणीची निवड**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**महागाव, दि. ११ :** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन (र. नं. एनजीपी ४५११), जिल्हा यवतमाळच्या नियोजित दौऱ्या निमित्त महागाव तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा तालुका मेळावा, आढावा सभा व नवीन कार्यकारिणी निवड कार्यक्रम शुक्रवारी भक्ती मंगल कार्यालय, उमरखेड रोड, महागाव येथे उत्साहात पार पडला. सभेच्या अध्यक्षस्थानी युनियनचे संस्थापक सरचिटणीस तथा जिल्हाध्यक्ष गिरीश दाभाडकर होते.

प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा सचिव स्वप्नील बेलखेडे, जिल्हा कार्याध्यक्ष अरविंद इंगोले, जिल्हा उपाध्यक्ष गणेश चव्हाण, जिल्हा सहसचिव विशाल सूर्यवंशी, जिल्हा संघटक अक्षय लिल्हारे तसेच आर्णी तालुका अध्यक्ष विकास इंगोले उपस्थित होते. सभेत मागील बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी, तालुका संघटनेच्या कामकाजाचा आढावा, मागील दोन वर्षांच्या आर्थिक अहवालाची तपासणी तसेच २०२६ ची वार्षिक वर्गणी तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर जमा करण्याबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर ही चर्चा करण्यात आली. यानंतर महागाव तालुका शाखेची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. गजानन हरणे यांची तालुकाध्यक्ष, अरविंद राठोड यांची उपाध्यक्ष, वंदना रावते यांची महिला उपाध्यक्ष, सुदर्शन खंदारे यांची सचिव, पंजाबराव देशमुख यांची सहसचिव, अविनाश राठोड यांची कार्याध्यक्ष तर दत्तराव चव्हाण यांची मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली. तसेच विविध सदस्यांची ही नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाला तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



### शेतकऱ्यांच्या फसव्या कर्ज माफिचा निदर्शने,करीत जी.आर.ची होळी

**पांढरकवडा :** यवतमाळ जिल्हा किसान सभा जिल्हा कमेटीच्या वतीने पांढरकवडा उपविभागीय कार्याल्यावर निदर्शने करीत जीआरची होळी करण्यात आली. शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफी करा,महाराष्ट्र सरकारने केलेली. शेतकऱ्यांची कर्ज माफी ही शेतकऱ्याची फसवी कर्ज माफी असून या कर्ज माफिच्या जी आर चा निषेध करीत जीआरची होळी करण्यात आली. शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा ही प्रमुख मागणी होती.महाराष्ट्र सरकार मुख्यमंत्री यांनी निवडणूक काळात संपूर्ण कर्ज माफिची घोषणा चे आश्वासने दिले,सातबारा कोरा करीन अशी आश्वासणे दिली मात्र आज रोजी कर्ज माफ करतांना शेताकऱ्यांच्या जाचक अटी लावून त्या जाचक अटीवर चर्चा करण्यासाठी समिती निवड करीत आज, उद्या, करीत तारीख पे तारीख देत परत परवा शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याने. या कर्ज माफिच्या जीआरची होळी करून उपविभागीय कार्यालय यांच्यामार्फत मुख्यमंत्रीच्या नावे निवेदन पाठविण्यात आले. या वेळी किसान सभा जिल्हाअध्यक्ष कॉ. चंद्रशेखर सिडाम जिल्हा कमेटी सदस्य, प्रकाश संकलवार, किसन सभा तालुका-कमेटी अध्यक्ष दिलीप कुमरे, अर्जुन आत्राम

### दहावी, बारावी पास भटक्या विमुक्त मुलामुलींसाठी पुण्यात मोफत नर्सिंग कोर्स

**यवतमाळ :** पुणे येथील टिळक विद्यापीठामार्फत भटक्या विमुक्त मुलामुलींसाठी नर्सिंग कोर्स सुरु करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १७ वर्ष पूर्ण असलेल्या इच्छुक भटक्या विमुक्त मुलामुलींनी इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन सहायक संचालक ओमप्रकाश नगराळे यांनी केले आहे.

भटक्या विमुक्त मुलामुलींसाठी पुणे येथील टिळक विद्यापीठ गेल्या दोन वर्षांपासून नर्सिंग कोर्स यशस्वीपणे राबवित आहे. निराधार, गरजू आणि पुढील शिक्षण घेण्याची तयारी नसलेल्यांसाठी या विद्यापीठ मान्य प्रमाणपत्र कोर्सद्वारे चांगली नोकरी मिळवून देत आहेत. सध्या देश-विदेशात नर्सिंगची प्रचंड मागणी असून एका वर्षात १०० टक्के नोकरी मिळत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या नर्सिंग कोर्स साठी अर्जासोबत आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, १० वी किंवा १२ वीची गुणपत्रिका आदी कागदपत्रे जोडावीत. वय १७ वर्षे पूर्ण असलेल्या व नर्सिंग कोर्ससाठी पात्र व इच्छूक असलेल्या विद्यार्थिनींनी कार्यालयीन वेळेत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, यवतमाळ यांच्या कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक ओमप्रकाश नगराळे यांनी केले आहे.

# पुसद मतदारसंघात रविवारी 'एसआयआर' विशेष कॅम्प..!

## मतदारांना गणना पत्रक भरून देण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ११ :** पुसद विधानसभा मतदारसंघात मतदान यादीच्या सखोल विशेष पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सर्व मतदान केंद्रांवर विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पमध्ये मतदारांनी उपस्थित राहून गणना पत्रक भरून द्यावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी, पुसद विधानसभा मतदारसंघ यांनी केले आहे.

या विशेष कॅम्पमध्ये सहभागी होताना प्रत्येक मतदाराने आपले मतदार ओळखपत्र, आधार कार्डची प्रत तसेच रंगीत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र सोबत आणावे. मतदान केंद्रावरील मतदान केंद्रस्तरिय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडून गणना पत्रक प्राप्त करून ते तात्काळ अचूक माहितीने भरून बीएलओ यांच्याकडे जमा करावे. मतदार यादी अद्ययावत व अचूक ठेवण्यासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे पुसद विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र मतदारांनी या विशेष कॅम्पचा लाभ घ्यावा व बीएलओ यांना सहकार्य करून गणना पत्रक वेळेत सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हक्काच्या मास्तरांच्या लढ्याला अखेर यश..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ११ :** प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक महिन्यांपासून रखडलेला विद्यार्थ्यांचा डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (डीबीटी) निधी अखेर संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा 'हक्काचे मास्तर' म्हणून ओळखले जाणारे गौरीनंदन कन्नाके यांच्या सातत्यपूर्ण कायदेशीर पाठपुराव्यामुळे सुमारे २ हजार विद्यार्थ्यांना या निधीचा लाभ मिळाल्याने विद्यार्थी व पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

डीबीटीची रक्कम न मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांवर परिणाम होत होता. याची गंभीर दखल घेत कन्नाके यांनी संबंधित विभागाकडे वारंवार निवेदने, स्मरणपत्रे आणि कायदेशीर पत्रव्यवहार करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यानंतर त्यांनी उपोषणाचा इशाराही दिला. त्यानंतर प्रशासनाने प्रकरण गांभीर्याने घेत निधी वितरणाची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली. दरम्यान, तांत्रिक कारणांमुळे ९२ विद्यार्थ्यांच्या खात्यातील रक्कम तात्पुरती परत गेल्याचे समोर आले आहे. या विद्यार्थ्यांनाही लवकरात लवकर लाभ मिळावा यासाठी संबंधित त्रुटी दूर करण्याचा पाठपुरावा सुरू असल्याचे कन्नाके यांनी सांगितले. शेवटच्या पात्र विद्यार्थ्याच्या खात्यात डीबीटीची रक्कम जमा होईपर्यंत आमचा लढा सुरूच राहील. विद्यार्थ्यांच्या हक्कावर कुठलाही अन्याय होऊ देणार नाही,अशी भूमिका गौरीनंदन कन्नाके यांनी व्यक्त केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

# अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या सुसाट दुचाकींना लगाम घाला!

## कठोर कारवाईसाठी पोलिसांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. ११ :** शहरात अल्पवयीन आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून विनापरवाना व भरधाव वेगाने दुचाकी चालविण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे गंभीर अपघातांची शक्यता निर्माण झाली असून, यावर आळा घालण्यासाठी शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने पांढरकवडा पोलीस स्टेशनला निवेदन देऊन कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. शहरात अनेक शाळा-महाविद्यालये असून विद्यार्थी खासगी शिकवणीसाठी मोठ्या प्रमाणावर ये-जा करतात. परवाना नसतानाही अनेक अल्पवयीन विद्यार्थी सुसाट दुचाकी चालवत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे आणि नियम मोडणाऱ्या विद्यार्थ्यांवर कायदेशीर कारवाई व्हावी, असे निवेदनात म्हटले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा विषय अत्यंत गंभीर असल्याचे स्पष्ट केले. तर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी अल्पवयीन विद्यार्थ्यांचे बेकायदेशीर वाहन चालविणे थांबविण्यासाठी पोलिसांनी तातडीने विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी केली. पोलिसांच्या कारवाईमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती होऊन भविष्यातील संभाव्य अपघात टाळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा महाविद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

# १७ वर्षांचा न्यायालीन लढ्यात ठाकूर यांना न्यायिक विजय..!

## खोट्या गुन्ह्यात गोवणाऱ्या तत्कालीन ठाणेदारावर कारवाईचे न्यायालयाचे आदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** पुसद येथे २००९ मध्ये घडलेल्या दंगल व खुनाच्या प्रकरणात खोट्या गुन्ह्यांत गोवण्यात आल्याचा दावा करणारे भाजपचे निष्क्रिय ठरविलेले तत्कालीन तालुकाध्यक्ष ॲड. अनिल ठाकूर यांना तब्बल १७ वर्षांनंतर न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे.

त्याचबरोबर या प्रकरणातील तपासात गंभीर त्रुटी व अधिकारांचा गैरवापर झाल्याचे निरीक्षण नोंदवत तत्कालीन ठाणेदार ज्ञानेश्वर कडू यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचे आदेश पुसद येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने दिले. यासंदर्भात माहिती देण्याकरिता स्थानिक विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी त्यांनी आपल्या सतरा वर्षाचा संपूर्ण कार्यकाळ पत्रकार परिषदेत उलगडला. १ जुलै २०२६ रोजी झालेल्या निकालात न्यायालयाने तपास प्रक्रियेतील अनेक विसंगतींची दखल घेतली. ३ एप्रिल २००९ रोजी रामनवमीच्या शोभायात्रेनंतर घडलेल्या घटनांमध्ये राजकीय सूडबुद्धीतून आपल्याला प्रमुख आरोपी करण्यात आल्याचा दावा ठाकूर यांनी सातत्याने केला होता. या प्रकरणात गुन्हे क्रमांक ५४/२००९, ६६/२००९ व ७०/२००९ अंतर्गत त्यांच्यावर गंभीर आरोप ठेवण्यात आले होते. सुनावणीदरम्यान तत्कालीन पीएसआय पुरुषोत्तम ईटनारे यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे तत्कालीन ठाणेदारांच्या सांगण्यावरून फिर्याद दिल्याचे न्यायालयात नमूद केल्याचा उल्लेख करण्यात आला. तसेच घटनास्थळ पंचनामा, साक्षीदारांचे उशीरा नोंदविलेले जबाब आणि दस्तऐवजांतील कथित खोडाखोड यासंदर्भातील बाबीही न्यायालयासमोर मांडण्यात आल्या. त्यानंतर न्यायालयाने तपासातील त्रुटींवर गंभीर निरीक्षणे नोंदवून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाईचे निर्देश दिले. निर्दोष मुक्ततेनंतर ॲड. अनिल ठाकूर यांनी संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी, संबंधित दस्तऐवजांची न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणी आणि दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. खोट्या गुन्ह्यांमुळे साडेचार महिन्यांचा कारावास, सामाजिक व राजकीय नुकसान सहन करावे लागल्याचे त्यांनी म्हटले आहे.

> **"खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांनाही कायद्यापुढे उभे करावे"**
>
> **"१७ वर्षांच्या संघर्षानंतर न्यायालयाने सत्याला न्याय दिला. खोटे गुन्हे दाखल करून एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या अधिकाऱ्यांवर केवळ विभागीय नव्हे तर कठोर फौजदारी कारवाई झाली पाहिजे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून जबाबदार प्रत्येक व्यक्तीला कायद्यापुढे उभे करावे.**
>
> **— ॲड. अनिल ठाकूर**

# जिल्हाधिकारी विकास मीना यांच्याकडून एसआयआरच्या कामाचा आढावा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** जिल्ह्यात सध्या मतदान यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम सुरु आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पुसद, आर्णी तालुक्यातील लोणबेहळ, महागाव तालुक्यातील गुंज, शिरपूर तसेच यवतमाळ मधील प्रभाग २६ गणेश नगर येथील गजानन महाराज मंदिर येथे भेट दिली.

या ठिकाणी सुरु असलेल्या मतदान यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कामाचा आढावा त्यांनी घेतला. या दरम्यान महागाव येथे मतदान केंद्रस्तरिय अधिकारी यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाला भेट देवून मार्गदर्शन केले. या भेटीवेळी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मतदान यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणची कामे गांभीर्याने पूर्ण करण्याच्या सूचना मतदान केंद्रस्तरिय अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके, यवतमाळचे उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, नगरसेवक, बीएलओ, बुथ प्रमुख, पदाधिकारी उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ अकोला ■ रविवार, १२ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com




| अ. क्र. | भूमि अधिग्रहण प्रकरणाची संख्या | गावाचे नाव | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का जमीनधारकाचे नाव | सर्वेक्षण संख्या | [illegible] | ७/१२ नुसार कुल क्षेत्रफळ (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एलएक्यु-47/बिरसिंगपुर/13/2025-2026 | बिरसिंगपुर | अकोला | नरेंद्र मधुकरराव शिंगनापुरे व इतर 3 | 20 पैकी | 1 | 4.3500 | 0.0825 |
| 2 | | | | किशोर वामन बोळे व इतर 7 | 22 पैकी | 1 | 2.0300 | 0.2033 |
| | | | | | | कुल | 6.3800 (हे.आर.) | 0.2858 (हे.आर.) |
| 1 | एलएक्यु-47/कुरणखेड/12/2025-2026 | कुरणखेड | अकोला | चंद्रमणी साहेबराव उके | 119 पैकी | 1 | 1.6800 | 0.0062 |
| 2 | | | | लिलाबाई रामचंद्र कोथळकर व इतर 4 | 118 पैकी | 1 | 1.5100 | 0.0535 |
| 3 | | | | प्रविण रामचंद्र कोथळकर | 117 पैकी | 1 | 0.8100 | 0.0249 |
| 4 | | | | ओंकार बारकाजी व इतर 1 | 116 पैकी | 1 | 0.8100 | 0.0353 |
| 5 | | | | नंदु आकाराम कोगदे व इतर 1 | 115 पैकी | 1 | 2.0000 | 0.0554 |
| 6 | | | | सुदर्शन श्रीकृष्ण कोगदे | 114 पैकी | 1 | 1.2100 | 0.0407 |
| 7 | | | | गोपाल पुंजाजी देंगे व इतर 17 | 111 पैकी | 1 | 1.5800 | 0.1358 |
| 8 | | | | सुरेंद्र भाऊराव देशमुख व इतर 3 | 91 पैकी | 1 | 7.7800 | 0.5489 |
| | | | | | | कुल | 17.3800 (हे.आर.) | 0.9007 (हे.आर.) |
| 1 | एलएक्यु- | [illegible] | अकोला | संतोष कृष्णा गावंडे | 45 पैकी | 1 | 1.7800 | 0.1453 |

| अ. क्र. | भूमि अधिग्रहण प्रकरणाची संख्या | गावाचे नाव | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का जमीनधारकाचे नाव | सर्वेक्षण संख्या | [illegible] | ७/१२ नुसार कुल क्षेत्रफळ (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 47/पावसखेड/16/2025-2026 | | | उषाताई हनुमान गावंडे व इतर 2 | 46 पैकी | 1 | 3.4000 | 0.1879 |
| 3 | | | | रघुनाथ नारायण जांभे | 47 पैकी | 1 | 3.2600 | 0.3222 |
| 4 | | | | रघुनाथ नारायण जांभे | 48 पैकी | 1 | 1.4400 | 0.1037 |
| 5 | | | | शोभा वासुदेव यादव व इतर 5 | 52 पैकी | 1 | 4.5900 | 0.2675 |
| 6 | | | | विश्वनाथ नारायण जांभे | 54 पैकी | 1 | 4.3900 | 0.5149 |
| 7 | | | | गिरजाबाई बापुराव फुलझेले | 57 पैकी | 1 | 1.4100 | 0.0002 |
| 8 | | | | कैलास नारायण इंगोले व इतर 1 | 58 पैकी | 1 | 1.4100 | 0.0370 |
| 9 | | | | मालताबाई ज्ञानेश्वर रंधारी व इतर 8 | 59 पैकी | 1 | 3.1900 | 0.1365 |
| 10 | | | | रेणु सुनिल यादव व इतर 12 | 63 पैकी | 1 | 5.3300 | 0.4340 |
| 11 | | | | विठ्ठल नारायण इंगोले व इतर 1 | 64 पैकी | 1 | 3.7200 | 0.2028 |
| 12 | | | | निता ज्ञानदेव इंगोले व इतर 1 | 66 पैकी | 1 | 5.7300 | 0.1374 |
| 13 | | | | विनोद उत्तमराव पावडे | 67 पैकी | 1 | 1.0100 | 0.0024 |
| 14 | | | | प्रमिला शिवलाल मसने व इतर 9 | 84 पैकी | 1 | 1.7500 | 0.1578 |
| 15 | | | | परमेश्वर दु पाठक | 84/1 पैकी | 1 | 0.0190 | |
| 16 | | | | कल्पना मंगेश गणोरकार व इतर 7 | 84/1/अ पैकी | 1 | 3.8000 | |
| 17 | | | | विजय जगन्नाथ मदनकर व इतर 1 | 84/2/अ/2 पैकी | 1 | 0.0268 | |
| 18 | | | | कृष्णा गोकुलचंद शर्मा | 84/2/3/3 पैकी | 1 | 0.0271 | |
| 19 | | | | कृष्णा गोकुलचंद शर्मा | 84/2/3/4 पैकी | 1 | 0.0274 | |
| 20 | | | | अर्पणा रमेश गिरी व इतर 1 | 84/2/3/5 पैकी | 1 | 0.0282 | |
| 21 | | | | नारायण व्यंकटकृष्णन अयंगर | 84/2/3/6 पैकी | 1 | 0.0318 | |
| 22 | | | | नारायण व्यंकटकृष्णन अयंगर | 84/2/3/7 पैकी | 1 | 0.0264 | |
| 23 | | | | नितीन भास्करराव मुंडे | 84/2/3/8 पैकी | 1 | 0.0264 | |
| 24 | | | | पदमाकर जगन्नाथ खर्चे | 84/2/3/9 पैकी | 1 | 0.0264 | |
| 25 | | | | कृष्णा गोकुलचंद शर्मा | 84/2/3/12 पैकी | 1 | 0.0264 | |
| 26 | | | | कृष्णा गोकुलचंद शर्मा | 84/2/3/13 पैकी | 1 | 0.0264 | |
| 27 | | | | राजेंद्र निरंजन वानखडे | 84/2/3/14 पैकी | 1 | 0.0264 | |
| 28 | | | | आनंदा कडु सावळे व इतर 1 | 84/2/3/15 पैकी | 1 | 0.0300 | |
| 29 | | | | महाराष्ट्र शासन खुली जागा | 84/2/3/16 पैकी | 1 | 0.0623 | |
| 30 | | | | निर्मला सुदर्शन भाटिया | 84/3/अ पैकी | 1 | 0.5500 | |
| 31 | | | | शिवचरण ओंकार जव्हेरी | 84/3/4/14/15 पैकी | 1 | 0.0971 | |
| 32 | | | | व्यंकटेश मनोज मोरे अ.पा.क वडील मनोज देवराव मोरे | 84/5 पैकी | 1 | 0.0160 | |
| 33 | | | | सुभाष भिमराव व्यवहारे | 84/6 पैकी | 1 | 0.0160 | |
| 34 | | | | रेखा वासुदेव खारोडे | 84/7 पैकी | 1 | 0.0156 | |
| 35 | | | | कुसुम राजकुमार गोयल | 84/8 पैकी | 1 | 0.0306 | |
| 36 | | | | सुषमा संपत खंडारे व इतर 1 | 84/9 पैकी | 1 | 0.0308 | |
| 37 | | | | मुकेश रामराव शेंडे | 84/10 पैकी | 1 | 0.0308 | |
| 38 | | | | विना साकेत तिवारी व इतर 1 | 84/11 पैकी | 1 | 0.0319 | |
| | | | | | | कुल | 47.4398 (हे.आर.) | 2.6496 (हे.आर.) |

| अ. क्र. | भूमि अधिग्रहण प्रकरणाची संख्या | गावाचे नाव | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का जमीनधारकाचे नाव | सर्वेक्षण संख्या | [illegible] | ७/१२ नुसार कुल क्षेत्रफळ (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एलएक्यु-47/अन्वी/18 2025-2026 | अन्वी | अकोला | मो शोएब मो इलियास | 40/1 पैकी | 1 | 3.1600 | 0.1695 |
| 2 | | | | संतोष आनंद गणेशप्रसाद परदेशी व इतर 4 | 40/2 पैकी | 1 | 4.8700 | |
| 3 | | | | पुष्पा गणेशप्रसाद परदेशी व इतर 4 | 41 पैकी | 1 | 5.2500 | 0.1144 |
| 4 | | | | सै मुस्ताक से याकुब व इतर 13 | 48 पैकी | 1 | 6.5400 | 0.3303 |
| 5 | | | | सै इसाक से याकुब व इतर 6 | 49 पैकी | 1 | 4.8900 | 0.2277 |
| 6 | | | | सै नाजीम सै बशीर व इतर 8 | 50 पैकी | 1 | 7.3600 | 0.1344 |
| 7 | | | | राजकिरण रामस्वरुप बांगड | 51/1 पैकी | 1 | 2.0700 | 0.1116 |
| 8 | | | | सहदेव वामनराव धुमाळे | 51/2 पैकी | 1 | 0.8100 | |
| 9 | | | | श्रीनिवास दिनकर जोशी | 51/3 पैकी | 1 | 1.2100 | |
| 10 | | | | सै रफिक सै रऊफ | 51/4 पैकी | 1 | 2.0200 | |
| 11 | | | | कल्पना पिता सुखराज पातालबंशी व इतर 4 | 57/1 पैकी | 1 | 2.4700 | 0.0689 |
| 12 | | | | सै अरजान सै जिशान | 57/1/अ पैकी | 1 | 0.7000 | |
| 13 | | | | सैय्यद जीशान सैय्यद खुर्शीद | 57/2 पैकी | 1 | 1.5000 | |
| 14 | | | | सै खालीद से अयुब | 58/1 पैकी | 1 | 3.2600 | 0.0473 |
| 15 | | | | सुधाकर मधुकर नागे व इतर 7 | 58/2 पैकी | 1 | 3.3100 | |
| 16 | | | | सै फहीम सै रहिम व इतर 1 | 59/1 पैकी | 1 | 2.4600 | 0.1798 |
| 17 | | | | दुर्गाबाई किसनराव बसु व इतर 3 | 59/2 पैकी | 1 | 2.1100 | |
| 18 | | | | राजेंद्र मोतिराम बसु व इतर 2 | 59/2 अ पैकी | 1 | 1.6200 | |
| 19 | | | | रजनी श्रीनिवास जोशी | 59/3 पैकी | 1 | 0.8100 | |
| 20 | | | | रमेश विश्वनाथ सोनोने | 59/4 पैकी | 1 | 0.8100 | |
| | | | | | | कुल | 57.2300 (हे.आर.) | 1.3839 (हे.आर.) |
| 1 | एलएक्यु-47/राजापुर/17/2025-2026 | राजापुर | अकोला | अफरोजाबानो सै हासन | 5/1 पैकी | 1 | 4.0200 | 0.1038 |
| 2 | | | | इंदुबाई भिमराव वानखडे व इतर 1 | 5/3 पैकी | 1 | 0.7600 | |
| 3 | | | | वेणुताई शालीग्राम मनोहरे | 5/3/3 पैकी | 1 | 0.8100 | |
| 4 | | | | शकुंतलाबाई वाळु सिरसाट | 5/3/4 पैकी | 1 | 0.4200 | |
| 5 | | | | अफरोजाबानो से हासन | 5/4 पैकी | 1 | 2.0700 | |
| 6 | | | | आनंदा गंगाराम वानखडे | 5/5 पैकी | 1 | 0.8300 | |
| 7 | | | | प्रकाश गंगाराम वानखडे व इतर 4 | 5/6 पैकी | 1 | 1.7300 | |
| 8 | | | | यासीनखाँ सत्तार खाँ | 5/7 पैकी | 1 | 1.3200 | |
| 9 | | | | संगिता विनायक भालतिलक | 6 पैकी | 1 | 1.5400 | 0.1583 |

| अ. क्र. | भूमि अधिग्रहण प्रकरणाची संख्या | गावाचे नाव | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का जमीनधारकाचे नाव | सर्वेक्षण संख्या | [illegible] | ७/१२ नुसार कुल क्षेत्रफळ (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | | | | प्रमोद किसनराव दांदळे (देशमुख) | 11/1 पैकी | 1 | 1.4800 | 0.2734 |
| 11 | | | | निर्मला रामकृष्ण नागे व इतर 1 | 11/2 पैकी | 1 | 2.7600 | |
| 12 | | | | सुंदराबाई नामदेव इंगोले व इतर 4 | 11/4 पैकी | 1 | 1.6200 | |
| 13 | | | | सुंदराबाई नामदेव इंगोले व इतर 6 | 11/5 पैकी | 1 | 3.1200 | |
| | | | | | | कुल | 22.4800 (हे.आर.) | 0.5355 (हे.आर.) |
| 1 | एलएक्यु-47/डाबकी/08/2025-2026 | डाबकी | अकोला | किशोर संपत भिरड | 11 पैकी | 1 | 1.3600 | 0.2741 |
| 2 | | | | गजानन प्रभाकर पात्रीकर | 11/2 पैकी | 1 | 0.4100 | |
| 3 | | | | नारायण जुगलकिशोर धुरका | 11/2/1 पैकी | 1 | 0.0187 | |
डॉक्टरांनी मेडिकलच्या विद्यार्थ्यांना माझ्या आजाबाबद्दल पूर्वकल्पना दिलेली होती.म्हणजेच त्यांना तो घटक अभ्यासाला होता.ती भावी डॉक्टर आज माझा ऑपरेशनचा भाग बघायला येणार होती. अर्थातच डॉक्टर्स त्यांना डेमो दाखवणार होते. पुस्तकांत वाचलेले आणि प्रत्यक्षात रोग्याचे भागांचा प्रॅक्टीकल अभ्यासणे यात फरक आहे.

आता मी आधीच मानसिकरित्या पूर्ण खचलेली. पण तरीसुद्धा मी इच्छा नसताना होकार दिला. एक एक मेडीकलचे विद्यार्थी येऊन माझ्या ऑपरेशन शस्त्रक्रिया झालेल्या भागाला न्याहाळू लागले, हाताने इकडे तिकडे करु लागले. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' म्हणतात ना? त्याचा प्रत्यय मला आज चांगलाच आला. कोणी कोणी खुप सांभाळून होत लावत होते आणि काहीतर अतिशय अमानुषपणे हाताळत होते. चिमटीने वर करुन बघत तर अतिशय निर्द्धयपणे जखमेवर हाताने स्पर्श करुन त्याला न्याहाळत असे. आता मात्र माझ्या अंगाची पूर्ती लाहीलाही झाली होती. खूप दुखायला लागले होते.नको वाटत होता आता त्याला कोणाचा स्पर्शसुद्धा. पण,तितक्यात एक विद्यार्थी आला त्याने इतक्या जोरात चिमटा घेऊन तो भाग वर करून बघितला की माझा संयम सुटला, मी रडायलाच लागली.'अरे किती हळूवार पहा जखम ओली आहे.'असे कोणीतरी ओरडले.

बहुतेक तो. शेवटचाच विद्यार्थी होता. माझा त्रास सगळ्यांच्या लक्षात आल्याचे दिसत होते.म्हणून की काय आता कोणाला येऊ दिले नाही.किती निष्ठूर असतात ना काहीजण. कोणाचे दुःख जाणून घ्यावे, त्रास कोणाला होत असेल याची विचारच करत नाहीत. असो. आता मात्र मला त्रास कमी करायला इन्जेक्शन दिले. झोप यायला लागली...

**स्नेहल लोकेश ठाकरे**
हडपसर,पुणे

मधुमेह उपचारातील नवा अध्याय

## इन्सुलिन आयकोडेक:आता वर्षातून ३६५ नव्हे,तर फक्त ५२ इंजेक्शन्स!

मधुमेह हा आजच्या काळातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या असंसर्गजन्य आजारांपैकी एक आहे. विशेषतः 'टाइप-२ मधुमेह' हा जगभरातील सुमारे ९० टक्के रुग्णांमध्ये आढळतो. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या ताज्या आकडेवारीनुसार, भारतात सुमारे १० कोटींहून अधिक नागरिक मधुमेहाने प्रभावित आहेत, तर १३.६ कोटी लोक प्री-डायबिटीजच्या (मधुमेहाच्या उंबरठ्यावर) टप्प्यात आहेत. याच कारणामुळे भारताला 'मधुमेहाची जागतिक राजधानी' असेही संबोधले जाते.बदलती जीवनशैली, अयोग्य आहार, लठ्ठपणा, मानसिक ताणतणाव आणि शारीरिक श्रमांचा अभाव ही या आजाराची प्रमुख कारणे आहेत.मधुमेह नियंत्रणासाठी आहार, व्यायाम आणि तोंडी औषधोपचार उपयुक्त ठरतात;परंतु आजार वाढल्यानंतर अनेक रुग्णांना इन्सुलिन घेण्याचा सल्ला दिला जातो.नेमका हाच टप्पा रुग्णांसाठी मानसिकदृष्ट्या कठीण ठरतो. दररोज सुई टोचून घेण्याची भीती, प्रवासात इन्सुलिन सांभाळण्याचा त्रास किंवा डोस घेण्यातील अनियमितता यामुळे रक्तातील साखर नियंत्रित ठेवणे कठीण जाते.या पार्श्वभूमीवर, मधुमेह उपचारात एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी बदल घडला आहे. आठवड्यातून केवळ एकदाच दिले जाणारे जगातील पहिले बेसल इन्सुलिन म्हणजेच 'इन्सुलिन आयकोडेक' आता भारतीय बाजारपेठेत अधिकृतपणे दाखल झाले आहे.

### एन.पी.एच.ते आयकोडेक:इन्सुलिनचा आधुनिक प्रवास

१९४६ मध्ये 'एन.पी.एच.' इन्सुलिनच्या शोधापासून आधुनिक इन्सुलिनचा प्रवास सुरू झाला.त्यानंतर विज्ञानाने प्रगती करत ग्लॅरगाईन, डिटेमिर आणि डिग्लुडेक यांसारखी २४ तास काम करणारी दीर्घकालीन इन्सुलिन विकसित केली.परंतु, रुग्णाला तरीही रोज एक इंजेक्शन घ्यावेच लागत होते. आता या उपचारात थेट 'आठवड्यातून एकदाच' घेण्याच्या इन्सुलिन पर्वाचा उदय झाला असून, यामुळे रुग्णांना वर्षातील ३६५ इंजेक्शन्स ऐवजी फक्त ५२ इंजेक्शन्स घ्यावी लागणार आहेत.

### 'इन्सुलिन आयकोडेक' नेमके काय आणि ते कसे काम करते?

हे मानवी बेसल इन्सुलिनचे अत्याधुनिक 'अनालॉग' असून ते 'रिकॉम्बीनन्ट डी.एन.ए.' तंत्रज्ञानाद्वारे तयार केले जाते. सध्या बाजारात उपलब्ध असणाऱ्या 'डिक्लुडेक' किंवा 'ग्लार्जिन'पेक्षा याचे वैशिष्ट्य म्हणजे याचे अर्धायुष्य अत्यंत दीर्घ आहे.याच्या रचनेत तीन अमिनो आम्लांमध्ये बदल करण्यात आला असून त्याला'C20 फॅटी डाय-ॲसिड' जोडले आहे.यामुळे हे इन्सुलिन रक्तात गेल्यानंतर तिथल्या 'अल्ब्युमिन' नावाच्या प्रथिनाशी घट्ट जोडले जाते.यामुळे शरीरात इन्सुलिनचा एक सुरक्षित साठा तयार होतो आणि संपूर्ण आठवडाभर शरीराच्या गरजेनुसार अत्यंत संथ गतीने आणि स्थिर प्रमाणात सक्रिय इन्सुलिन मुक्त होत राहते. परिणामी, रक्तातील साखरेचे चढ-उतार कमी होतात आणि उपाशीपोटी असणारी साखर उत्तम नियंत्रित राहते.

### कोणासाठी ठरणार वरदान?

हा नवा पर्याय प्रामुख्याने खालील रुग्णांसाठी अत्यंत फायदेशीर ठरेल:ज्यांना नव्यानेच इन्सुलिन सुरू करायचे आहे असे 'टाइप-२'चे रुग्ण.रोज सुई टोचून घेण्याचा कंटाळा किंवा मानसिक भीती असणारे नागरिक.नियमित नोकरी-व्यवसायानिमित्त किंवा पर्यटनासाठी वारंवार प्रवास करणारे लोक.वृद्ध रुग्ण, ज्यांना रोज वेळेवर डोस घेण्याचे लक्षात राहत नाही. (स्मरणशक्तीचे आजार)

### भारतात उपलब्धता आणि किमतीचे गणित

भारतीय बाजारपेठेत हे इन्सुलिन 'ॲविकली'या ब्रँड नावाने उपलब्ध झाले आहे. हे औषध ७०० U/mL या अत्यंत तीव्र घनतेच्या प्री-फिल्ड पेन स्वरूपात उपलब्ध आहे.जागतिक औषध कंपनी 'नोव्हो नॉर्डिस्क'ने भारतीय रुग्णांची क्रयशक्ती लक्षात घेऊन याची किंमत सध्याच्या रोजच्या इन्सुलिनच्या तुलनेत जवळपास समान ठेवली आहे. पॅक प्रकार (न्दतल्स)एकूण इन्सुलिन युनिट्स कमाल किरकोळ किंमत (MRP)१ मिली पेन (१ स्त झह)७०० युनिट्स २,६११. ३ मिली पेन (3 ml Pen)२१०० युनिट्स ७,८३३.

### डोस चुकल्यास काय करावे?

इन्सुलिन आयकोडेक आठवड्यातून एकदाच एका निश्चित दिवशी (उदा. दर रविवारी) घ्यायचे असते. चार दिवसांच्या आत आठवण आल्यास: समजा तुम्ही रविवारी डोस घ्यायला विसरलात आणि बुधवारी (४ दिवसांच्या आत) आठवण आली, तर त्वरित तो डोस घ्यावा आणि पुढील डोस नेहमीप्रमाणे रविवारीच घ्यावा. चार दिवसांनंतर आठवण आल्यास: जर चार दिवसांपेक्षा जास्त उशीर झाला असेल, तर तो चुकलेला डोस पूर्णपणे सोडून द्यावा. थेट पुढच्या रविवारीच नवीन डोस घ्यावा. या दरम्यान रक्तातील साखरेची वारंवार तपासणी करणे आवश्यक आहे.

### मर्यादा आणि दुष्परिणाम

वैद्यकीय क्षेत्रात कोणतेही नवीन औषध पूर्णपणे निर्दोष नसते.या इन्सुलिनच्याही काही मर्यादा आहेत. दीर्घकालीन हायपोग्लायसेमियाचा धोका:जर रुग्णाचा डोस चुकून जास्त झाला आणि रक्तातील साखर अचानक खालावली (Hypoglycemia), तर या इन्सुलिनचा परिणाम शरीरात आठवडाभर राहणार असल्यामुळे साखरेची पातळी कमी राहण्याचा त्रास दीर्घकाळ टिकू शकतो. अशा वेळी रुग्णाला तात्काळ वैद्यकीय निरीक्षणात ठेवणे गरजेचे असते.

इतर सामान्य दुष्परिणाम: नेहमीच्या इन्सुलिनप्रमाणेच इंजेक्शनच्या जागी लालसरपणा येणे,सूज येणे,लिपोहायपरट्रॉफी (त्वचेखाली चरबीची गाठ येणे) किंवा काही प्रमाणात वजन वाढणे असे किरकोळ त्रास होऊ शकतात.

मर्यादा:सध्या गरोदर महिला, स्तनपान करणाऱ्या माता आणि लहान मुलांमध्ये याचा वापर करण्यासाठी पुरेशी वैद्यकीय आकडेवारी उपलब्ध नसल्याने तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय याचा वापर टाळावा.

**निष्कर्ष**-इन्सुलिन आयकोडेक (ॲविकली) हे भारतासारख्या अवाढव्य लोकसंख्या असलेल्या देशातील मधुमेह व्यवस्थापनात एक मैलाचा दगड ठरणार आहे. यामुळे रुग्णांचा उपचारावरील विश्वास वाढेल आणि त्यांचे जीवनमान सुधारेल. परंतु, हे औषध घेण्यापूर्वी 'स्वतःच्या मनाने उपचार (Self-Medication) करणे' पूर्णपणे टाळावे. तुमच्या शरीराची गरज, सध्या सुरू असलेली इतर औषधे आणि मधुमेहाची तीव्रता तपासून तुमचे तज्ज्ञ डॉक्टरच याचा योग्य डोस निश्चित करू शकतात, हे रुग्णांनी कायम लक्षात ठेवावे.



**डॉ. अभिलाष नांदुरकर**(एम.डी.मेडिसिन अंतिम वर्ष)
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर

### पावसाच्या सरी

बघा या पावसाच्या सरी,
धाऊनी आल्या या धरणी वरी,
करण्यातृप्त ही तृष्णा उरी,
होत्या नजारा अवकाशावरी,

पडता थेंब या धरणी वरी,
बनविले तिला कसे सुंदरी,
घातला जणू हा शालू भरजरी,
रंग त्याचा संपूर्ण हिरवळी,

उगम जाहला सरितेचा जरी,
जणू भासे ती केसांची लट गहरी,
उमलली रानटी फुले ही भारी,
शोभे जणू कुंकू माथ्यावरी,

बघता निसर्गाची ही उधळण सर्वावरी,
लाभली तृप्ती आम्हास पुरी...

**ॲड. प्रशांत कडव,**
मो.९५६११ ५७९००

| S. No. | Land Acquisition Proposal Number | Village | Taluka | Land Owners Name according to 7/12 | Survey No./Gutt. No. | Land Holding Method | Area as per 7/12 Extract (Ha.) | Acquisition Area (Ha.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 21 | | | | Narayan Venkatkrishnan Iyengar | 84/2/3/6 out of | 1 | 0.0318 | |
| 22 | | | | Narayan Venkatkrishnan Iyengar | 84/2/3/7 out of | 1 | 0.0264 | 0.1578 |
| 23 | | | | Nitin Bhaskarrao Mundhe | 84/2/3/8 out of | 1 | 0.0264 | |
| 24 | | | | Padmakar Jagannath Kharche | 84/2/3/9 out of | 1 | 0.0264 | |
| 25 | | | | Krishna Gokulchand Sharma | 84/2/3/12 out of | 1 | 0.0264 | |
| 26 | | | | Krishna Gokulchand Sharma | 84/2/3/13 out of | 1 | 0.0264 | |
| 27 | | | | Rajendra Niranjan Wankhade | 84/2/3/14 out of | 1 | 0.0264 | |
| 28 | | | | Ananda Kadu Savale and Other 1 | 84/2/3/15 out of | 1 | 0.0300 | |
| 29 | | | | Maharashtra Government Open Space | 84/2/3/16 out of | 1 | 0.0623 | |
| 30 | | | | Nirmala Sudarshan Bhatia | 84/3/A out of | 1 | 0.5500 | |
| 31 | | | | Shivcharan Omkar Javheri | 84/3/4/14/15 out of | 1 | 0.0971 | |
| 32 | | | | Venkatesh Manoj More (Minor) | 84/5 out of | 1 | 0.0160 | |
| | | | | through Father Manoj Deorao More | | | | |
| 33 | | | | Subhash Bhimrao Vyavhare | 84/6 out of | 1 | 0.0160 | |
| 34 | | | | Rekha Vasudev Kharode | 84/7 out of | 1 | 0.0156 | |
| 35 | | | | Kusum Rajkumar Goyal | 84/8 out of | 1 | 0.0306 | |
| 36 | | | | Supda Sampat Khandare and Other 1 | 84/9 out of | 1 | 0.0308 | |
| 37 | | | | Mukesh Ramrao Shende | 84/10 out of | 1 | 0.0308 | |
| 38 | | | | Beena Saket Tiwari and Other 1 | 84/11 out of | 1 | 0.0319 | |
| | | | | | | Total | 47.4398 (Ha.) | 2.6496 (Ha.) |
| 1 | | | | Mo Shoaib Mo Iliyas | 40/1 out of | 1 | 3.1600 | |
| 2 | | | | Santosh Anand Ganeshprasad Pardeshi and Other 4 | 40/2 out of | 1 | 4.8700 | 0.1695 |
| 3 | | | | Pushpa Ganeshprasad Pardeshi and Other 4 | 41 out of | 1 | 5.2500 | 0.1144 |
| 4 | | | | Sai Mustafa Se Yakub and Other 13 | 48 out of | 1 | 6.5400 | 0.3303 |
| 5 | | | | Sai Isaac Se Yakub and Other 6 | 49 out of | 1 | 4.8900 | 0.2277 |
| 6 | | | | Sai Nazim Sai Bashir and Other 8 | 50 out of | 1 | 7.3600 | 0.1344 |
| 7 | | | | Rajkiran Ramswarup Bangad | 51/1 out of | 1 | 2.0700 | |
| 8 | | | | Sahadev Vamanrao Dhumale | 51/2 out of | 1 | 0.8100 | 0.1116 |
| 9 | | | | Shrinivas Dinkar Joshi | 51/3 out of | 1 | 1.2100 | |
| 10 | | | | Sai Rafiq Sai Rauf | 51/4 out of | 1 | 2.0200 | |
| 11 | LAQ-47/ANVI/18/2025-2026 | ANVI | AKOLA | Kalpana Pita Sukhraj Patalvanshi and Other 4 | 57/1 out of | 1 | 2.4700 | |
| 12 | | | | Sai Arjan Sai Jishan | 57/1/A out of | 1 | 0.7000 | 0.0689 |
| 13 | | | | Saiyyad Jishan Saiyyad Khurshid | 57/2 out of | 1 | 1.5000 | |
| 14 | | | | Sai Khalid Se Ayub | 58/1 out of | 1 | 3.2600 | |
| 15 | | | | Sudhakar Madhukar Nage and Other 7 | 58/2 out of | 1 | 3.3100 | 0.0473 |
| 16 | | | | Sai Fahim Sai Rahim and Other 1 | 59/1 out of | 1 | 2.4600 | |
| 17 | | | | Durgabai Kisanrao Vasu and Other 3 | 59/2 out of | 1 | 2.1100 | 0.1798 |
| 18 | | | | Rajendra Motiram Vasu and Other 2 | 59/2 A out of | 1 | 1.6200 | |
| 19 | | | | Rajni Shrinivas Joshi | 59/3 out of | 1 | 0.8100 | |
| 20 | | | | Ramesh Vishwanath Sonone | 59/4 out of | 1 | 0.8100 | |
| | | | | | | Total | 57.2300 (Ha.) | 1.3839 (Ha.) |
| 1 | | | | Afrozabano Sai Hasan | 5/1 out of | 1 | 4.0200 | |
| 2 | | | | Indubai Bhimrao Wankhade and Others 1 | 5/3 out of | 1 | 0.7600 | |
| 3 | | | | Venutai Shaligram Manohare | 5/3/3 out of | 1 | 0.8100 | |
| 4 | | | | Shakuntalabai Balu Sirsat | 5/3/4 out of | 1 | 0.4200 | 0.1038 |
| 5 | | | | Afrozabano Se Hasan | 5/4 out of | 1 | 2.0700 | |
| 6 | | | | Ananda Gangaram Wankhade | 5/5 out of | 1 | 0.8300 | |
| 7 | | | | Prakash Gangaram Wankhade and Others 4 | 5/6 out of | 1 | 1.7300 | |
| 8 | LAQ-47/RAJAPUR/17/2025-2026 | RAJAPUR | AKOLA | Yasinshah Sattar Shah | 5/7 out of | 1 | 1.3200 | |
| 9 | | | | Sangita Vinayak Bhaltilak | 6 out of | 1 | 1.5400 | 0.1583 |
| 10 | | | | Pramod Kisanrao Dundale (Deshmukh) | 11/1 out of | 1 | 1.4800 | |
| 11 | | | | Nirmala Ramkrishna Nage and Others 1 | 11/2 out of | 1 | 2.7600 | 0.2734 |
| 12 | | | | Sundarabai Namdev Ingole and Others 4 | 11/4 out of | 1 | 1.6200 | |
| 13 | | | | Sundarabai Namdev Ingole and Others 6 | 11/5 out of | 1 | 3.1200 | |

| S. No. | Land Acquisition Proposal Number | Village | Taluka | Land Owners Name according to 7/12 | Survey No./Gutt. No. | Land Holding Method | Area as per 7/12 Extract (Ha.) | Acquisition Area (Ha.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | Total | 22.4800 (Ha.) | 0.5355 (Ha.) |
| 1 | | | | Kishor Sampat Bhirad | 11 out of | 1 | 1.3600 | |
| 2 | | | | Gajanan Prabhakar Pathrikar | 11/2 out of | 1 | 0.4100 | |
| 3 | | | | Narayan Jugalkishor Ghurka | 11/2/1 out of | 1 | 0.0187 | |
| 4 | | | | Narayan Jugalkishor Ghurka | 11/2/2 out of | 1 | 0.0165 | |
| 5 | | | | Narayan Jugalkishor Ghurka | 11/2/3 out of | 1 | 0.0165 | |
| 6 | | | | Dattatraya Ramrao Sable | 11/2/4 out of | 1 | 0.0165 | |
| 7 | | | | Suvarna Suresh Late | 11/2/5 out of | 1 | 0.1650 | |
| 8 | | | | Narayan Jugalkishor Ghurka | 11/2/6 out of | 1 | 0.0165 | |
| 9 | | | | Sukhdevrao Manikrao Jarange | 11/2/7 out of | 1 | 0.0165 | |
| 10 | | | | Prashant Shriram Pachange | 11/2/8 out of | 1 | 0.0175 | |
| 11 | | | | Sarla Ramesh Mehta | 11/2/9 out of | 1 | 0.0150 | |
| 12 | | | | Sarla Ramesh Mehta | 11/2/10 out of | 1 | 0.0160 | |
| 13 | | | | Sarla Ramesh Mehta | 11/2/11 out of | 1 | 0.0157 | |
| 14 | | | | Narayan Jugalkishor Ghurka | 11/2/12 out of | 1 | 0.0221 | |
| 15 | | | | Ashok Devidas Tekade and Other 1 | 11/2/13 out of | 1 | 0.0212 | |
| 16 | | | | Narayan Jugalkishor Ghurka | 11/2/14 out of | 1 | 0.0157 | |
| 17 | | | | Narayan Jugalkishor Ghurka | 11/2/15 out of | 1 | 0.0167 | |
| 18 | | | | Ashok Devidas Tekade and Other 1 | 11/2/16 out of | 1 | 0.0165 | |

| S. No. | Land Acquisition Proposal Number | Village | Taluka | Land Owners Name according to 7/12 | Survey No./Gutt. No. | Land Holding Method | Area as per 7/12 Extract (Ha.) | Acquisition Area (Ha.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 19 | | | | Ram Rameshkumar Dubey and Other 4 | 11/3 out of | 1 | 0.4100 | |
| 20 | | | | Gulabdevi Radhakrishnaji Shukla and Other 1 | 11/4 out of | 1 | 1.5200 | |
| 21 | | | | Gruh Nirman Sanstha Gulabdevi Radhakrishna Shukla and Other 3 | 11/4/1 out of | 1 | 0.0156 | |
| 22 | | | | Narendra Ramesh Patel | 11/4/2 out of | 1 | 0.0160 | |
| 23 | | | | Narendra Ramesh Patel | 11/4/3 out of | 1 | 0.0160 | |
| 24 | LAQ-47/DABKI/08/2025-2026 | DABKI | AKOLA | Gruh Nirman Sanstha Gulabdevi Radhakrishna Shukla and Other 3 | 11/4/4 out of | 1 | 0.0318 | 0.2741 |
| 25 | | | | Asha Anant Parteki and Other 1 | 11/4/5 out of | 1 | 0.0275 | |
| 26 | | | | Gruh Nirman Sanstha Gulabdevi Radhakrishna Shukla and Other 3 | 11/4/6 out of | 1 | 0.0264 | |
| 27 | | | | Gruh Nirman Sanstha Gulabdevi Radhakrishna Shukla and Other 3 | 11/4/7 out of | 1 | 0.0247 | |
| 28 | | | | Nandkishor Ganpatsingh Chavan | 11/4/8 out of | 1 | 0.0290 | |
| 29 | | | | Sureshchandra Rajnarayan Dixit | 11/4/9 out of | 1 | 0.0159 | |
| 30 | | | | Suresh Shobharam Soni | 11/4/10 out of | 1 | 0.0150 | |
| 31 | | | | Gruh Nirman Sanstha Gulabdevi Radhakrishna Shukla and Other 3 | 11/4/11/A out of | 1 | 0.0127 | |
| 32 | | | | Sumit Santosh Mote | 11/4/11/B out of | 1 | 0.0129 | |
| 33 | | | | Sanjay Purushottam More | 11/4/12/A out of | 1 | 0.0131 | |
| 34 | | | | Sharda Jai Khandare | 11/4/12/B out of | 1 | 0.0138 | |
| 35 | | | | Usha Manmohan Sharma | 11/4/13/A out of | 1 | 0.0144 | |
| 36 | | | | Sagita Santosh More | 11/4/13/B out of | 1 | 0.0144 | |
| 37 | | | | Atul Lakshminarayan Somani | 11/4/14/A out of | 1 | 0.0144 | |
| 38 | | | | Harish Sureshchandra Sharma | 11/4/14/B out of | 1 | 0.0144 | |
| 39 | | | | Sanjay Ramdhan Khatri | 11/4/15/A out of | 1 | 0.0144 | |
| 40 | | | | Kailashchandra Kanhaiyalal Ajmera | 11/4/15/B out of | 1 | 0.0144 | |
| 41 | | | | Amit Vishamlal Popatani | 11/4/16/A out of | 1 | 0.0144 | |
| 42 | | | | Madhuri Shripal Kachale | 11/4/16/B out of | 1 | 0.0144 | |
| 43 | | | | Sahebrao Jagoji Thakre | 11/4/17/A out of | 1 | 0.0144 | |
| 44 | | | | Omprakash Ramnarayan Tiwari | 11/4/17/B out of | 1 | 0.0144 | |

| S. No. | Land Acquisition Proposal Number | Village | Taluka | Land Owners Name according to 7/12 | Survey No./Gutt. No. | Land Holding Method | Area as per 7/12 Extract (Ha.) | Acquisition Area (Ha.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 45 | | | | Ushadevi Sarvjeet Sharma and Other 5 | 11/4/18/A out of | 1 | 0.0144 | |
| 46 | | | | Meena Nilesh Ingale | 11/4/18/B out of | 1 | 0.0144 | |
| 47 | | | | Dnyandev Jangaluji Sirsat and Other 1 | 11/4/19/A out of | 1 | 0.0144 | |
| 48 | | | | Prashant Ramdas Shirsat and Other 3 | 11/4/19/B out of | 1 | 0.0148 | |
| 49 | | | | Seema Ashokrao Paraskar | 11/4/20/A out of | 1 | 0.0140 | |
| 50 | | | | Amit Bishamlal Popatani | 11/4/20/B out of | 1 | 0.0146 | |
| 51 | | | | Sunita Mahavir Tiwari | 11/4/21/A out of | 1 | 0.0142 | |
| 52 | | | | Minakshi Lalitkumar Sharma | 11/4/21/B out of | 1 | 0.0151 | |
| 53 | | | | Mangala Subhash Mhaisne | 11/4/22/A out of | 1 | 0.0126 | |
| 54 | | | | Ramkumar Pradip Khumkar | 11/4/22/B out of | 1 | 0.0140 | |
| 55 | | | | Virendra singh Jayvaran singh Thakur | 11/4/23/A out of | 1 | 0.0139 | |
| 56 | | | | Gruh Nirman Sanstha Gulabdevi Radhakrishna Shukla and Other 3 | 11/4/23/B out of | 1 | 0.0135 | |
| 57 | | | | Mangesh Suresh Gavande | 11/4/24/A out of | 1 | 0.0144 | |
| 58 | | | | Babita Ganesh Nagalkar | 11/4/24/B out of | 1 | 0.0148 | |
| 59 | | | | Surendra Pralhad Nimbalkar | 11/4/25/A out of | 1 | 0.0148 | |
| 60 | | | | Santosh Vasantrao Patange and Other 1 | 11/4/25/B out of | 1 | 0.0135 | |
| 61 | | | | Gruh Nirman Sanstha Gulabdevi Radhakrishna Shukla and Other 5 | 11/4/26 out of | 1 | 0.0230 | |
| 62 | | | | Kalpana Shailesh Sirsat and Other 1 | 11/4/27 out of | 1 | 0.0191 | |
| 63 | | | | Sarla Kashiramji Wathurkar and Other 1 | 11/4/28 out of | 1 | 0.0269 | |
| 64 | | | | Ashok Bapurao Korpe and Other 1 | 11/4/29 out of | 1 | 0.0247 | |
| 65 | | | | Rahul Balkrishna Satale and Other 1 | 11/4/30 out of | 1 | 0.0213 | |
| 66 | | | | Vishal Ramnarayan Pandey | 11/4/31 out of | 1 | 0.0189 | |
| 67 | | | | Umeshkumar Ramsagar Srivastava and Other 1 | 11/4/32 out of | 1 | 0.1750 | |
| 68 | | | | Babarao Vasudevrao Kulat and Other 1 | 11/4/33 out of | 1 | 0.0169 | |
| 69 | | | | Public Amenity | 11/4/34 out of | 1 | 0.0768 | |
| 70 | | | | Saad Ahmad Khan Walad Fayyad Ullah Khan | 12 out of | 1 | 2.3100 | 0.0904 |
| 71 | | | | Suryaprakash Shravan Sirsat and Other 1 | 28 out of | 1 | 2.0700 | 0.0010 |
| 72 | | | | Ved Vishnu Dhanorkar and Other 5 | 45 out of | 1 | 1.7800 | 0.2569 |
| 73 | | | | Shobhabai Shrikrishna Janorkar and Other 6 | 46 out of | 1 | 9.9000 | 0.2178 |
| 74 | | | | Pankaj Balkrishna Nalkande | 63 out of | 1 | 1.5300 | 0.0299 |
| 75 | | | | Shrikrishna Sampat Chatarkar and Other 8 | 64 out of | 1 | 1.6200 | 0.0341 |
| 76 | | | | Bakaram Motiram Kadvate and Other 4 | 65 out of | 1 | 2.6600 | 0.0742 |
| 77 | | | | Mahadev Khushal Vaitkar and Other 1 | 66 out of | 1 | 0.8200 | 0.0643 |
| 78 | | | | Namdev Khushal Vaitkar and Others 1 | 68 out of | 1 | 0.8900 | 0.0403 |
| 79 | | | | Kalavati Kashiram More and Other 8 | 69 out of | 1 | 0.4000 | 0.0169 |
| 80 | | | | Pradip Laxman Fate and Other 1 | 70 out of | 1 | 2.7300 | 0.0846 |
| 81 | | | | Prakash Laxmanrao Fate | 71 out of | 1 | 1.1700 | 0.0297 |
| 82 | | | | Prakash Laxmanrao Fate | 76 out of | 1 | 1.1600 | 0.0214 |

| S. No. | Land Acquisition Proposal Number | Village | Taluka | Land Owners Name according to 7/12 | Survey No./Gutt. No. | Land Holding Method | Area as per 7/12 Extract (Ha.) | Acquisition Area (Ha.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 83 | | | | Prakash Laxmanrao Fate | 77 out of | 1 | 1.6200 | 0.0169 |
| 84 | | | | Prakash Laxmanrao Fate | 78 out of | 1 | 1.4400 | 0.0064 |
| 85 | | | | Sudesh Shantilal Shaha and Other 2 | 79 out of | 1 | 11.6600 | 0,0011 |
| 86 | | | | Makarand Sharad Pandey | 100 out of | 1 | 1.2100 | 0.0885 |
| | | | | | | Total | 50.1370 (Ha.) | 1.3485 (Ha.) |
| | | | | | | Grand Total | 375.8261 (Ha.) | 24.602 (Ha.) |

**[F. No. G197/BSL-BD-WR 3rd & 4th/Bondarkhed+11 Vlgs/20A]**

**BHUVNESH KUMAR GUPTA, Chief Administrative Officer (Construction)**

जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/ ४१/ २०२६

### पुलगाव हादरले

# भररस्त्यात दोन युवकांना बेदम मारहाण

## दादागिरीचा व्हिडिओ व्हायरल, पुलगावच्या कायदा सुव्यवस्थेवर प्रश्न

**पुलगाव/जनमाध्यम**

पुलगाव शहरात पुन्हा एकदा गुंडगिरी डोके वर काढत असल्याचे चित्र समोर आले आहे. महेश झेरॉक्ससमोर शुक्रवारी रात्री अज्ञात युवकांच्या टोळक्याने दोन युवकांना भररस्त्यात बेदम मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार अज्ञात युवकांनी दोन युवकांना रस्त्यावर अडवून बेदम मारहाण केली. या वेळी परिसरात अनेक नागरिक उपस्थित होते. मात्र हल्लेखोरांच्या दहशतीमुळे कोणीही मध्यस्थी करण्याचे धाडस केले नाही. उलट अनेकांनी दूर उभे राहून संपूर्ण प्रकार पाहिला. हल्लेखोरांचा उद्देश केवळ मारहाण करणे नसून शहरात स्वतःची दहशत निर्माण करणे हा असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

काही वर्षांपूर्वी पुलगाव शहर गुंडगिरीमुळे बदनाम झाले होते. त्यानंतर जिल्ह्यात नियुक्त झालेल्या कर्तव्यदक्ष पोलिस अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करून अनेक गुंडांना तुरुंगात धाडले होते.त्यामुळे शहरात शांतता प्रस्थापित झाली होती. मात्र अलीकडील घटनेमुळे पुन्हा नव्या पिढीतील युवक गुंडगिरीकडे वळत असल्याची भीती व्यक्त होत आहे.

घटना रात्री गजबजलेल्या परिसरात घडत असताना पोलिसांची गस्त नेमकी कुठे होती असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. शहरात नियमित गस्त होत असेल तर अशा प्रकारची घटना भररस्त्यात कशी घडली याबाबतही चर्चा सुरू आहे.

घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर नागरिकांनी पोलिसांनी तातडीने संबंधित हल्लेखोरांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. शहरात पुन्हा दहशतीचे वातावरण निर्माण होऊ नये यासाठी रात्रीची गस्त वाढविणे. संशयितांवर वचक निर्माण करणे आणि कायदा सुव्यवस्था अबाधित राखणे ही काळाची गरज असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

## नेहरू विद्यालयात वृक्षारोपणाचा संकल्प

**विरुळ आकाजी/ जनमाध्यम**



आनंददायी शनिवार आणि एक पेड मा के नाम या उपक्रमांतर्गत नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय. विरुळ आकाजी येथे शनिवारी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थी. पालक. शिक्षक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आईच्या नावाने एक झाड लावण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज सिंह धंदोरिया आणि प्राचार्य नितीन गवारकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. परिसरात विविध प्रकारची रोपे लावून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारीही उपस्थितांनी स्वीकारली. यावेळी प्रा. बेलखडे. राठोड, मुडे, शिखा, डंभारे, क्षीरसागर, नाहाटा, सुनील गोसाटकर, प्रशांत काळे. अजय मून, सातपुते तसेच पालक शिल्पा देऊळकर, पुष्पा सोनटक्के, विद्या ताडाम, प्रिया सोनटक्के उपस्थित होते. इयत्ता पाचवी ते बारावीचे विद्यार्थी तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.उपस्थित मान्यवरांनी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगत प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संरक्षणही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

### जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त

## ऑनलाईन मार्गदर्शन सत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद

**वर्धा/जनमाध्यम**

जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वर्धा यांच्यावतीने 'कौशल्य विकास आठवडा' उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत 'भारतीय संविधान, मूलभूत अधिकार, कर्तव्ये व कायदेविषयक जागरूकता' या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन सत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या अभिनव उपक्रमाची संकल्पना सहाय्यक आयुक्त डॉ. सुधाकर झळके यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कौशल्य विकास अधिकारी रु. हु. ठाकूर यांच्या समन्वयातून या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. या ऑनलाईन सत्रात विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार, प्रशिक्षणार्थी तसेच विविध क्षेत्रातील एकूण १२७ युवक-युवतींनी सहभाग नोंदवला.

या सत्राचे प्रमुख वक्ते अॅड. निखिल रामचंद्र बुरबुरे यांनी मार्गदर्शन करताना भारतीय संविधानातील अनुच्छेद १३ ते २१ चे महत्त्व अत्यंत सोप्या आणि प्रभावी भाषेत स्पष्ट केले. संविधानविरोधी कायदे अमान्य ठरविण्याची तरतूद, कायद्यापुढे सर्वांना समानता, धर्म, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभावास प्रतिबंध, सार्वजनिक रोजगारांमध्ये समान संधी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य तसेच जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार हे भारतीय लोकशाहीचे मूलभूत आधारस्तंभ आहेत, असे त्यांनी सांगितले.

संविधानाने नागरिकांना अधिकारांसोबतच कर्तव्यांचीही जाणीव करून दिली असून, युवकांनी संविधानातील मूल्यांचा अंगीकार करून जबाबदार, जागरूक आणि कायद्याचा आदर करणारे नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सहाय्यक आयुक्त डॉ. सुधाकर झळके यांनी कौशल्य विकास आठवड्यांतर्गत सेंद्रिय शेती : रोजगार व उद्योजकतेच्या नव्या संधी या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन सत्रात माहिती दिली. वाढत्या काळात सेंद्रिय शेतीचे महत्त्व, मूल्यवर्धित कृषी उत्पादन, कृषी उद्योजकता तसेच ग्रामीण युवकांसाठी उपलब्ध स्वयंरोजगाराच्या संधी याबाबद्दल तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवती, शेतकरी, कृषी विद्यार्थी आणि इच्छुक नागरिकांनी या सत्रात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वर्धा यांच्या या उपक्रमामुळे युवकांमध्ये रोजगार, उद्योजकता, कौशल्य विकास, संविधानिक मूल्ये तसेच शाश्वत विकासाच्या संकल्पनांविषयी सकारात्मक जनजागृती होत असल्याचे दिसून येत आहे.

## संक्षिप्त

### दारूच्या नशेत मुलांकडून वडिलांना मारहाण

**गिरड-** कौटुंबिक वादातून दोन मुलांनी स्वतःच्या वडिलांनाच मारहाण करून जखमी केल्याची धक्कादायक घटना पवनगाव येथे उघडकीस आली. या प्रकरणात गिरड पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. अशोक मसराम वय ५६ यांना राकेश शंकर आणि रोशन अशी तीन मुले आहेत. यापैकी राकेश याला दारूचे व्यसन असून तो नेहमी मद्यप्राशन करून घरी वाद घालत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेच्या दिवशी राकेश हा आईला शिवीगाळ करीत होता. त्यावेळी वडील अशोक मसराम यांनी त्याला समज देत विरोध केला. याचा राग आल्याने राकेश आणि शंकर यांनी मिळून वडिलांना मारहाण केली. या मारहाणीत अशोक मसराम जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच गिरड पोलिसांनी प्रकरणाची नोंद करून तपास सुरू केला आहे.

### समोरासमोर धडकेत दुचाकीस्वार जखमी

**दहेगाव -** जुनोना ते शिवनगर मार्गावर दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन एका दुचाकीस्वाराला गंभीर दुखापत झाली. या प्रकरणी निष्काळजीपणे वाहन चालविणाऱ्या चालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. संजय देशमुख वय ४९ रा. दहेगाव गो. हे आपल्या दुचाकीने शेताकडे जात होते. त्याचवेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या एमएच ३२ एस ५३९६ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात संजय देशमुख गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेनंतर पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला. संजय देशमुख यांच्या तक्रारीवरून आरोपी दुचाकी चालक कैलास आत्राम याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### कत्तलीसाठी नेणाऱ्या चार गोवंशांची पोलिसांकडून सुटका

**आर्वी -** जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करत पोलिसांनी चार गोवंशांची सुखरूप सुटका केली. या कारवाईत वाहनासह सुमारे पाच लाख पंचवीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राणे हॉस्पिटल परिसरात गोवंशांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून एमएच ३२ एजे ३१४६ क्रमांकाचे वाहन अडवून तपासणी करण्यात आली. वाहनात चार गोवंश कोंबून कत्तलखान्याकडे नेले जात असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तत्काळ जनावरांची सुटका करून वाहन जप्त केले. या प्रकरणी अफसर शहा सरवर शहा वय ४५ रा. संजयनगर आर्वी आणि राहुल कांबळे वय ३० रा. मासोद यांच्याविरुद्ध संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## उमेद अभियानातील कॅडरच्या मागण्या मार्गी लावणार - पालकमंत्री

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत कार्यरत कॅडरच्या विविध प्रलंबित मागण्या मंजूर करण्यासंदर्भात शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, गृहनिर्माण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री तथा वर्धा व भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. संघर्ष उमेद कॅडर व महिला संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने डॉ. भोयर यांना आपल्या न्यायिक मागण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले.



उमेद अभियानातील कॅडर राज्यातील ग्रामीण महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. महिला बचत गटांची स्थापना, ग्रामसंघ व प्रभागसंघांचे बळकटीकरण, विविध शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविणे, प्रशिक्षण, जनजागृती, सर्वेक्षण, डिजिटल माहिती संकलन, अहवाल सादर करणे यासह अनेक जबाबदा-या कॅडरकडून पार पाडल्या जातात. तसेच ग्रामीण महिलांना स्वावलंबी बनविणे, शेतीपूरक व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन आणि उद्योजकतेला चालना देण्यामध्येही त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक वेळा स्वतःच्या खर्चातून गावागावात जाऊन शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी लागत असल्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले.

संघटनेने आपल्या प्रमुख मागण्यांमध्ये गावस्तरीय कॅडरच्या मानधनात २०२४ च्या जीआरनुसार दुप्पट वाढ करणे, प्रभाग संघ व्यवस्थापकांचे पूर्वीचे मानधन कायम ठेवणे, ग्रामसंघ व प्रभाग संघ लेखापालांना अभियानाचे कॅडर म्हणून घोषित करून इतर कॅडरप्रमाणे मानधन देणे, सर्व कॅडरचे मानधन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करणे, विमा संरक्षण व शासकीय सवलती लागू करणे, अतिरिक्त कामासाठी प्रवास भत्ता (टीए) मंजूर करणे, शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त पदांवर अभियानातूनच समावेश करणे, मोबाईल, इंटरनेट व इतर क्षेत्रीय कामासाठी स्वतंत्र भत्ता आणि आवश्यक उपकरणे उपलब्ध करून देणे तसेच महागाई निर्देशांकानुसार दरवर्षी किमान २० टक्के मानधनवाढीचे धोरण निश्चित करण्याची मागणी केली आहे.

याशिवाय, महाराष्ट्र राज्य ग्रामविकास विभागातील वरिष्ठ अधिकारी, उमेद अभियानातील प्रमुख अधिकारी आणि संघर्ष उमेद कॅडर व महिला संघटनेच्या पदाधिका-यांची संयुक्त बैठक आयोजित करून कॅडरच्या समस्या ऐकून कायमस्वरूपी तोडगा काढण्याची विनंती निवेदनातून केली आहे. ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने प्रामाणिकपणे कार्य करणा-या उमेद अभियानातील कॅडर च्या न्याय्य मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात येईल,असे आश्वासन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शिष्टमंडळाला दिले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अतुल शेंदरे, उपाध्यक्ष कल्पना खोबे, सचिव विजय दरणे उपस्थित होते.

## चाकू हल्ल्याने हिरावला तरुणाचा जीव

### खा.अमर काळेंनी कुटुंबीयांची घेतली सांत्वनपर भेट

**वर्धा/जनमाध्यम**

नालवाडी परिसरातील मोंटोना हॉटेलमध्ये ३० जून रोजी झालेल्या चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या इमरान शेख याची तब्बल दहा दिवस मृत्यूशी सुरू असलेली झुंज अखेर अपयशी ठरली. नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्याची प्राणज्योत मालवली. या घटनेने शहरावर शोककळा पसरली असून शेख कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

इमरानच्या निधनाची बातमी समजताच खा.अमर काळे यांनी आपल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढत १० जुलै रोजी शेख कुटुंबीयांच्या निवासस्थानी धाव घेतली. त्यांनी इमरानचे वडील अॅड. असद खान यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.दुःखाने व्याकूळ झालेल्या कुटुंबीयांना धीर



देत दिवंगत इमरानच्या आत्म्यास चिरशांती लाभावी,अशी प्रार्थना केली.

३० जून रोजी मोंटोना हॉटेलमध्ये झालेल्या चाकू हल्ल्यात इमरान गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर त्याला तातडीने नागपूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र नियतीपुढे तेही निष्फळ ठरले. इमरानच्या अकाली निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

सांत्वन भेटीदरम्यान इमरान राही,अॅड. मोटवानी, अक्रम पठाण, तुषार देवढे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. इमरानच्या आठवणींनी घरातील वातावरण गहिवरून गेले होते. कुटुंबीयांचे अश्रू आणि उपस्थितांचे सांत्वन यामुळे परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले.

## माय भारत पोर्टलवर नोंदणी करा प्रभारी निवासी - खताळे

**वर्धा/जनमाध्यम**

विकसित भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून जिल्ह्यातील प्रत्येक तरुणाने 'माय भारत' पोर्टलवर नोंदणी करून राष्ट्रनिर्मितीच्या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे यांनी केले. जिल्हास्तरीय युवा कार्यक्रम सल्लागार समितीच्या बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



माय भारत केंद्राच्या वतीने आयोजित बैठकीला जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, जिल्हा कौशल्य अधिकारी प्रदीप नेमाडे, जिल्हा युवा अधिकारी सुशील भड, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक वैभव लहाने, जिल्हा क्रीडा अधिकारी अनिल निमगडे, पंचायत राज अधिकारी धम्मदीप पुऽलझोले, भारत स्काऊट्स अँड गाईड्सचे जिल्हा संघटक नितेश झाडे व वैशाली घोम, माय भारतचे लेखाधिकारी दयाराम रामटेके, शुभम ताकसांडे, युवा मंडळाचे सतीश इंगोले तसेच स्वयंसेवक अनुष्का काळे, सोनाली जाधव, कोमल ठाकरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत युवकांमध्ये जनजागृतीसाठी प्रभावी अभियान राबविणे, स्पर्धा परीक्षांसोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल कौशल्ये आणि भविष्यातील रोजगाराभिमुख प्रशिक्षणावर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच एनएसएस, एनसीसी, भारत स्काऊट्स अँड गाईड्स आणि माय भारत यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षभर व्यापक युवा उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले.

## इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या

### विविध योजनाचा लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील नागरिकांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देण्यासह उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या बहुजन कल्याण विभागांतर्गत महाराष्ट्र इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळामार्फत विविध कर्ज व व्याज परतावा योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक वंदना खोडे यांनी केले आहे.

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या २० टक्के बीज भांडवल योजनेत राष्ट्रीयकृत बँकांमार्फत कर्ज पुरवठा केला जातो. या योजनेत महामंडळाचा २० टक्के, लाभार्थ्यांचा ५ टक्के आणि बँकेचा ७५ टक्के सहभाग असून कमाल प्रकल्प मर्यादा ५ लाख रुपये आहे. या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना महामंडळामार्फत १२ टक्क्यांपर्यंत व्याज परतावा अनुदान दिले जाते. या योजनेसाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपर्यंत असावे.

याशिवाय, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजनेअंतर्गत इतर मागासवर्गीय प्रवर्गातील गरीब आणि होतकरू महिलांच्या सक्षमीकरणासाठी बँकांमार्फत मंजूर करण्यात आलेल्या ५ ते १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर १२ टक्के व्याज परतावा उपलब्ध करून दिला जातो. ही योजना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधन केंद्रामार्फत राबविण्यात येते. लाभार्थी महिला महाराष्ट्राची रहिवासी असणे आवश्यक असून त्यांचे वय १८ ते ६० वर्षांदरम्यान असावे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, वर्धा कार्यालयाशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या www.msobcfdc.org.in या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक वंदना सं. खोडे यांनी केले आहे.

# चिमुकल्यांच्या खांद्यावर शिक्षणाचे ओझे

### बालपण हरवत आहे का?

**आर्वी/जनमाध्यम**

शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या प्रयत्नांमध्ये चिमुकल्यांच्या बालपणावरच गदा येत असल्याची भावना आर्वीतील अनेक पालक व्यक्त करत आहेत. नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनिअर केजी आणि पहिलीच्या विद्यार्थ्यांना दररोज सहा सहा तास शाळेत बसविले जात असून त्यांच्या दप्तराचे वाढते वजनही चिंतेचा विषय बनले आहे. खेळण्याच्या. बागडण्याच्या आणि आनंदाने शिकण्याच्या वयात एवढा शैक्षणिक ताण देणे कितपत योग्य आहे असा प्रश्न पालक उपस्थित करत आहेत.

अनेक खासगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दररोज अनेक पुस्तके आणि वह्या दप्तरात भरून आणाव्या लागतात. काही शाळा इमारतींच्या दुसऱ्या मजल्यावर असल्याने ही जड दप्तरं लहान मुलांनाच जिना चढून वर्गापर्यंत घेऊन जावी लागतात. एवढ्या लहान वयात त्यांच्या शारीरिक क्षमतेपेक्षा अधिक वजन वाहून नेण्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शिक्षण आनंददायी असावे. खेळातून ज्ञान मिळावे. मुलांच्या मानसिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळावी अशी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची भूमिका असताना प्रत्यक्षात मात्र चिमुकल्यांवर अभ्यासाचे ओझे वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. सलग सहा तास वर्गात बसणे, गृहपाठ, जड दप्तर आणि स्पर्धेचे वाढते दडपण यामुळे बालपण हरवत असल्याची खंत पालक व्यक्त करत आहेत.

पालकांचे म्हणणे आहे की नर्सरी ते पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय वेळ. अभ्यासक्रम आणि दप्तराचे वजन याबाबत स्पष्ट आणि कठोर नियमांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाने नियमित तपासणी करून शाळांकडून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन होत आहे की नाही याची खातरजमा करावी अशी मागणीही पुढे येत आहे.

बालपण हे आयुष्यातील सर्वात सुंदर आणि संवेदनशील टप्पा मानला जातो.याच वयात मुलांच्या खांद्यावर क्षमतेपेक्षा



जास्त शैक्षणिक बोजा टाकला जात असेल तर त्याचा त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर दूरगामी परिणाम होऊ शकतो अशी चिंता व्यक्त होत आहे.

आता शिक्षण विभाग या गंभीर प्रश्नाची दखल घेणार का? चिमुकल्यांच्या दप्तराचे वजन कमी होणार का. सहा तासांच्या शालेय वेळेचा फेरविचार होणार का. बालपण जपत शिक्षण देण्यासाठी ठोस उपाययोजना केव्हा होणार. असे अनेक प्रश्न पालक आणि नागरिकांकडून उपस्थित केले जात असून प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २२५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# बोगस संत्रा कलमांमुळे शेतकऱ्यांची कोट्यवधींची फसवणूक; नर्सरी अधिनियम कठोर करा

## फसवणूक करणाऱ्या नर्सरी चालकांवर गुन्हे दाखल करून तुरुंगात पाठवा

### विधान परिषदेत बच्चू कडूंची जोरदार मागणी

**अमरावती/प्रतिनिधी:-** विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची निकृष्ट, बनावट व चुकीच्या जातीच्या कलमांमुळे होत असलेली कोट्यवधी रुपयांची फसवणूक, राज्यभर वाढलेला बोगस नर्सरी व्यवसाय आणि फळबाग क्षेत्रासमोरील गंभीर प्रश्न विधान परिषदेत आमदार बच्चू कडू यांनी अत्यंत आक्रमकपणे उपस्थित केला. राज्यातील लाखो फळबाग उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी विद्यमान महाराष्ट्र फळरोपवाटिका व फळझाडे विक्री (नियमन) अधिनियम, १९६९ मध्ये तातडीने कठोर दुरुस्ती करून नर्सरी व्यवस्थेत पारदर्शकता आणावी, फसवणूक करणाऱ्या नर्सरी चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तुरुंगात पाठविण्याची तरतूद करावी, अशी ठाम मागणी त्यांनी सभागृहात केली. बच्चू कडू म्हणाले की,



आज राज्यात अनेक नर्सरी कृषी विभागाच्या नोंदणीशिवाय किंवा नियमांचे पालन न करता कार्यरत आहेत. अशा नर्सरींमधून शेतकऱ्यांना मूळ जातीच्या नावाखाली चुकीच्या जातीची कलमे विकली जात आहेत. सांगताना एक जात असते; प्रत्यक्षात मात्र दुसरीच जात दिली जाते. संत्रा, मोसंबी, लिंबू, डाळिंब,पेरू आणि आंबा या फळपिकांमध्ये ही फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत आहे.

विदर्भातील संत्रा लागवडीत जांभेरी, रंगपूर, गलगळ आणि अलेमो या रूटस्टॉकचा वापर केला जातो. यापैकी जांभेरी आणि रंगपूर हे अधिक दर्जेदार मानले जात असतानाही अनेक नर्सरी हिमाचल प्रदेशातून मोठ्या प्रमाणावर गलगळचे बियाणे आणून त्यावर संत्र्याची कलमे तयार करतात आणि ती जांभेरीच्या नावाने विकून शेतकऱ्यांची दिशाभूल करतात. परिणामी झाडांची वाढ, उत्पादन क्षमता, आयुष्य आणि फळांची गुणवत्ता यावर गंभीर परिणाम होतो. याशिवाय व्हायरस, बॅक्टेरिया, नेमाटोड्स, फायटोफ्थोरा आणि सिट्रस ग्रीनिंग (एचएलबी) यांसारखे घातक रोग नर्सरीतूनच शेतात पोहोचत असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या संपूर्ण बागा उद्ध्वस्त होत आहेत. एका चुकीच्या कलमामुळे शेतकऱ्याचे पाच ते सात वर्षांचे कष्ट आणि प्रति एकर पाच ते सात लाख रुपयांपर्यंतची गुंतवणूक वाया जाते. ही केवळ आर्थिक फसवणूक नसून शेतकऱ्याच्या भवितव्याशी खेळ असल्याचे बच्चू कडू यांनी सभागृहात ठामपणे सांगितले.

यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, राज्यातील नर्सरी व्यवसायात शिस्त आणण्यासाठी विद्यमान नर्सरी अधिनियम अधिक कठोर करणे अत्यावश्यक आहे. केवळ परवाना देण्याची प्रक्रिया पुरेशी नसून, ज्यांच्याकडे शास्त्रीयदृष्ट्या प्रमाणित आणि तपासणी झालेला मातृवृक्ष उपलब्ध आहे, अशाच नर्सरींना परवाना देण्यात यावा. मूळ मातृवृक्ष नसलेल्या किंवा खोटी माहिती देणाऱ्या नर्सरींना कोणत्याही परिस्थितीत कलमे तयार करण्याची परवानगी देऊ नये.

प्रत्येक मातृवृक्षाची डीएनए तपासणी किंवा वैज्ञानिक लीफ एनालिसिस अनिवार्य करण्यात यावे. तसेच सिट्रस ट्रिस्टेझा व्हायरस , सिट्रस ग्रीनिंग , फायटोफ्थोरा यांसारख्या रोगांच्या तपासणीशिवाय कोणत्याही नर्सरीला परवाना देऊ नये. राज्यात जिल्हा स्तरावर आधुनिक प्रयोगशाळा उभारून या तपासण्या सुलभ आणि परवडणाऱ्या करण्यात याव्यात.

बच्चू कडू यांनी राज्यातील सर्व नोंदणीकृत व अनधिकृत नर्सरींची विशेष तपासणी मोहीम तातडीने राबविण्याची मागणी केली. प्रत्येक नर्सरीतील मातृवृक्ष, रूटस्टॉक, कलमे आणि नोंदींची वैज्ञानिक पडताळणी करून दोषी आढळणाऱ्या नर्सरींवर तात्काळ कारवाई करावी. केवळ दंड आकारून कारवाई थांबवू नये, तर शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या नर्सरी चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तुरुंगात पाठविण्याची स्पष्ट कायदेशीर तरतूद नर्सरी अधिनियमात करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. बच्चू कडू यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची दखल घेत रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी या विषयावर तातडीने उच्चस्तरीय बैठक घेऊन नर्सरी व्यवस्थेतील सुधारणा, फळबाग उत्पादकांसाठी संरक्षणात्मक उपाययोजना आणि नवीन धोरण तयार करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरच आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# ॲडमिन पोर्टल हॅक; ७.०८ लाखांचा सायबर डल्ला

## एफ-पे कम्युनिकेशन कंपनीच्या व ग्राहकांच्या वॉलेटमधील रक्कम परस्पर वळती

**अमरावती/प्रतिनिधी:-** सायबर गुन्हेगारांनी आता थेट फिनटेक कंपन्यांनाच लक्ष्य करण्यास सुरुवात केली असून, अमरावतीतील एका फिनटेक कंपनीचे ॲडमिन पोर्टल हॅक करून तब्बल ७ लाख ८ हजार ४४८ रुपयांची ऑनलाइन अफरातफर केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. कंपनीच्या व ग्राहकांच्या डिजिटल वॉलेटमधील रक्कम विविध बँक खात्यांमध्ये वळती केल्याप्रकरणी अमरावती शहर सायबर पोलिसांनी अज्ञात सायबर गुन्हेगाराविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



फिर्यादी मोहम्मद फैजाना रजा मोहम्मद अख्तर (२९, रा. हबीबनगर) हे एफ-पे कम्युनिकेशन प्रा. लि. या फिनटेक कंपनीचे संस्थापक आहेत. मोबाईल व डीटीएच रिचार्ज, वीज व इतर बिल भरणा, मनी ट्रान्सफर, एईपीएससह विविध डिजिटल आर्थिक सेवा कंपनीमार्फत दिल्या जातात. २ जुलै रोजी दुपारी अज्ञात हॅकरने कंपनीच्या ॲडमिन पोर्टलमध्ये अनधिकृत प्रवेश मिळवत पासवर्ड बदलला. त्यानंतर कंपनीच्या मुख्य वॉलेटसह ग्राहकांच्या वॉलेटमधील एकूण ७.०८ लाख रुपये विविध बँक खात्यांमध्ये ऑनलाइन हस्तांतरित करण्यात आले. व्यवहारांमध्ये अनियमितता दिसून आल्यानंतर कंपनीने अंतर्गत चौकशी केली असता सायबर फसवणुकीचा प्रकार समोर आला.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६(क) व ६६(ड) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींपर्यंत पोहोचण्यासाठी बँक व्यवहार, आयपी ॲड्रेस, लॉगिन हिस्ट्री आणि अन्य डिजिटल पुराव्यांची सखोल तपासणी सुरू असल्याची माहिती सायबर पोलिसांनी दिली.

# कासमपूरमध्ये देशी कट्ट्यासह युवक जेरबंद

## -पथ्रोट पोलिसांची धडक कारवाई -शस्त्र पुरवठादाराचा शोध सुरू

**अमरावती/प्रतिनिधी:-** अवैधरित्या देशी बनावटीचे शस्त्र बाळगणाऱ्या एका युवकाला पथ्रोट पोलिसांनी कासमपूर येथे केलेल्या धडक कारवाईत अटक केली. आरोपीच्या घराची झडती घेतली असता देशी बनावटीचे पिस्तूल, दोन मॅगझिन आणि तीन जिवंत काडतुसे आढळून आली. या कारवाईत सुमारे २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपीला शस्त्र पुरविणाऱ्या संशयिताचा शोध पोलीस घेत आहेत.

पथ्रोट पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती की, कासमपूर येथील अनिकेत रविंद्र महाजन (वय २४) हा आपल्या ताब्यात अवैध देशी कट्टा बाळगत आहे. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी पंचांसमक्ष त्याच्या घरावर छापा टाकला. झडतीदरम्यान देशी बनावटीचे पिस्तूल, दोन मॅगझिन आणि तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. त्यानंतर अनिकेत महाजन याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली.

चौकशीत आरोपीने हे शस्त्र अमरावतीतील अर्जुन नगर येथील विपुल भानुदास ठाकरे याच्याकडून मिळाल्याची कबुली दिली. या माहितीच्या आधारे अनिकेत महाजन आणि विपुल ठाकरे या



दोघांविरुद्ध शस्त्र अधिनियमाच्या कलम ३ व २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिकेत महाजन सध्या पोलीस कोठडीत असून, शस्त्र पुरवठा केल्याचा आरोप असलेल्या विपुल ठाकरेचा पोलीस शोध घेत आहेत. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पथ्रोट पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अभय चौथनकर व त्यांच्या पथकाने केली. दरम्यान, नागरिकांनी परिसरात कोणीही अवैधरित्या शस्त्रे बाळगत असल्याची अथवा सोशल मीडियावर शस्त्रांचे प्रदर्शन करून दहशत निर्माण करणारे फोटो किंवा व्हिडिओ प्रसारित करत असल्याची माहिती तातडीने पोलिसांना द्यावी, असे आवाहन पथ्रोट पोलिसांनी केले आहे. माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# औरंगपुरामध्ये दोन गटात राडा

## -नगरसेवक समर्थकांमध्ये तुफान हाणामारी

**अमरावती/प्रतिनिधी:-** शहरातील संवेदनशील औरंगपुरा परिसरात वर्चस्व आणि जुन्या वादातून दोन गट आमने-सामने आल्याने शुक्रवारी रात्री मोठा राडा झाला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही गटातील डझनभर लोकांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. माहिती नुसार औरंगपुरा येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक रतन डेंडूले आणि करण डेडवाल यांच्या समर्थकांमध्ये वाद झाला. किरकोळ बाचाबाचीचे पर्यावसान हाणामारीत झाले आणि दोन्ही गटाने एकमेकांवर हल्ला केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. वाद एवढा वाढला की, नगरसेवक रतन डेंडूले आणि दुसऱ्या पक्षाचे लोक तक्रार देण्यासाठी कोतवाली ठाण्यात पोहोचले. मात्र, ठाण्यातही दोन्ही गट समोरा समोर आल्याने पुन्हा गोंधळ झाला. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला.



### -दोन्ही गटातील लोकांविरुद्ध गुन्हे दाखल

घटनेची माहिती मिळताच कोतवाली ठाणेदार रोशन शिरसाठ यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.दोन्ही बाजूंच्या तक्रारीवरून मारहाण, दंगल आणि सरकारी कामात अडथळा या कलमान्वये गुन्हे नोंदवले आहेत.पोलिसांनी दोन्ही गटातील डझनभर लोकांना आरोपी केले आहे. याशिवाय परिसरात शांतता भंग करणाऱ्यांवर ही स्वतंत्र कारवाई केली जाणार आहे.स्थिती गंभीर असल्याने पोलिसांनी परिसरात अतिरिक्त कुमक बोलावली. सध्या सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिसांनी संशयितांच्या घरीही धाडी टाकल्या आहेत.

कोतवालीचे ठाणेदार रोशन शिरसाठ म्हणाले, 'परिसरातील परिस्थिती अजूनही तणावपूर्ण आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधी:-** परसोडा रोड परिसरात रेल्वेच्या धडकेत एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे.प्रकाश येते ( रा. चिंतामणी नगर, परसोडा रोड ) असे मृतकाचे नाव आहे.माहितीनुसार, प्रकाश येते हे रेल्वे रुळ ओलांडत असताना किंवा रुळाजवळून जात असताना हा अपघात झाला असावा. रेल्वेची जोरदार धडक बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिस आणि दत्तापूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे चिंतामणी नगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.





## जाहीर सूचना

या जाहीर सूचने व्दारे **रणजित प्रल्हाद राऊत,** रा.म्हाडा कॉलनी, अकोली रोड, अमरावती मोबाईल नं. ७७६९८२२०६७ यांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **यमुनाबाई नारायण मेटकर, रा.वाघोडा, पो.सुलतानपुर, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** यांनी आपणांविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहितेचे कलम २४७ अंतर्गत वि.उपविभागीय अधिकारी, नांदगाव खंडेश्वर, यांचे समक्ष यमुनाबाई नारायण मेटकर वि.तलाठी मौजे वाघोडा व इतर हे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिल प्रकरणाची नोटीस आपणांवर वारंवार बजावण्यात आली असून सदर नोटीस आपणांस मिळालेली नाही. रणजित प्रल्हाद राऊत यांचा वर नमूद पत्यावर शोध घेतला असता आपण तेथे राहत नसल्याचे आढळून आले. तसेच आपल्या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता सदर फोन बंद असल्याचे निदर्शनास आले.

वि.उपविभागीय अधिकारी, नांदगाव खंडेश्वर यांनी दि. ०८.०७.२०२६ रोजी दिलेल्या सूचनेनुसार आपणांस **(रणजित प्रल्हाद राऊत यांना)** या जाहीर सुचनेव्दारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकाराचे अपील प्रकरणाची पुढील तारीख १५.०७.२०२६ ही नेमलेली असून त्यामध्ये आपण हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा आपणांस सदर प्रकरण चालविण्यास कोणताही रस नाही असे गृहीत धरुन सदर प्रकरण आपल्या अनुपस्थितीत चालविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सबब कळावे.

**दिनांक ११/०७/२०२६**
**अमरावती**

**सही /-**
**ॲड.एन.एस.गजभिये**
**मो.-९४२२९१७६९३**



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात सामाजिक पंधरवडा उपक्रमाचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधी:-** स्मृतिशेष दादासाहेब गवई यांच्या स्मृतिदिनानिमित्त व आईसाहेब डॉ. कमलताई रा. गवई यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त १३ ते २६ जुलैदरम्यान वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे, सामाजिक उपक्रम, व्याख्याने, राज्यस्तरीय नेटबॉल आणि जिल्हास्तरीय योगासन स्पर्धांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजकारण, शिक्षण, लोककल्याण आणि सामाजिक न्याय या मूल्यांची जोपासना करत विद्यार्थ्यांना समाजाभिमुख शिक्षणाची दिशा देण्याच्या उद्देशाने श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावतीद्वारे संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, उत्तमनगर, अमरावती येथे दि. १३ ते २६ जुलै २०२६ या कालावधीत सामाजिक उपक्रम पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. संस्थेचे प्रेरणास्थान स्मृतिशेष दादासाहेब गवई (माजी राज्यपाल, बिहार व केरळ) यांच्या स्मृतिदिनानिमित्त तसेच समाजसेवा, शिक्षण आणि स्त्री-सक्षमीकरणाच्या कार्याला आयुष्यभर वाहून घेतलेल्या आईसाहेब डॉ. कमलताई रा. गवई यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदाचा पंधरवडा केवळ स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित कार्यक्रम नसून शिक्षणातून समाजपरिवर्तन या संकल्पनेचा कृतीशील आविष्कार आहे. पर्यावरण, आरोग्य, सामाजिक संवेदनशीलता, आर्थिक साक्षरता, व्यक्तिमत्त्व विकास, क्रीडा, मानसिक स्वास्थ्य आणि राष्ट्रनिर्मिती यांसारख्या विविध अंगांना स्पर्श करणारे उपक्रम या कालावधीत राबविले जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी समाजाशी जोडले जावे, नागरिकांशी संवाद साधावा आणि शिक्षणासोबत सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित करावी, हा या उपक्रमामागील मूलभूत हेतू आहे.

पंधरवड्याची सुरुवात १३ जुलै रोजी 'एक विद्यार्थी – एक झाड' या पर्यावरण संवर्धन मोहिमेने होणार आहे.

१६ जुलै रोजी होणारी फेन्सिंग स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये धैर्य, आत्मसंयम, शिस्त आणि क्रीडाभावना विकसित करण्यास पूरक ठरणार आहे. महाविद्यालयात आधुनिक क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे. १७ जुलै रोजी महिलांसाठी आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन केले जाणार आहे. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्याचा हा प्रयत्न आहे. २० जुलै रोजी स्वच्छता मोहिमेद्वारे स्वच्छ परिसर, निरोगी समाज आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या सहभागातून स्वच्छतेबाबत सामाजिक जनजागृती करण्यात येणार आहे. २१ जुलै रोजी महाविद्यालयातील कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. २२ जुलै रोजी विद्यार्थ्यांसाठी बँक खाते उघडण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. डिजिटल अर्थव्यवस्था, आर्थिक साक्षरता आणि शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. २३ जुलै रोजी स्मृतिशेष दादासाहेब गवई यांच्या जीवन, विचार आणि कार्यावर आधारित निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

त्यांच्या सामाजिक न्याय, लोकसेवा आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. २४ जुलै रोजी त्यांच्या जीवनकार्यावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात येणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांनी या आयोजना संदर्भात आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, 'शिक्षण संस्थेचे कार्य केवळ ज्ञानदानापुरते मर्यादित नसते; ती सामाजिक परिवर्तनाची प्रयोगशाळा असते.

स्मृतिशेष दादासाहेब गवई यांनी आयुष्यभर सामाजिक न्याय, समता, शिक्षण आणि लोककल्याणाचा विचार जपला. त्या विचारांचे संवर्धन करणे ही आमची नैतिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी समाजाशी नाळ जोडावी, सेवा, संवेदनशीलता आणि संविधानिक मूल्यांचा स्वीकार करावा, यासाठी आम्ही सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करतो.

या आयोजित विविध उपक्रमाचा विद्यार्थी पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्यांनी केले आहे.



## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**





प्रो.क्र.६०६/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**

**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

**आर.एम.जे.सी.क्रमांक २२२/२०२६** **ने.ता.०७.०८.२०२६**

अर्जदार : **1. Pravin Ashokrao Patil,**
Age 46 Yrs. Occu.: Agriculturist
R/o. Takarkheda Shambhu,
Tq. Bhatkuli, Dist. Amravati

***विरुध्द***

**गैरअर्जदार:** Nil

ज्यापेक्षा Ashok Punjaji Patil **हे दि.०२.१२.२०२५ रोजी मयत झाले.** अर्जदार Pravin Ashokrao Patil, Age 46 yrs, Occu- Agriculturist, R/o. Takarkheda Shambhu, Tq. Bhatkuli, Dist. Amravati यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.**२४.०६.२०२६** रोजी अर्ज केला आहे.या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत Ashok Punjaji Patil यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत Ashok Punjaji Patil यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २९.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

**आदेशान्वये,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर), भातकुली**
**दि.२९/०६/२०२६**





## WANTED

**Walk-In-Interview**

**SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY, AMRAVATI'S**
**SHRI SHIVAJI SHARIRIK SHIKSHAN MAHAVIDYALAYA, AMRAVATI.**

Applications are invited for appointments of Candidates for Teaching in the College on contributory (CHB) basis as under.

**Vacancies for Grant in aid Courses/Programmes**

As per Regulation No.2/2020, and its para-11, G.R. Dated 17.10.2022

| Sr. No. | Subject/ Course | Total No. of Contri-butory Post |
|---|---|---|
| 01 | B.P.Ed. | 40 |
| 02 | B.P.E. | 24 |

**Eligibility :** Academic qualifications shall be as per U.G.C.Regulation 2018 (University Direction No.08/ 2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No.संकिर्ण 2018/(१८५/१८)/मशि-३ Dtd.14-11-2018. The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

**Interview Date 21-07-2026, Time 12.00 P.M. to 3.00 P.M.**
**Venue - Shri Shivaji College of Physical Education, Shivaji Nagar, Amravati-444603, Ph.No.9422361735, 9890691547**

**Shri Harshwardhan P.Deshmukh**
**President,**
**Shri Shivaji Education Society,**
**Amravati.**

**Dr.Subhash P.Gawande**
**Principal**
**Shri Shivaji College of Physical Education, Amravati.**




जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३०४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# मिसिंग लिंक संदर्भात राज्याचे मुख्यमंत्र्यांचे विधान पुरोगामी महाराष्ट्रासाठी घातक - खा.वानखडे




**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर शहरातील मोती मंगल कार्यालय येथे मतदार यादी विशेष सखोल होणार निरीक्षण कार्यक्रमा निमित्त काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख खा.वानखडे यांनी आपल्या भाषणांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री यांनी मिसिंग लिंक संदर्भात नुकतेच केलेल्या विधान पुरोगामी महाराष्ट्र साठी घातक असल्याचा आरोप सुद्धा केला.

यावेळी कार्यक्रमा अमरावती जिल्ह्याचे खा. बळवंत वानखडे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, तालुकाध्यक्ष नामदेव तनपुरे ,शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे सह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी एस.आय.आर संदर्भात मार्गदर्शन केले.यावेळी खा.बळवंत वानखडे यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की,एस.आय.आर मध्ये सर्वांनी सहभागी व्हावे. सहभागी न झाल्यास पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये जे मतदारांची संख्या कमी झाली त्याची पुनरावृत्ती महाराष्ट्र राज्यात होऊ नये यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जागरूक व सजग राहण्याचे आव्हान सुद्धा त्यांनी यावेळी केले.

या कार्यशाळेला प्रमुख प्रशिक्षक म्हणून निखिल राजनकर निखिल काटोलकर अचलपूर विधानसभा यांची प्रमुख उपस्थिती होती.

## तिवसा तहसिलवर किसान सभेचे निदर्शने

**तिवसा -** शेतकऱ्यांना आश्वासन दिल्या प्रमाणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी संपुर्ण कर्जमाफी करावी यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर अखिल भारतीय किसान सभेचे वतीने निदर्शने आंदोलन करुन मुख्यमंत्री देवेन्द्र फडवनिस यांचे नावे तिवसा तहसिलचे नायब तहसिलदार कुरळकर यांना मागण्याचे निवेदन देवून २१ जुलै ला मुंबई आजाद मैदानवर जोरदार आंदोलनाचा ईशारा देण्यात आला. तिवसा तहसिलवरील मागण्या,शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा,कर्ज माफीच्या जाचक अटी रद्ध करा, दोन लाखाची मर्यादा हटवावी,नियमीत कर्जदारासाठी घातलेल्या कठोर अटी रद्ध करा व त्यांना न्याय द्या, मायक्रो फायनन्स सावकारी, सोनेतारन कर्जाचाही कर्जमाफी मधे समावेश करा ईत्यादी मागण्या आंदोलनात घेण्यात आल्या होत्या. आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉम्रेड.महादेव गारपवार, शेतमजूर युनियनचे जिल्हा सचीव कॉम्रेड. दिलीप शापामोहन यांनी केले. यावेळी अजय गारपवार, अशोक राऊत, चंदा विघ्ने,मोहीनी शापामोहन, गुणवंत टोने, हरी सोनटक्के, राजु सोळंके, बांगरे अशा अनेकांचे आंदोलनास सहभागी होते.या प्रसंगी देवेंद्र फडवणीस यांचे किसान मजूर विरोधी धोरणावर नेत्यांनी आपल्या भाषणातून तिव्र टीका करून लालबावटा जिंदाबादचे घोषनेत आंदोलन संपवीण्यात आले.



## राम मंदिर देणगी घोटाळ्याच्या निषेधार्थ आज महाआरती

**अमरावती-** अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या बांधकामासाठी मिळालेल्या निधीतील कथित अनियमितता आणि गैरव्यवहाराविरोधात शिवसैनिकांनी आंदोलन सुरू केले आहे. या कथित भ्रष्टाचारामुळे हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा दावा करत, १२ जुलै रोजी सकाळी १० वाजता अमरावतीतील अंबादेवी संकुलात भव्य आरती होणार आहे.अलीकडेच, शिवसेना (उत्तर प्रदेश) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील दादर येथे रामरक्षा आणि हनुमान चालिसेचे पठण करून देशव्यापी आंदोलनाचे आवाहन केले होते. याच पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यात हे प्रतिकात्मक आंदोलन आयोजित केले जात आहे. माजी खासदार अनंत गुढे या आंदोलनाचे नेतृत्व करतील.

# जुलै ते सप्टेंबरमध्ये डेंग्यू, चिकनगुनियाचा धोका

### आरोग्य विभागाकडून सतर्कतेचा इशारा

**पथ्रोट/वार्ताहर**

कीटकशास्त्रीय सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील काही शहरी व ग्रामीण भाग संवेदनशील आणि अतिसंवेदनशील आहेत. या भागांत डासांची घनता आणि साथीच्या आजारांचा उद्रेक होण्याची शक्यता अधिक आहे. पावसामुळे वाढलेली आर्द्रता, साचलेले स्वच्छ व अस्वच्छ पाणी यामुळे डासांच्या उत्पत्तीस पोषक वातावरण होते. परिणामी डेंग्यू, चिकुनगुनिया आणि मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे आरोग्य यंत्रणेने सतर्क होण्याबरोबरच नागरिकांनीही ड्राय डे पाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि डासोत्पत्तीची स्थाने नष्ट करणे आवश्यक आहे.

पावसात गारवा आणि हिरवाई वाढते; मात्र याच काळात डासांच्या उत्पत्तीलाही वेग येतो. जून ते सप्टेंबर हा कालावधी पारेषण कालावधी म्हटला जातो. या कालावधीत डासांच्या उत्पत्तीला स्थिती आणि वातावरण अनुकुल असते.अनेक ठिकाणी डबकी साचून राहिलेली असतात.त्यामुळे या कालावधीत डासांचा उच्छाद सुरू असतो. कुंडी, फ्रीज व एसी मागील ट्रे, बॅरल, ड्रम, भंगार साहित्य (टायर, नारळाची करवंटी, रिकामे डबे), टेरेस व जमिनीवरील टाकी ही काहीप्रमुख डासोत्पत्ती स्थाने आहेत कुंडीतील पाणी, फ्रिज क एसीच्या ट्रेमधील पाणी सतत बदलणे, टाक्या व ड्रमना झाकण लावणे व पाणी साठवण्याच्य टाक्या, भांडी आठवड्यातून एक दिवस घासून पुसून स्वच्छ धुवून कोरडे करणे आवश्यक आहे. याकरिता आरोग्य विभागाकडून उपाय योजन केल्या जात आहे.

> कीटकनाशकीय सर्वेक्षण आरोग्य सेवकामार्फ त घरोघरी भेट दिली जाते. पाण्यात चामडोक सारखे किटाणू असेल तर पाणी खाली करावेत, अन्यथा पाण्यात टेमिफोस टाकणे गरजेचे आहे. याचे मार्गदर्शन देखील केले जाते. आठवड्यातून एकदा ड्राय डे पाळावा, याकरिता आरोग्य विभागाकडून जनजागृती सुरू आहे.
>
> **डॉ. प्रवीण पारिसे,**
> जिल्हा आरोग्य अधिकारी

### अमावास्यानिमित्त श्रीक्षेत्र सावंगा (विठोबा) येथे

## चंदन उटी उत्सव आणि भव्य महाप्रसाद

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र सावंगा (विठोबा) येथे निज ज्येष्ठ अमावास्यानिमित्त मंगळवार, १४ जुलै रोजी विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, चंदन उटी उत्सव आणि भव्य महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने सायंकाळी ५ वाजता संस्थान परिसरात पारंपरिक पद्धतीने चंदन उटी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यावेळी भजन, नामस्मरण आणि भक्तिमय वातावरणात धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.या सोहळ्यास विश्वस्त मंडळ, सेवेकरी व हजारो भाविकांची उपस्थिती अपेक्षित असून, निज ज्येष्ठ अमावास्यानिमित्त श्री अवधूत महाराज यांचे दर्शन घेण्यासाठी परिसरासह विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने येणार आहेत.संस्थानचे वतीने याही वर्षी आषाढी निमित्त चंदन उटी उत्सव व गुरुपौर्णिमा कार्यक्रम तसेच श्रावण मास निमित्त अखंड जागृती भजन मांडीचे आयोजन करण्यात येत आहे.



या धार्मिक व आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तन, मन व धनाने सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच विश्वस्त वसंत शेंडे, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी यांनी केले आहे.




## गोठ्यातून बकऱ्यांची चोरी

**चांदूर रेल्वे -** तालुक्यातील विरूळ रोंघे येथे अज्ञात चोरट्यांनी गोठ्यातून सहा बकऱ्या व एक बोकड चोरून नेल्याची घटना १० जुलै रोजी उघडकीस आली. या चोरीत फिर्यादी नितेश शंकर सहारे यांच्या तीन बकऱ्या व एक बोकड तसेच आदेश कोरडे यांच्या तीन बकऱ्या असा एकूण ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## वाळू चोरीवर कारवाई

**आसेगाव -** वसणी खुर्द परिसरात अवैध वाळू उपशावर कारवाई करत आसेगाव पोलिसांनी १ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी छापा टाकताच ट्रॅक्टर चालक व त्याचे साथीदार घटनास्थळावरून पसार झाले. घटनास्थळावरून एमएच-२७-बीपी-९६६८ क्रमांकाचा ट्रॅक्टर, दोन वाळू गाळणीची साधने तसेच आरोपीचा मोबाईल असा एकूण १.२० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी सौरभ सुदाम वर्धे व इतर आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## दारू विक्रीच्या वादातून मारहाण

**अंजनगाव सुर्जी -** तालुक्यातील तुरखेड येथे दारू विक्री बंद करण्याचा सल्ला दिल्याच्या रागातून एका मजुरावर लोखंडी पाईपने हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली. अजय गौतम वानखडे (३५) यांनी विनोद नागोराव पुंडकर याच्या घरी जाऊन पंख्याची वायर जोडून दिल्यानंतर गावातील दारू विक्री बंद करण्याचा सल्ला दिला. याचा राग आल्याने आरोपीने लोखंडी पाईपने त्यांच्या कपाळावर व पायावर मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# धारणी तालुक्यात विकासकामांचा धडाका

### मात्र माहिती फलकांच्या अभावामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

**धारणी/वार्ताहर**

धारणी तालुक्यात सध्या विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. पंचायत समिती बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच विविध ग्रामपंचायतींच्या अंतर्गत रस्ते, इमारती, सिमेंट काँक्रीट रस्ते, नाली बांधकाम आणि इतर विकासकामे वेगाने सुरू आहेत. मात्र या कामांच्या ठिकाणी आवश्यक असलेले माहिती फलक मोठ्या प्रमाणावर आढळून येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

शासकीय नियमानुसार कोणतेही विकासकाम सुरू करण्यापूर्वी त्या कामाची संपूर्ण माहिती देणारा फलक लावणे बंधनकारक आहे.या फलकावर कामाचे नाव, मंजूर निधी, कामाची किंमत, काम पूर्ण करण्याचा कालावधी, संबंधित विभाग व कंत्राटदाराची माहिती नमूद करणे अपेक्षित असते. विशेष म्हणजे प्रत्येक अंदाजपत्रकामध्ये (इस्टिमेट) माहिती फलकासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात येते आणि त्यासाठी शासनाकडून निधीही उपलब्ध करून दिला जातो.

मात्र तालुक्यातील अनेक गावांमध्ये सुरू असलेल्या कामांच्या ठिकाणी माहिती फलक दिसून येत नसल्याचे समजत आहे. त्यामुळे संबंधित कामाचा निधी किती आहे, काम कोणत्या विभागामार्फत करण्यात येत आहे तसेच कामाची गुणवत्ता व कालमर्यादा याबाबत नागरिकांना माहिती मिळणे कठीण होत आहे. यामुळे विकासकामांच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

काम सुरू करण्यापूर्वी अनेक ठिकाणी भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

त्या वेळी जनप्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित राहतात. अशा प्रसंगी माहिती फलक उभारणे आवश्यक असतानाही अनेक ठिकाणी या नियमाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी नागरिकांना कामांची अधिकृत माहिती मिळत नसल्याची तक्रार पुढे येत आहे

स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. तसेच तालुक्यात सुरू असलेल्या सर्व विकासकामांच्या ठिकाणी तातडीने माहिती फलक लावण्याचे निर्देश देऊन नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, विकासकामांमध्ये पारदर्शकता आणि जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने याबाबत विशेष मोहीम राबवून विविध विभागांकडून सुरू असलेल्या कामांची तपासणी करावी व माहिती फलक न लावणाऱ्या संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# अखेर शेतकऱ्यांचे आमरण उपोषण मागे

**लेहेगाव/वार्ताहर**

मोर्शी तालुक्यातील पिंपळ खुटा मोठा सर्कल अंतर्गत नया वाठोडा येथे शेतकऱ्यांनी सुरू केलेले आमरण उपोषण प्रशासनाच्या आश्वासनानंतर अखेर मागे घेण्यात आले. अमरावती किसान मोर्चाचे उपाध्यक्ष हरिदास लुंगे यांच्या मध्यस्थीमुळे हा तोडगा निघाला.

माहितीनुसार, काही वर्षांपूर्वी नया वाठोडा–पुसला पांदण रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. त्यावेळी शेतातील पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत राहण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी सिमेंट पाईप (पायल्या) टाकण्याचे आश्वासन संबंधित अधिकारी व कंत्राटदारांनी दिले होते. मात्र, प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी न झाल्याने अनेक शेतकऱ्यांना शेतात जाणे तसेच शेतातील पाण्याचा निचरा होणे कठीण झाले.

शेतकरी विश्वेश्वर वानखडे यांनी सांगितले की, त्यांच्या शेतातील पाणी पिढ्यानपिढ्या नैसर्गिक उताराने रस्त्याखालून वाहत होते. मात्र, पाण्याचा मार्ग बंद झाल्याने शेतात पाणी साचून पिकांचे नुकसान होऊ लागले.



शेतकऱ्याचा हिताचा विचार करावा- हरिदास लुंगे

याबाबत २०२१ मध्ये संबंधित विभागाने त्या ठिकाणी सिमेंट पाईप टाकून पाण्याचा निचरा पूर्ववत केला होता.

यानंतर २०२४ मध्ये शेतकरी संजय कोल्हे यांनी पाण्याचा मार्ग बंद करून पांदण रस्ता व पाटबंधारे विभागाच्या हद्दीतील मातीचा भराव आपल्या शेतात टाकल्याचा आरोप करण्यात आला.या निर्णयामुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त करत पुरुषोत्तम काकडे, जयकुमार आमझरे आणि रामकृष्ण आमझरे यांनी ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता आमरण उपोषण सुरू केले. उपोषणस्थळी नायब तहसीलदार, पोलीस प्रशासन तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन चर्चा केली.

किसान मोर्चाचे उपाध्यक्ष हरिदास लुंगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मध्यस्थीने चर्चा यशस्वी झाली.नायब तहसीलदार वानखडे, पाटबंधारे विभागाचे आडे, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोर्शीचे बोडखे यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर पोलिस पाटील प्रेमराज वानखडे यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांनी निंबू सरबत स्वीकारून उपोषण मागे घेतले.यावेळी जैस्वाल, जावरकर, धोटे यांच्यासह गावातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीडीएमसी येथे महिलांकरिता 'मेमोग्राफी तपासणी' शिबीर

**अमरावती -** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथे २० जुलै पर्यत महिलांकरिता विशेष मेमोग्राफी तपासणी शिबीर रेडीओलॉजी विभागांतर्गत आयोजित करण्यात आले आहे. याद्वारे महिलांमध्ये उद्भवणारे स्तनाचे कँसर व त्याचे निदान व उपचारासंबंधित मोफत सल्ला दिला जाईल, तसेच महिलांची मेमोग्राफी तपासणी व ओ.पी.डी. नोंदणी मोफत राहील. निःशुल्क सेवा योजनेंतर्गत ओपीडीसाठी सीबीसी, युरीन रुटीन मायक्रोस्कोपी,ब्लड शुगर रँडम, एचआयव्ही या चाचण्या मोफत करण्यात येतील.

तरी या संधीचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख तसेच महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे, विभागप्रमुख डॉ. संध्या कोठारी यांनी केले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अमरावती ता. अंजनगाव सुर्जी मौजे. मुऱ्हा बु येथील भू-मापन गट क्र १२३ याचे एकूण क्षेत्र ०४ हे. ५३ आर यापैकी लिहून देणार १) सुनंदा रविंद्र पांडे यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हे. ५१ आर, २) दिपा विनोद पांडे यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हे. ५१ आर, ३) ज्योत्सना अरुण पांडे यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हे. ५१ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशीलांना सदर मिळकत भाडेपट्टा /योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारीत करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

**अमरावती**
**दिनांक. १२/०७/२०२६**

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला, शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर संपर्क क. ०२३१-२६६८८४७


# निकृष्ट सोयाबीन बियाणांचा फटका

### सावळापूर पूर्णा परिसरातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट, उगवण न झाल्याने वाढला आर्थिक बोजा; पंचनामे, नुकसानभरपाई व दोषींवर कठोर कारवाईची मागणी





**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

अचलपूर तालुक्यातील सावळापूर पूर्णा परिसरात निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांचा फटका बसल्याने अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. समाधानकारक पाऊस होऊनही अनेक शेतांमध्ये बियाणांची उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

मौजा सावळापूर, पूर्णा, खानापूर, टोंगलाबाद आणि बाजीतपूर येथील शेतकऱ्यांनी विविध कंपन्यांचे प्रमाणित सोयाबीन बियाणे पेरले होते. मात्र अनेक ठिकाणी उगवण अत्यल्प राहिल्याने पुन्हा पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे बियाणे, मशागत, मजुरी व इतर शेती खर्चात मोठी वाढ झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

परिसरातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे लेखी तक्रारी दाखल करून तातडीने शेतांची पाहणी व पंचनामे करण्याची मागणी केली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्याबरोबरच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बियाण्यांच्या गुणवत्तेची काटेकोर तपासणी करावी, अशी एकमुखी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे.

> 'शेतात इनोव्हेज कंपनीच्या १०८ जातीच्या सोयाबीनची पेरणी केली. काही दिवसांनी शेताची पाहणी केली असता बियाणे उगवण्याऐवजी पूर्णपणे कुजलेले दिसले.याबाबत कंपनीच्या प्रतिनिधीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला,मात्र प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे कृषी विभाग, अचलपूर येथे लेखी तक्रार करून संबंधित बियाणे कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.'
>
> **बाळू नांदणे शेतकरी**
>
> 'सोयाबीनच्या पाच बॅग खरेदी करून पेरणी केली. मात्र समाधानकारक पाऊस होऊनही बियाण्यांची उगवण झाली नाही. त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याप्रकरणी कृषी विभागाकडे तक्रार दाखल केली असून शासनाने सखोल चौकशी करून नुकसानभरपाई देत दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा आहे.'
>
> **मिलिंद गोदे** शेतकरी

अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून ८४.२३ कोटींचा निधी मंजूर

# अमरावती विभागातील २८ हजार ७५१ शेतकऱ्यांना ६८ कोटींची मदत

## राज्यातील सहा महसूली विभागांतील ४५ हजार शेतकऱ्यांना मिळणार मदत

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात एप्रिल आणि मे २०२६ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महसूल व वन विभागाने या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी ८४ कोटी २३ लक्ष ६५ हजार रुपयांच्या निधी वितरणास अधिकृत मंजुरी दिली आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील सहा विभागांतील



एकूण ४५ हजार ४२ शेतकऱ्यांना होणार असून, ३८ हजार हेक्टरपेक्षा जास्त बाधित क्षेत्राला यातून दिलासा मिळणार आहे. राज्य शासनाने नुकताच (ता.१० जुलै) यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केला आहे.

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरुपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देण्यात येते. राज्यात एप्रिल व मे महिन्यात विविध जिल्ह्यांत अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे मोठ्या ☞(पान २ वर)

# अमरावतीच्या अतिरिक्त एमआयडीसीतील २६०० हेक्टर जागा औद्योगिक घटकांसाठी अधिग्रहित होणे गरजेचे - आ. संजय खोडके

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यात १,३४,१८८ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक करण्यात येत असून संपूर्ण देशातील एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी ३२ टक्का सहभाग दर्शवून महाराष्ट्राने देशांत अव्वल स्थान कायम राखले आहे. राज्यात औद्योगिक क्षेत्रात भरमसाठ गुंतवणूक होत असतांना अमरावती विभागातील भागात मात्र प्रचंड प्रमाणात औद्योगिक मागासलेपण दिसून येत आहे. अमरावती विभागाचे दरडोई उत्पन्न हे राज्याच्या तुलनेत नगण्य असल्याने या भागातील औद्योगिकरणाच्या पुनरुज्जीवनासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम अशा सर्व उद्योग घटकांना प्रोत्साहन व चालना देण्याची नितांत गरज आहे.

### टेक्सटाईल पार्कमधील भूखंडांचे दर प्रति चौरस मीटर ५९० रुपयांपर्यंत कमी करण्याच्या सवलतीस एक वर्षांची मुदतवाढ-मंत्री. ना. उदय सामंत

राज्याच्या संतुलित औद्योगिक विकासाच्या दृष्टीने अमरावती विभागात विविध औद्योगिक घटकांवर गुंतवणूक वाढीसाठी महाराष्ट्र शासनाने ठोस पाऊल उचलून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. असे रोखठोक मत आ. संजय खोडके यांनी पावसाळी अधिवेशनातून मांडले आहे.

**टेक्स्टाईल पार्क मधले भूखंडाचे दर कमी करण्याची मागणी :-** विधानपरिषदेत अमरावती विभागातील औद्योगिक मागासलेपणाच्या मुद्द्यावर बोलतांना आमदार संजय खोडके यांनी सांगितले ,अमरावती येथे अतिरिक्त अमरावती औद्योगिक



क्षेत्रालगत पि.एम. मित्रा टेक्सटाईल पार्क विकसित करण्यात आले आहे. या पार्क करीता महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळातर्फे एकूण ४१०.०२ हेक्टर जमीन अधिग्रहित केली आहे. मात्र येथील जमिनीचे भाव अधिक असल्याने गुंतवणूकदारांमध्ये साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळे येथील भूखंडांचे दर प्रति चौरस मीटर १,२२१ रुपयांवरून ५९० रुपयांपर्यंत कमी करण्यासाठी जी ३० जून पर्यंत सवलत दिली होती, त्यास मुदतवाढ देण्याची मागणी आ.संजय खोडके यांनी केली. हि मागणी मान्य करून उद्योग मंत्री ना. उदय सामंत यांनी या सवलतीस एका वर्षाची मुदतवाढ देण्याची घोषणा अधिवेशनातून केली. अमरावती भागात औद्योगिक विकास क्षेत्र म्हणून ३००० हेक्टर☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी येथील 'त्या' ३४ एकर शासकीय जमिनीचा प्रश्न सुटणार

## -१४ जुलैला मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक! कृषी मंत्र्यांच्या दालनात होणार अंतिम निर्णय

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी शहराच्या मुख्य आणि मोक्याच्या ठिकाणी असलेल्या तालुका बीज गुणन केंद्राच्या ३४ एकर शेत जमिनीचा प्रश्न आता मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरवर्षी तोट्यात चालणाऱ्या आणि केवळ 'पांढरा हत्ती' ठरलेल्या या जमिनीपैकी ७ एकर जमीन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हस्तांतरित करण्याबाबत आगामी १४ जुलै २०२६ (मंगळवार) रोजी



मुंबईतील मंत्रालयात एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. अंजनगाव सुर्जी शहराच्या मध्यवर्ती भागात सर्व्हे क्र. ५ मध्ये तालुका बीज गुणन केंद्राची ३४ एकर शासकीय जमीन आहे. मात्र, योग्य व्यवस्थापनाअभावी या जमिनीतून शासनाला दरवर्षी केवळ तोटा सहन करावा लागत आहे. ही मोक्याची जागा शहराच्या विविध विकासकामांसाठी मिळावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधींकडून केली जात होती. ☞(पान २ वर)

# भूमिपूजन आज, फलक मार्च महिन्याचे

## दर्यापूर नगर परिषदचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर नगर परिषदेने मार्च महिन्यात करायचे भूमिपूजन आज (दि.११) रोजी करुन आपला भोंगळ कारभार चव्हाट्यावर आणून कार्यक्षमता सिद्ध केली आहे. दर्यापूर नगर पालिका क्षेत्रातील प्रभाग क्रं ७ मधिल पाटील पूरा येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे

### खासदारांना डावलले -

जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे यांचे फलकावर जरी नाव असले तरी त्यांना आजच्या भूमिपूजन कार्यक्रमाला बोलाविण्यात आले नसल्याची माहिती समोर आली. जिल्ह्याच्या प्रथम नागरिक असलेले खासदार यांना का कार्यक्रमातून कुणाच्या सांगण्यावरुन डावलले.



नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत सिमेंट रस्ता बांधकामाच्या भूमिपूजनाचा ☞(पान २ वर)

परतवाडा व्हिडिओकांड प्रकरणातील

# चार आरोपींना जामीन

## अयानच्या याचिकेवर १४ ला निर्णय



**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील बहुचर्चित व्हिडिओ कांड अयान प्रकरणात अटक करण्यात आलेल्या ८ आरोपीं पैकी ४ आरोपींना अचलपूर जिल्हा व सत्र न्यायाधीश खरवडे यांनी शुक्रवारी जामीन मंजूर केला आहे.न्यायालयाने आरोपींना प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक मुचलक्यावर जामिनावर सोडण्याचे आदेश दिले. अहफाज खान मसूर खान,शेख नावेद शेख हसन,तबरेज☞(पान २ वर)

# अचलपूर शहरातून नागरिकांचे होत आहे मोठ्या प्रमाणात स्थलांतरण

## -मूलभूत सुविधांचा अभाव,संवेदनशील शहर म्हणून ओळख प्रमुख कारण

**अचलपूर/प्रतिनिधीः-** ऐतिहासिक शहर म्हणून संपूर्ण विदर्भात नव्हे तर राज्यात अचलपूर शहराला ओळखले जाते पण हे ऐतिहासिक शहर विविध मूलभूत सुविधांपासून आजही वंचित आहे .अरुंद रस्ते, मूलभूत सुविधांचा अभाव आणि संपूर्ण राज्यात अचलपूर शहराला असलेली अति संवेदनशील शहर म्हणून असलेली ओळख याचा फटका म्हणून आता व्यापारी, शासकीय कर्मचारी आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या प्रमाणात अचलपूर शहरातून स्थलांतरण करीत आहे. जुळवा शहर म्हणून परिचित असलेल्या परतवाडा शहरासह ग्रामीण भागात नवनवीन लेआउट मधील प्लॉटमध्ये नवीन घर मोठ्या प्रमाणात बनले आहे आणि बनत आहे .यामुळे अचलपूर शहरात आता अनेक मोठ मोठे घर फक्त शोभेची वस्तू बनलेली आहे. अचलपूर शहरात नागरिकांना आता नवीन घर बांधणी का झाले नको ? याचा शोध सुद्धा स्थानिक प्रशासनाने ,स्थानिक जनप्रतिनिधींनी घेण्याची वेळ आली आहे . परतवाडा शहराचा आजूबाजूला असलेल्या ग्रामपंचायतीमधील लेआउट मधील प्लॉट खरेदीला मोठ्या प्रमाणात अचलपूर शहरातील नागरिकांची मागणी वाढलेली आहे . अचलपूर शहरातून नागरिकांचे स्थलांतरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने अचलपूर शहरातील अनेक भागातील मोठ-मोठे घर नागरिकाअभावी ओस पडलेले दिसत आहे .

अमरावती जिल्ह्यातील अ वर्ग दर्जा ☞(पान २ वर)

■ अचलपूर शहराच्या रेंगाळलेल्या विकासाला चालना देण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहे. देवडी व चावलमंडी रस्त्याचे रुंदीकरण व्हावे आणि अचलपूर शहराचा कायापालट व्हावा यासाठी नागरिकांनी अचलपूर नगर परिषद प्रशासनाला सहकार्य करणे अपेक्षित आहे .

**-अभय माथने,** स्वीकृत नगरसेवक,अचलपूर नगर परिषद.

■ अचलपूर शहर अतिक्रमणाच्या विळख्यात असल्याने वाहतुकीचे साधन येथे उपलब्ध नाही . ग्रामीण परिसरातील नागरिकांची अचलपूर शहरातील अरुंद रस्ते , बस फेरी नसल्याने ये - जा बंद झालेली आहे .याचा परिणाम व्यापारी , दुकानदार यांच्या वर झाला असून नागरिकांचा कल परतवाडा शहराकडे वाढला आहे . ग्रामीण भागातील नागरिकांचा कल ही नवीन घर बांधण्यासाठी परतवाडा शहराकडे असल्याने परतवाडा शहराची भरभराटी मोठ्या प्रमाणात होत असून अचलपूर शहर मात्र आजही विकासाच्या प्रतिक्षेत आहे .

**-हरीश पुरोहित,** माजी मुख्याध्यापक, अचलपूर .

## टाकरखेडा संभू परिसरातील पेरणीला दमदार सुरुवात



संतोषजनक पावसानंतर टाकरखेडा संभू परिसरातील शिवारात खरीप हंगामाच्या पेरणीच्या कामांना वेग आला आहे. ट्रॅक्टर तसेच बैलजोडीच्या सहाय्याने शेतकरी सोयाबीन, तूर, कपाशी व उडीद पिकांची पेरणी उत्साहात करत आहेत. चांगल्या पावसाच्या आशेने शेतकऱ्यांमध्ये नव्या हंगामाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. - **छाया ः (संतोष शेंडे) टाकरखेडा शंभू**

अयोध्या राम मंदिरातील कथित दान अपहार व जमिनी गैरव्यवहार प्रकरणः

# डॉ.सुनील देशमुख यांचे नेतृत्वात युवक काँग्रेसचा 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रभू श्रीरामांच्या चरणी भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या देणग्यांच्या कथित अपहाराच्या निषेधार्थ माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वात युवक काँग्रेस अमरावती शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीने 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह आरंभलेला असून कठोरा रोडवरील सौरभ कॉलनी परिसरातील श्रीराम मंदिर येथे भव्य स्वरूपात हे प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले.यावेळी उपस्थितांनी प्रभू श्रीरामांची आरती करून भाविकांच्या श्रद्धेच्या अपमानाचा निषेध व्यक्त केला. प्रभू श्रीरामाच्या मंदिरातील दानपात्रांमधील




देणग्यांचा कथित गैरव्यवहार, सखोल, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.☞(पान २ वर)

# आ. प्रताप अडसड यांनी स्वीकारला भाजपा जिल्हाध्यक्ष पदाचा पदभार

### -ढोल तासाच्या गजरात स्वागत, जिल्ह्यातील भाजप नेत्यांची उपस्थिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा ग्रामीण भाजपा जिल्हाध्यक्ष पदाचा पदभार आज शनिवारी आ. प्रताप अडसड यांनी स्वीकारला.स्थानिक राजापेठ येथील भाजपा जिल्हा कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी खा.अनिल बोंडे, तर प्रमुख अतिथी आ. राजेश वानखेडे, आ. चंदू यावलकर, जिल्हा प्रभारी अविनाश देव, महापौर श्रीचंद तेजवानी, विदर्भ संयोजक दिनेश सूर्यवंशी, माजी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, प्रशांत देशपांडे, निवेदिता चौधरी अमरावती भाजपा शहराध्यक्ष नितीन धांडे, मीना पाठक यांची उपस्थिती होती. विदर्भात त्या काळात भाजपाचे जेष्ठ नेते अरुण अडसड यांनी पक्ष उभा केला. त्यांच्यामुळे आज वैभवाचे दिवस पाहायला



मिळत आहे. भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी आ. प्रताप अडसड यांच्या वर भाजपा जिल्हाध्यक्ष पदाची जी जबाबदारी टाकली ते समर्थपणे पार पाडणार असल्याचे मत खा डॉ अनिल बोंडे यांनी व्यक्त केले.

आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती आपल्याला काबीज करायच्या आहे त्यासाठी आ प्रताप अडसड यांचे नेतृत्व मोठे ठरणार असल्याचे माजी भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख म्हणाले. यावेळी ☞(पान २ वर)

# तिवसा नगरपंचायतमध्ये भव्य इनडोअर स्टेडियम; ४ कोटींचा निधी मंजूर

## आ.राजेश वानखडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा नगरपंचायत अंतर्गत वार्ड क्रमांक १६ येथे अत्याधुनिक भव्य इनडोअर स्टेडियम बांधण्यासाठी नगर विकास विभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनांतर्गत ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याचा शासन निर्णय देखील निर्गमित झाला असून, आमदार राजेश वानखडे यांच्या पुढाकारातून हे महत्त्वाचे क्रीडा प्रकल्प साकारणार आहे.आमदार राजेश वानखडे यांनी खेळाडू व नागरिकांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्न केले. यापूर्वी तिवसा



येथे आमदार राजेश वानखेडे यांचे पुढाकाराने गेल्या सलग तीन वर्षांमध्ये राज्यस्तरीय महिला-पुरुष कबड्डी स्पर्धा व गेल्या वर्षी अखिल भारतीय स्तरावरील महिला-पुरुष कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांदरम्यान कबड्डी व इतर इनडोअर खेळांसाठी योग्य स्टेडियमची गरज असल्याचे त्यांचे आवर्जून निदर्शनास आले. त्यानुसार त्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश मिळाले असून, ४ कोटी☞(पान २ वर)

# फुलसावंगी येथे खुलेआम मटकाचा सुळसुळाट

## पोलीस प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष?

**फुलसावंगी/प्रतिनिधी:-** महागाव तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फुलसावंगी येथे सध्या अवैध मटका व्यवसायाने चांगलाच उच्छाद मांडला आहे. गावात तब्बल २५ ते ३० मटका काउंटर खुलेआम सुरू असून, यामुळे तरुण पिढी आणि कष्टकरी वर्ग उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. धक्कादायक बाब म्हणजे स्थानिक पोलीस प्रशासनाच्या नाकाखाली हे अवैध धंदे राजरोसपणे सुरू असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.पोलीस चौकीच्या छायेतच अवैध धंदे सुरू असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. विशेष म्हणजे फुलसावंगी येथील पोलीस चौकीच्या अंतर्गत येणाऱ्या परिसरातच हे मटक्याचे काउंटर बिनदिक्कतपणे चालवले जात आहेत. ☞(पान २ वर)

# तहसील कार्यालयाच्या आवारातील रेतीचे ट्रक-ट्रॅक्टर हटविण्याची मागणी

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे येथील तहसील कार्यालय व न्यायालयाच्या आवारात गेल्या अनेक महिन्यांपासून जप्त रेतीचे ट्रक व ट्रॅक्टर उभे असल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या वाहनांमुळे तहसील कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना वाहने पार्क करण्यासाठी जागा उपलब्ध होत



नसून संपूर्ण परिसरही अस्वच्छ व विद्रूप दिसत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयाच्या आवारातील सर्व रेतीचे ट्रक व ट्रॅक्टर तातडीने हटवून परिसर स्वच्छ व मोकळा करण्यात ☞(पान २ वर)

सारांश
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
रविवार, १२ जुलै २०२६ E-paper - www.janmadhyam.com

# 'डिजिटल जोडीदारा'चा घातक ट्रेंड

तरुण पिढीमध्ये डिजिटल पार्टनर बनविण्याची क्रेझ झपाट्याने वाढत आहे. मोबाईल स्क्रीनवरील एक अदृश्य किंवा त्रिमितीय (थ्रीडी) पात्र आपल्याशी हुबेहूब एका खऱ्याखुऱ्या माणसासारखे बोलते, आपल्या भावना समजून घेते आणि आपल्याला मानसिक आधार देते, ही कल्पना काही वर्षांपूर्वी केवळ विज्ञानपटांपुरती मर्यादित वाटत होती. मात्र, आज ती वास्तव बनली आहे. रेप्लिका, कॅरेटर एआय यांसारख्या अनेक 'एआय कम्पॅनियनशिप' ऑप्सच्या माध्यमातून कोटय़वधी युवक-युवती अशा प्रकारच्या डिजिटल नात्यांमध्ये गुंतले आहेत.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'आर्टिफिशल इंटेलिजन्स' (एआय) आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहे. सुरुवातीला केवळ गणितीय आकडेमोड, व्यावसायिक कामे आणि गुंतागुंतीच्या प्रक्रिया सुलभ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाने आता मानवाच्या अतिशय खासगी आणि संवेदनशील क्षेत्रात म्हणजेच 'भावनांच्या विश्वात' प्रवेश केला आहे. सध्या जगभरात आणि वेगाने भारतातही पसरणारा 'डिजिटल बॉयफ्रेंड आणि डिजिटल गर्लफ्रेंड' हा ट्रेंड याचेच एक ठळक उदाहरण आहे. हे फॅड मानवी नातेसंबंधांच्या पारंपरिक चौकटीला दिलेले एक मोठे आव्हान आहे.

या नव्या प्रवाहाचा सखोल अभ्यास केला असता असे दिसून येते की, तरुण पिढीमध्ये आभासी भागीदार (डिजिटल पार्टनर) बनविण्याची क्रेझ झपाटय़ाने वाढत आहे. मोबाईल स्क्रीनवरील एक अदृश्य किंवा त्रिमितीय (थ्रीडी) पात्र आपल्याशी हुबेहूब एका ख-याखु-या माणसासारखे बोलते, आपल्या भावना समजून घेते आणि आपल्याला मानसिक आधार देते, ही कल्पना काही वर्षांपूर्वी केवळ विज्ञानपटांपुरती मर्यादित वाटत होती. मात्र, आज ती वास्तव बनली आहे. रेप्लिका, कॅरेटर एआय यांसारख्या अनेक 'एआय कम्पॅनियनशिप' ॲप्सच्या माध्यमातून कोटय़वधी युवक-युवती अशा प्रकारच्या डिजिटल नात्यांमध्ये गुंतले आहेत.

या डिजिटल क्रांतीच्या आकडेवारीवर नजर टाकली तर परिस्थितीची भीषणता आणि व्याप्ती अधिक स्पष्ट होते. 'एआय कम्पॅनियनशिप' अ?प्सच्या जागतिक आकडेवारीनुसार, सध्या जगात सुमारे पाच ते सहा कोटी डिजिटल जोडीदार (जीएफ-बीएफ) सक्रिय रूपात अस्तित्वात आहेत. जगभरात दहा कोटींहून अधिक लोक या चॅटबॉटस्च्या माध्यमातून कोणत्या ना कोणत्या भावनिक नात्याने जोडले गेले आहेत. एका सर्वेक्षणानुसार, जगातील जवळपास २१ टक्के प्रौढ व्यक्तींनी एआय कम्पॅयिनशिपचा वापर केला आहे, तर तब्बल ७२ टक्के किशोरवयीन मुलांनी आयुष्यात किमान एकदा तरी अशा एआय बॉट्सशी संवाद साधला आहे. यावरून स्पष्ट होते की, हा ट्रेंड आता केवळ काही विशिष्ट वर्गापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो एक सार्वत्रिक सामाजिक प्रवाह बनत चालला आहे.

वर्ष २०२३-२४ मधील आकडेवारीनुसार, भारतात एआय कम्पॅनियनशिप नात्याची मागणी आणि एआय अ?प्स डाऊनलोड करण्याचा वेग तब्बल १४०० टक्क्यांनी वाढला आहे. हा वेग जगातील इतर अनेक देशांच्या तुलनेत प्रचंड आहे. जरी हा ट्रेंड भारतात अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात असला तरी इंटरनेटचा वाढता प्रसार आणि एआय तंत्रज्ञानाचा होणारा विकास पाहता आगामी काळात हा वेग अधिकच तीव्र होणार यात शंका नाही.

असा कोणता घटक आहे जो माणसाला एका जिवंत व्यक्तीला सोडून मोबाईलमधील एआय पात्राच्या प्रेमात पडायला भाग पाडत आहे- हा आजचा सर्वात मोठा प्रश्न आहे. याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे आधुनिक जीवनशैलीत वाढलेला कमालीचा 'एकाकीपणा'. शहरीकरण, वेगवान जीवन, कामाचा प्रचंड ताण, स्पर्धा आणि विखुरलेली कुटुंब व्यवस्था यांमुळे आजचा तरुण कमालीचा एकटा पडला आहे.

त्याचे सामाजिक नेटवर्क तुटत चालले आहे. अशा वेळी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी, सुख-दुःख शेअर करण्यासाठी त्याला हक्काचा माणूस मिळत नाही. ही पोकळी भरून काढण्याचे काम एआय पार्टनर्स करत आहेत.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे एआय नाती ही संपूर्णपणे 'कंट्रोल' म्हणजेच नियंत्रणात असतात. ख-याखु-या मानवी नात्यांमध्ये मतभेद, भांडणे, तडजोड आणि जबाबदा-या असतात. समोरच्या व्यक्तीच्या आवडीनिवडी जपताना स्वतःच्या स्वातंत्र्यावर गदा येते, अशी भावना आजच्या पिढीत निर्माण होत आहे. याउलट एआय जोडीदार कधीही भांडत नाही, तो नेहमी तुमच्या 'हो'मध्ये 'हो' मिळवतो, तुम्हाला हवं तेव्हाच तो उपलब्ध असतो आणि नको असल्यास आपण त्याला एका क्लिकवर बंद करू शकतो. या संपूर्ण नियंत्रणामुळे तरुणांना मानवी नात्यांपेक्षा एआय नाती अधिक सोयीची आणि सुरक्षित वाटू लागली आहेत. तसेच एआय आता इतके प्रगत झाले आहे की, ते माणसाला विचार आणि समजूतदारपणाचा हुबेहूब आभास निर्माण करून देते.त्यामुळे लोकांना ते खरेच वाटते.

हा वाढता ट्रेंड वरकरणी जरी रंजक आणि आधुनिक वाटत असला तरी त्याचे दूरगामी सामाजिक परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. समाजशास्त्रज्ञांच्या मते, जर हा ट्रेंड असाच अनियंत्रितपणे वाढत राहिला तर भविष्यात ख-याखु-या मानवी नात्यांमधील अंतर कमालीचे वाढेल.

माणसांची जागा मशीन घेईल. जेव्हा लोकांना कोणत्याही जबाबदारीशिवाय, केवळ स्वतःच्या अटींवर डिजिटल जोडीदार मिळू लागेल. तेव्हा ते लग्न, कुटुंब आणि समाज या पारंपरिक संस्थांपासून दूर पळू लागतील. त्यामुळे लग्न आणि कुटुंबाची व्यवस्था कमकुवत होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

याला 'कस्टम पार्टनर'ची संस्कृती म्हटले जाऊ शकते. यामध्ये माणूस स्वतःच्या कल्पनेनुसार आणि सोयीनुसार जोडीदार तयार करतो. त्यामुळे ख-या मानवी जगात वावरताना समोरच्या व्यक्तीमधील उणिवा स्वीकारण्याची माणसाची क्षमता संपून जाईल. परिणामी, भविष्यात समाजात एकटे राहणा-या लोकांची संख्या प्रचंड वाढू शकते. काही तज्ज्ञांच्या मते, पुढील दोन ते तीन दशकांत समाजात लग्न न करता किंवा एकटे राहणा-या लोकांचे प्रमाण खूप जास्त असेल, ज्यामुळे सामाजिक विघटनाची समस्या गंभीर रूप धारण करू शकते. हा ट्रेंड मानव समाजासमोर एक मोठे आव्हान म्हणून उभा ठाकला आहे.

डिजिटल जोडीदाराच्या या आभासी दुनियेचा सर्वात मोठा फटका तरुणांच्या मानसिक आरोग्याला बसत आहे. सुरुवातीला एकाकीपणा दूर करण्यासाठी सुरू झालेला हा प्रवास हळूहळू एका गंभीर व्यसनात रूपांतरित होतो. ज्याप्रमाणे लोकांना सोशल मीडियाचे व्यसन लागते, हे व्यसन त्याहूनही एक पाऊल पुढचे आहे. कारण इथे थेट भावनिक गुंतवणूक असते. दिवसातील दोन ते तीन तास किंवा त्याहून अधिक काळ एआयच्या संपर्कात राहिल्याने तरुणांना त्या आभासी पात्राची सवय होते आणि ते ख-या जगापासून पूर्णपणे तुटतात.

जेव्हा एखादी व्यक्ती एआयच्या अशा नियंत्रित आणि नेहमी कौतुक करणा-या वातावरणात राहते, तेव्हा तिला ख-या जगातील आव्हानांचा सामना करणे कठीण जाते. वास्तविक जीवनात जेव्हा अपेक्षाभंग होतो, तेव्हा हे तरुण तीव्र नैराश्य, हताशपणा आणि चिंतेचे शिकार होतात.

> राज्यातील अनेक शहरांमध्ये कचऱ्याचा प्रश्न उग्र बनला आहेच; पण आता तो थेट प्राणघातक ठरू शकतो, याचा अनुभव पुणे जिल्ह्यातील मोशी कचरा डेपोमध्ये झालेल्या दुर्घटनेतून आला. येथे साठलेल्या कचऱ्याचा पहाड प्रकल्पाच्या आवारातील इमारतीवर कोसळला आणि त्या ओझ्याने तीन मजली इमारतही कोसळल्याची घटना थरकाप उडवणारी आहे.



# जीव झाले कचरामोल!

इमारतीमधील ११ जण ढिगाऱ्याखाली अडकले; त्यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून, मृतांची संख्या वाढू शकते. केवळ 'अपघात' किंवा मुसळधार पावसामुळे 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून हा प्रकार सोडून देता येणार नाही, तर साऱ्या नागरी नियोजनातील त्रुटी व गैरव्यवस्थापन या दुर्घटनेला जबाबदार आहेत. सुमारे तीस वर्षांपूर्वी ८१ एकरांवर सुरू करण्यात आलेल्या या कचरा डेपोमध्ये शंभर-दोनशे फुटांचे कचऱ्याचे डोंगर उभे राहिले आहेत. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी 'बायो मायनिंग' किंवा कचऱ्यापासून वीजनिर्मितीसारखे पर्याय समोर येत असले, तरी पिंपरी-चिंचवड शहरातील रोजच्या दीड हजार टनाच्या कचऱ्याच्या तुलनेत ते अत्यल्पच आहेत.

याच वीजनिर्मिती कंत्राटदार कंपनीला कचरा डेपोच्या आवारात आणि या डोंगरांशेजारीच प्रशासकीय इमारत बांधण्यास परवानगी कशी मिळाली, कचऱ्यातील घटकांच्या रासायनिक परिणामांनी जमीन खचण्यासारख्या धोक्यांचा विचार झाला होता का, प्रकल्पस्थळी कामगारांच्या सुरक्षिततेची साधने होती का आणि नियमांचे उल्लंघन झाले असल्यास संबंधित कंत्राटदारांना कोणाचे आशीर्वाद होते, अशा प्रश्नांची उत्तरे महापालिका प्रशासनाला द्यावीच लागतील. त्यामुळेच या घटनेची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे. पूर्वी शहराबाहेर असलेल्या या कचरा डेपोच्या परिसरात आता मोठी लोकवस्ती झाली आहे. कचऱ्याचा दुर्गंध आणि त्यातून वाहणारे प्रदूषित पाणी यांमुळे परिसरातील नागरिकांना वर्षानुवर्षे अनारोग्याचे प्रश्न भेडसावत आहेत. पाण्यामुळे इंद्रायणी नदीही दूषित झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवाक्याबाहेरचा ठरू लागलेल्या या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी आता राज्य सरकारने गांभीर्याने लक्ष घालणे, ही काळाची गरज बनली आहे. नागरिकांनीही ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे जमा करणे आणि त्यातील अधिकाधिक कचरा जागेवरच जिरवणे, ही त्यातील महत्त्वाची पायरी असून, त्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे.

# भेसळखोरांना अद्दल घडवा

धडाकेबाज प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात सुरू केलेल्या कारवायांच्या धडाक्यामुळे दुधापासून पनीरपर्यंत आणि 'एनर्जी ड्रिंक'पासून सौंदर्य प्रसाधनांपर्यंत अनेक जिन्नसांमधील भेसळीचे प्रकार उघडकीस येत आहेत.

एखाद्या अधिकाऱ्याने पुढाकार घेतल्यावर महिन्या-दोन महिन्यांतच इतक्या मोठ्या प्रमाणात गैरप्रकार आढळून येत असतील, तर भेसळ करणाऱ्या माफियांच्या अधोविश्वाची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत, याची कल्पना यावी. विशेषत: पुण्यासह सात जिल्ह्यांमध्ये शाम्पू आणि अत्यंत घातक औद्योगिक रसायनांची दुधात भेसळ करणारी संघटित टोळी उघडकीस आली आहे.

कधी काळी शेतकऱ्यांना गाय-म्हैसपालनास प्रोत्साहन देऊन 'दुधाचा महापूर' आणल्यामुळे साऱ्या देशात अभिमानाने उंचावलेली महाराष्ट्राची मान या दूधभेसळीमुळे शरमेने खाली झुकली आहे. घराघरांतल्या लहानग्यांना भेसळयुक्त दुधातून एकप्रकारे विषच पाजणाऱ्या या हैवानांना शिक्षा करण्यासाठी कायद्यातील कलमेही अपुरी ठरावीत! इतकी वर्षे भेसळीची समांतर व्यवस्था चालवणाऱ्या या माफियांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे; त्याबरोबरच या कृत्यांना आशीर्वाद देणारे सरकारी बाबू आणि पांघरूण घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या बड्या धेंडांनाही जन्माची अद्दल घडायला हवी.

मुंढे यांची कार्यशैली आणि कायदे-नियमांबाबत तडजोड न करण्याच्या भूमिकेमुळे आजवरच्या २१ वर्षांच्या



प्रशासकीय सेवेत त्यांच्या २५ वेळा बदल्या झाल्या असल्या, तरी कायदेभंगाविरोधात कारवायांचा त्यांचा पवित्रा कायम आहे. दोन महिन्यांपूर्वी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी त्यांची नियुक्ती झाली, तेव्हापासून त्यांनी भेसळखोरांच्या विरोधात बडगा उगारला आहे. विविध अन्नपदार्थ, औषधे आणि सौंदर्य प्रसाधनांमधील भेसळीचे अनेक प्रकार उघडकीस येऊ लागले आहेत. विभागाच्या धडक कारवायांनंतर दुकाने-हॉटेलांमध्ये विकल्या जाणाऱ्या पनीरची तपासणीही बंधनकारक झाली आहे. अनेक तीर्थक्षेत्रांवर प्रसाद म्हणून विक्री होणाऱ्या पेढे व मिठाईतही भेसळ होत असल्याचे उघड झाले. मात्र, पुणे जिल्ह्यातील मंचरमधून सोलापूर, अहिल्यानगर, जालना, ठाणे, जळगाव आणि धाराशिव अशा सात जिल्ह्यांमध्ये प्राणघातक रसायनांची भेसळ करणारी टोळी, हा दुधात भेसळीचा राज्यातील आजवरचा उघडकीस आलेला सर्वांत मोठा गुन्हा ठरावा.

शाम्पू, डिटर्जंट, पाम तेल यांसह अनेक प्राणघातक औद्योगिक रसायने मिसळून फक्त भेसळ नव्हे; तर संपूर्ण बनावट दूधच ही टोळी तयार करीत असे. दूध संकलन केंद्रे आणि शीतकरण केंद्रांबरोबरच गावोगावच्या दूध उत्पादक शेतकऱ्यांशी संपर्क साधून हे साहित्य आणि भेसळीसाठी 'मार्गदर्शन' करून त्यांनाही या गुन्ह्यांसाठी प्रवृत्त करण्याचा या टोळीचा कावा, हे या घटनेतील सर्वांत समाजविघातक कृत्य मानले पाहिजे. काही ठिकाणी तर किराणा दुकानांमधूनही या भेसळसाहित्याची राजरोस विक्री होत असे. अशा विषाचे उत्पादन आणि वितरणाची इतकी संघटित साखळी उभी राहीपर्यंत एकाही यंत्रणेला याची कल्पना येऊ नये, ही संतापाची बाब आहे.

लाखो बालकांचे अन्न असलेले दूध सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्यासाठी सरकार आणि अनेक धुरिणांनी सहकाराच्या माध्यमातून कष्टाने उभ्या केलेल्या या क्षेत्रास काळिमा फासणाऱ्या आणि नागरिकांचे जीव

# 'अ' आंदोलनाचा...

तब्बल २० वर्षांपासून प्रलंबित असलेला नर्मदा पाणी वाटपाचा वाद अखेर सुटला आणि महाराष्ट्राला १० अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. चर्चा आणि समन्वयाने कितीही मोठे तिढे सुटू शकतात, याचे हे उत्तम उदाहरण. नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत नर्मदा प्रकल्पाशी संबंधित महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या संमतीने वादावर पडदा पडला.

महाराष्ट्राच्या हक्काचे १० टीएमसी पाणी दोन स्रोतांतून मिळणार आहे, यापैकी पाच टीएमसी पाणी प्रस्तावित नर्मदा-तापी वळण योजनेतून तर उर्वरित पाच टक्के गुजरातमधील उकाई धरण lमधून थेट उचलले जाणार आहे, मात्र यासाठी उकाई धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असायला हवे, अशी अट आहे. खरे तर नर्मदा प्रकल्प पूर्ण होऊन अन्य राज्यांनी पाण्याचा वापर सुरूही केला; पण महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र थेंबभर पाणीही आले नव्हते. आता या १० टीएमसी पाण्याचा फायदा उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे आणि जळगाव जिल्ह्यांतील दुर्गम आणि दुष्काळी भागाला होऊन पिण्याच्या आणि



शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. 'उकाई'मधून पाणी कसे उचलायचे याचा कृती आराखडा आता तयार होईल. महाराष्ट्राच्या वाट्याला टिपूसभर पाणी नाही आणि थकबाकी मात्र मोठी, अशी स्थिती होती.

सरदार सरोवर प्रकल्पामुळे अनेक आदिवासी गावे बुडाली. या विस्थापितांच्या पुनर्वसनाचा खर्च आणि प्रकल्पाच्या बांधकामाचा खर्च यावरून मोठी थकबाकी अडकली होती. मध्य प्रदेश आणि गुजरात महाराष्ट्राकडून पैशांची मागणी करत होते, तर हक्काच्या पाण्याचा तिढा सुटल्याशिवाय महाराष्ट्र पैसे देण्यास तयार नव्हते. मंगळवारच्या बैठकीत बहुतांशी थकबाकी माफ करण्यात आल्याने आता केवळ २७ कोटी रुपये देणे बाकी आहे.

पाणी गुजरातमधून आणण्याशिवाय पर्याय नव्हता. महाराष्ट्राने हे पाणी तापी खोऱ्यात वळवण्याचा प्रस्ताव ठेवला तेव्हा एका नदी खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यात पाणी वळवता येत नसल्याच्या नियमावर बोट ठेवून गुजरात आणि मध्य प्रदेशने त्याला मोडता घातला होता.

आता तिढा सुटला आहे. इतकी वर्षे गुजरातने महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी दडपून वापरले; दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर ते महाराष्ट्राच्या अंगणात आले आहे.



# चंद्र जन्मला तेव्हा...

सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी आपली जीवनदात्री पृथ्वी अस्तित्वात आली आणि चंद्रसुद्धा त्यानंतर थोडय़ाच काळात अस्तित्वात आला. सूर्यमालेतल्या इतर सर्व ग्रहांपेक्षा आपल्या ग्रहाच्या या नैसर्गिक उपग्रहाचं महत्त्व अधिक. कारण, आपला ग्रह हा आतापर्यंत आपल्याला ठाऊक असलेल्या विश्वातील एकमेव सजीवसृष्टी धारण करणारा ग्रह आहे. याचा अर्थ आपल्याच आकाशगंगेतल्या सुमारे २०० अब्ज ताऱ्यांपैकी कुठेच जीवसृष्टी असणारी ग्रहमाला आणि त्यातील एखादा प्रगत ग्रह नसेलच असा अजिबात नाही. परंतु विज्ञानाला प्रमाण लागतं. केवळ अनुमान चालत नाही. त्यामुळे सध्या तरी अवघ्या विश्वात प्रचंड सजीवसृष्टी असलेली आपली निळी पाणीदार पृथ्वी एकटीच आहे. तिच्या अशा जैविक यशामध्ये आपल्या चंद्राचंही मोलाचं स्थान आहे. म्हणूनच चंद्राच्या अनेक गुणवैशिष्टय़ांची माहिती आपण अनेक वर्षे जुलै या 'चांद्रमासा'त घेत असतो.

मागच्या लेखात म्हटल्याप्रमाणे आपल्या पंचांगातला चांद्रमास महत्त्वाचा असतोच; पण जुलै १९६९ मध्ये माणूस चंद्रावर पोचला आणि तो आपल्यासाठी खरा चांद्रपरिचयाचा महिना ठरला. तर मुद्दा चंद्राच्या जन्माचा. चंद्रजन्माच्या अनेक कथा आहेत. काही पौराणिक, तर काही वैज्ञानिक. आपल्याकडे चंद्राचा जन्म 'क्षीरोदार्णव सम्भवम्' म्हणजे क्षीरसागरातून झाला असं म्हटलं गेलं. पाश्चात्य जगातही अशीच चंद्राच्या 'पृथ्वीज' असल्याची संकल्पना होती. परंतु आधुनिक अभ्यासात ती मागे पडली आणि पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाने चंद्र 'पकडला' अशी एक विचारधारा पुढे आली. मग तीही मागे पडून थिया नावाचा मंगळाच्या आकाराचा एक ग्रह आपल्या सौरमालेत जन्माला आला होता. ज्यावेळी इतर ग्रह अस्तित्वात आले तेव्हाच हा थियाही अस्तित्वात आला असणार. म्हणजे साधारण साडेचार अब्ज वर्षांपूर्वीचाच काळ समजा.

या 'थिया'ची आणि पृथ्वीची प्रचंड टक्कर झाली. त्यात त्या 'थिया'चे आणि पृथ्वीचेही काही वस्तुमान बाहेर पडले. त्याच वस्तुमानाचा (द्रव्याचा) पुढे एक गठ्ठा होऊन चंद्र तयार झाला आणि पृथ्वीभोवती गरगरू लागला. पण त्याचे हे गरगरणे प्रचंड वेगवान आणि पृथ्वीच्या खूपच जवळच्या कक्षेमधून होत होते. सध्या चंद्र आपल्यापासून सरासरी ३ लाख ८४ हजार किलोमीटर अंतरावरून फिरतोय. त्याच्या लंबवर्तुळाकार कक्षेत तो पेरिजी म्हणजे 'उप'भू स्थानी असतो तेव्हा ते अंतर ३ लाख ५० हजार आणि ?पोजी किंवा 'अप'भू स्थानी असतो तेव्हा ते ४ लाख ६ हजार किलोमीटर एवढे (साधारणपणे) असते. प्रकाशवेगाच्या भाषेत सांगायचं तर, ते १.३ प्रकाशसेकंद एवढंच आहे. त्यामुळे चंद्रावरून परावर्तित होणारा सूर्यप्रकाश आपल्यापर्यंत यायला १.३ सेकंदच लागतात. सूर्यप्रकाश यायला सवा आठ प्रकाश मिनिटं लागतात.

जन्म झाल्यावर पृथ्वीपासून फक्त १४००० ते २२००० किलोमीटर अंतरावरून हा चंद्र फिरत होता. इतक्या जवळून फिरत असेल तर पृथ्वीवर आदळत का नव्हता? याचं

# ३ तास सलग पावसात भिजून पूर्ण केले शूटिंग!

तारिणी मालिकेत आता खऱ्या अर्थाने केदार-तारिणीच्या लव्हस्टोरीची सुरुवात झाली आहे. प्रपोजलनंतर केदार आणि तारिणीच्या नात्याने आता एका नव्या टप्प्यात प्रवेश केला आहे. आपल्या प्रेमाची कबुली देत केदारने तारिणीला मनापासून प्रपोज केल्यानंतर त्यांच्या नात्यातील गोडवा आणखी वाढला आहे. पहिली वटपौर्णिमा, एकमेकांसह घालवलेले सुंदर क्षण आणि आता त्यातच पहिल्या पावसाची रोमँटिक सरष्ठ या सगळ्यामुळे त्यांच्या प्रेमाला आणखी बहर आला आहे.

पावसाच्या सरींमध्ये एकमेकांबरोबर भिजत, नकळत हसत-खेळत आणि मनमोकळ्या गप्पा मारत केदार-तारिणी प्रेमाचे अविस्मरणीय क्षण अनुभवताना दिसणार आहेत. त्यांच्या या गोड क्षणांमुळे प्रेक्षकांनाही त्यांच्या प्रेमाच्या सुंदर प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

या खास सीनबद्दल बोलताना 'तारिणी' म्हणजेच शिवानी सोनार म्हणाली, 'माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच मी पावसात भिजत असा सीन शूट केला. त्यामुळे हा अनुभव माझ्यासाठी खूपच खास होता. खरं सांगायचं तर माझा वाढदिवसही पावसाळ्यातच असतो, त्यामुळे पावसाशी माझं एक वेगळंच नातं आहे. पण इतकं मनसोक्त पावसात भिजणं बऱ्याच दिवसांनी अनुभवायला मिळालं आणि तेही तारिणी-केदारच्या या सीनमुळे!'

'या सीनमध्ये आमच्याबरोबर काही लहान मुलंही होती. केदार आणि तारिणीच्या प्रेमाला नुकतीच सुरुवात झाली आहे आणि त्यांच्या नात्याला प्रेक्षकांकडून खूप छान प्रतिसाद मिळतोय. त्यामुळे असे रोमँटिक प्रसंग साकारताना आणखी मजा येते. जवळपास तीन तास सतत पावसात शूटिंग सुरू होतं. आम्ही कलाकार म्हणून तर खूप एन्जॉय केलं, पण आमचे तंत्रज्ञ, दिग्दर्शन टीम आणि इतर क्रू सदस्यांनी रेनकोट घालून खूप मेहनत घेतली. त्यांच्या मेहनतीमुळेच हा प्रसंग इतका सुंदर साकारता आला. शूटिंगदरम्यान रस्त्यावरचे लोकही आमचं शूटिंग पाहून आनंद घेत होते. आता प्रेक्षकांनाही हा एपिसोड तितकाच आवडेल, याची मला खात्री आहे.'



दरम्यान, तारिणी मालिकेत आता गुलाबचा मृत्यू होणार आहे. यावरून या सगळ्याचा मास्टरमाईंड दुसराच कोणीतरी आहे हे अगदीच स्पष्ट झालेलं आहे. त्यामुळे या खेळात गुलाब आणि युवराजपेक्षा एक मोठा व्हिलन आहेष्ठजो लवकरच प्रेक्षकांसमोर येईल.

# 'मामा-भाची' चे नाते!

९० या दशकातील लोकप्रिय मराठी अभिनेत्री व लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या पत्नी प्रिया बेर्डे या बालपणापासून अशोक सराफ यांना 'मामा' म्हणून हाक मारतात. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत प्रिया यांनी अशोक सराफ यांच्या कुटुंबाबरोबर असलेले घरचे संबंध आणि त्यांनी दिलेल्या कानमंत्राबाबत सांगितलं.



अशोक सराफ यांना सगळे तुझ्यामुळे 'मामा' म्हणून हाक मारतात हे खरंय का? यावर प्रिया बेर्डे अमोल परचुरेंना दिलेल्या मुलाखतीत म्हणाल्या, 'होष्ठकारण मामाने 'ययाती आणि देवयानी' नाटकाच्या वेळेला मला कडेवर घेऊन खेळवलंय. मी तेव्हा खूप लहान होते. मी त्याला लहानपणापासून मामा म्हणते आणि म्हणूनच लोकही त्याला मामा म्हणून हाक मारायला लागते असं मला वाटतं.'

'मी आजवर अशोक मामाबरोबर सगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या आहेत. त्याची मुलगी, प्रेयसी, बायको म्हणून मी काम केलंय. अशोक मामाबरोबर काम करणं म्हणजे खूप काही शिकण्यासारखं असतं. मी त्याला विचारलं होतं की, मला अभिनय करण्यासाठी काय करावं लागेल? मी जेव्हा नवीन होते तेव्हा मी हा प्रश्न विचारला होता. तेव्हा मला त्यानं सांगितलं होतं, प्रिया काय करायला पाहिजे याच्यापेक्षा, काय करू नये हे आधी तू शिक. म्हणजे ते तुला जास्त मदत करेल.

# इंडस्ट्रीमध्ये आधी शारीरिक सुखाची ...



फिल्म इंडस्ट्रीमध्ये करियर करण्याचं अनेकांचं स्वप्न असतं. मेहनतीच्या जोरावर अनेक जण हे शिखर गाठतातही. पण काहींच्या आयुष्यात अनेक अडथळे येतात त्यापैकी एक धक्कादायक म्हणजे अडथळा म्हणजे कास्टिंग काऊचचा. हिंदी सिनेविश्वातच नाही तर, अन्य सिनेविश्वात देखील अभिनेत्रींना कास्टिंग काऊचचा सामना करावा लागतो. या कारणास्तव उराशी मोठं होण्याचं स्वप्न बाळगून आलेल्या अनेक अभिनेत्री स्वतःची ओळख भक्कम करण्याआधीच इंडस्ट्रीला राम राम ठोकतात.

**अभिनेत्रीचं कास्टिंग काऊचवर मोठं वक्तव्य**

पण आता कास्टिंग काऊचची व्याख्या बदलली आहे असं एका प्रसिद्ध अभिनेत्रीने सांगितलं आहे, पण नुकताच झालेल्या एका मुलाखतीत प्रसिद्ध अभिनेत्रीने धक्कादायक खुलासा केला आहे. भोजपुरी अभिनेत्री अंजना सिंह या अभिनेत्रीने एका मुलाखतीत कास्टिंग काऊचवर बेधडकपणे मोठं वक्तव्य केलं आहे, नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत अंजना हिने कास्टिंग काऊचच्या बदललेल्या विचारांबद्दल सांगितलं आहे.

**आधी शारीरिक संबंधांची मागणी, आता...**

अंजना म्हणाली आधी भूमिकांच्या बदल्यात अभिनेत्रींकडून शारीरिक संबंधांची मागणी केली जायची, पण आता काळ बदललेला आहे. मला असं वाटतं आता कास्टिंग काऊचला बाजूला ठेवा, आता ते कास्टिंग काऊच राहिलेलं नाही. आता ते असं झालं आहे की, 'मी तुझ्यावर प्रेम करतो. याचा अर्थ असा होतो की, जोपर्यंत प्रेम आहे, तोपर्यंत काम मिळणार. त्यानंतर कायम होणार हे आपल्याला माहिती नाही' असं देखील अभिनेत्री म्हणाली.

**फरहाना भट्टही थोडक्यात वाचली**

महत्त्वाचे म्हणजे, अंजना सिंहपूर्वी इतरही अभिनेत्रींनीं कास्टिंग काऊचबद्दल वक्तव्य केलं आहे. याआधी देखील अनेका अभिनेत्रींनी त्यांच्यासोबत घडलेला प्रसंग आणि झगमगत्या दुनियेतील काळं सत्य जगासमोर आणलं आहे. सांगितला आहे. बिग बॉस फेम फरहाना भट्ट हिने देखील सुरुवातीच्या काळात तिच्यासोबत घडलेल्या घटनेबद्दल सांगितलं आहे. फरहाना हिला सिनेमांमध्ये काम करण्याच्या बहाण्याने मुंबईत बोलवण्यात आलं होतं. पण तिच्यासमोर अट ठेवण्यात आलेली की, काही आठवड्यांसाठी दिग्दर्शकाच्या फार्महाऊसवर राहावं लगणार आहे. येथे अभिनेत्रीला काही तरी गडबड वाटली ज्यामुळे फरहान हिने तेथून पळ काढला.

फरहाना हिच्याबद्दल सांगायचं झालं तर, बिग बॉसनंतर तिच्या लोकप्रियतेत अधिक वाढ झाली. आज फरहाना हिला कोणत्याच ओळखीची गरज नाही. आता सोशल मीडियावर फरहाना कायम सक्रिय असते. सोशल मीडियावर तिच्या चाहत्यांची संख्या देखील फार मोठी आहे. चाहत्यांच्या संपर्कात राहण्यासाठी फरहाना कायम स्वतःचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट करत असते.

# 'टॉक्सिक' साठी कियाराने घेतले तब्बल कोटींचे मानधन

बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री कियारा अडवाणी अनेकांच्या मनावर राज्य करते. कबीर सिंग चित्रपटानंतर कियारा अडवाणी आणखी प्रकाशझोतात आली होती. त्यांनतर ती चर्चेत होती. सध्या कियारा तिच्या आगामी 'टॉक्सिक' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. कन्नड सुपरस्टार यश मुख्य भूमिकेत असलेल्या या पीरियड गँगस्टर चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटात कियारा 'नादिया' ही भूमिका साकारत आहे. आता या चित्रपटासाठी कियाराच्या मानधनाबाबत मोठा खुलासा झाला आहे.

१२३ तेलुगूच्या अहवालानुसार, कियाराने 'टॉक्सिक'साठी विक्रमी मानधन घेतले असून तिला या चित्रपटासाठी तब्बल १५ कोटी रुपये मिळाले आहेत. हे मानधन तिच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीतील सर्वाधिक असल्याचे सांगितले जात आहे. यासोबतच कियाराचा देशातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींच्या यादीतही समावेश झाला आहे.

दरम्यान, नुकतेच 'टॉक्सिक'मधील पहिले गाणे 'तबाही' प्रदर्शित झाले आहे.



# अभिनेत्री क्रिती सनॉनने दिली प्रेमाची कबुली?

अभिनेत्री क्रिती सनॉन आणि उद्योगपती कबीर बहिया एकत्र दिसल्याने, त्यांच्या नात्याच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे. काही दिवसांपूर्वी दोघांच्या ब्रेकअपच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र नुकतेच दोघे डिनर डेटनंतर एकत्र बाहेर पडताना दिसले. याचदरम्यान क्रितीने एका मुलाखतीत तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत केलेले वक्तव्यही सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

क्रिती आणि कबीर यांना मुंबईतील एका रेस्टॉरंटबाहेर पापाराझींनी कॅमेऱ्यात कैद केले. डिनरनंतर दोघे एकाच कारमधून रवाना झाले. यावेळी क्रिती काळ्या रंगाच्या स्टायलिश पोशाखात दिसली, तर कबीरने पांढरा टी-शर्ट आणि जीन्स असा साधा कॅज्युअल लूक परिधान केला होता. दोघेही एकमेकांशी हसत-गप्पा मारताना दिसल्याने त्यांच्या रिलेशनशिपच्या चर्चांना आणखी बळ मिळाले.

दरम्यान, नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत क्रितीने तिच्या खासगी आयुष्याविषयी स्पष्ट भूमिका मांडली. ती म्हणाली, 'मी माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल कधीच सार्वजनिकपणे बोलत नाही. माझ्या आयुष्यातील अनेक गोष्टी चाहत्यांसोबत शेअर करते, पण काही गोष्टी स्वतःसाठी राखून ठेवणं मला महत्त्वाचं वाटतं. मी लग्न होईपर्यंत माझ्या रिलेशनशिपबद्दल कोणतीही चर्चा करणार नाही.' असे वृत्त लोकमतने दिले आहे.

यासंदर्भात अधिक बोलताना ती म्हणाली, 'माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही.



# आमिर खान अडकला लग्नाच्या बेडीत

बॉलिवूडचा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' आमिर खानने त्याची प्रेयसी गौरी स्प्रॅटसोबत रविवारी तिसऱ्यांदा लग्नगाठ बांधली आहे. त्यांच्या या अत्यंत खाजगी आणि साध्या विवाहसोहळ्याचा पहिला मनमोहक फोटो आता सोशल मीडियावर समोर आला असून तो वाऱ्यासारखा व्हायरल होत आहे. संपूर्ण कुटुंबाच्या उपस्थितीत एका अत्यंत साध्या आणि घरगुती वातावरणात या जोडप्याने त्यांच्या आयुष्याच्या नवीन प्रवासाची सुरुवात केली आहे. समोर आलेल्या या पहिल्या आणि खास फोटोमध्ये आमिर खान लग्नाच्या कायदेशीर कागदपत्रांवर स्वाक्षरी करताना दिसत आहे. नवविवाहित जोडपे त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या गराड्यात असून सर्वांच्याच चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि हसू स्पष्टपणे उमटलेले दिसत आहे. फोटोमध्ये गौरीचा मुलगा क्विन तिच्या मांडीवर बसलेला दिसत असून, त्यांच्या अगदी मागे व्हीलचेअरवर बसलेल्या आमिरच्या ९१ वर्षांच्या आई झीनत खान या नवविवाहित जोडप्याला पाहून आनंदाने हसताना दिसत आहेत. यासोबतच आमिर आणि किरण राव यांचा मुलगा आझाद हा देखील तिथे उपस्थित होता.



# सुरक्षेच्या कारणास्तव दिलजीत दोसांझच्या 'सतलज' चित्रपटावर कारवाई

अभिनेता-गायक दिलजीत दोसांझच्या 'सतलज' हा चित्रपट झी ५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवरून हटवण्यात आला आहे. केंद्र सरकारने माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ अंतर्गत झी ५ ला चित्रपट काढून टाकण्याचे निर्देश दिल्याची माहिती सरकारी सूत्रांनी दिली आहे. 'सतलज' हा चित्रपट १९९० च्या दशकातील पंजाबमधील दहशतवादाच्या काळावर आधारित असून, मानवाधिकार कार्यकर्ते जसवंत सिंह खालडा यांच्या आयुष्यावर प्रेरित असल्याचे सांगितले जाते. हा चित्रपट तीन वर्षांहून अधिक काळ प्रदर्शनाच्या प्रतीक्षेत होता. अखेर कोणतेही कट न करता तो झी ५ वर प्रदर्शित करण्यात आला होता. मात्र, प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच रविवारी संध्याकाळी तो प्लॅटफॉर्मवरून हटवण्यात आला.




यापूर्वी सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन ने चित्रपटामधील तब्बल १२७ बदल करण्याची शिफारस केली होती. मात्र, या बदलांमागील कारणांबाबत निर्मात्यांना स्पष्ट माहिती मिळाली नव्हती. त्यामुळे दीर्घ प्रतीक्षेनंतर निर्मात्यांनी चित्रपट ओटीटी वर प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला. चित्रपट हटवण्याच्या निर्णयावर पंजाबमधील विविध राजकीय पक्ष आणि शिरोमणी गुरूद्वारा प्रबंधक कमिटी यांनी आक्षेप नोंदवला आहे. त्यांनी चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, दिलजीत दोसांझ यांनीही प्रेक्षकांना चित्रपट जिथे आणि ज्या माध्यमातून शक्य असेल, तिथे पाहण्याचे आवाहन केले आहे. असे वृत्त इंडिया टुडे ने दिले आहे.

दरम्यान, ओटीटी प्लॅटफॉर्मवरील सामग्री ही अखत्यारीत येत नाही. अशा सामग्रीचे नियमन माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ अंतर्गत केले जाते. त्यामुळे या प्रकरणात सरकारने सुरक्षेच्या कारणास्तव संबंधित नियमांनुसार कारवाई केल्याचे सरकारी सूत्रांचे म्हणणे आहे.

# अंशुला कपूरच्या खास पोशाखाची सोशल मीडियावर चर्चा

सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आणि बॉलिवूड अभिनेता अर्जुन कपूरची बहीण अंशुला कपूरने नुकतेच तिचा दीर्घकाळचा प्रियकर रोहन ठक्करसोबत मुंबईत एका खाजगी पण भव्य समारंभात नुकतीच लग्नगाठ बांधली. या खास प्रसंगी तिचा पोषाख आणि लूकची सध्या सोशल मीडियावर चर्चा सुरु आहे. रिसेप्शनसाठी अंशुलाने पारंपरिक साडीला आधुनिक टच देत फॅशनचा एक सुंदर मिलाफ केला होता. तिने डिझायनर अमित अग्रवाल यांनी डिझाइन केलेली, कॉर्सेट सिल्हूटमध्ये नेसलेली, सिंदूरी लाल रंगाची बनारसी ब्रोकेड साडी परिधान केली होती. तिच्या या खास सोहळ्यातील फोटो तिने इंस्टाग्रामवर शेअर केले आहेत.



# पावसाळ्यात कोथिंबीर-पुदिना खराब होऊ नये म्हणून....

कोथिंबीर आणि पुदिना हे हिंदुस्थानी स्वयंपाकघरातील अत्यावश्यक घटक आहेत. भाजी, चटणी, सॅलड किंवा इतर अनेक पदार्थांची चव आणि सुगंध वाढवण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. मात्र खरेदी केल्यानंतर काही दिवसांतच ते कोमेजणे, पाने काळी पडणे किंवा कुजणे अशी समस्या अनेकांना जाणवते. योग्य पद्धतीने साठवणूक केल्यास ही समस्या टाळता येते आणि कोथिंबीर-पुदिना अधिक काळ ताजे ठेवता येतात.

कोथिंबीर आणि पुदिन्यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे अतिरिक्त ओलावा, चुकीची साठवणूक आणि हवेशी सतत संपर्क यामुळे त्यांची पाने लवकर खराब होतात. त्यामुळे त्यांची काळजीपूर्वक साठवणूक करणे आवश्यक आहे.



साठवण्यापूर्वी पिवळी, सडलेली किंवा खराब झालेली पाने वेगळी काढा.

धुतली असल्यास पाने पूर्णपणे कोरडी झाल्यानंतरच फ्रिजमध्ये ठेवा.

कोथिंबीर किंवा पुदिना पेपर टॉवेलमध्ये हलके गुंडाळून हवाबंद डब्यात किंवा झिप-लॉक पिशवीत ठेवा.

देठ थोड्या पाण्याने भरलेल्या ग्लासात ठेवून वरून सैल प्लास्टिकची पिशवी झाकल्यासही ताजेपणा टिकतो.

पेपर टॉवेल ओलसर झाल्यास तो वेळोवेळी बदला.

कोथिंबीर आणि पुदिना केळी, सफरचंद यांसारख्या इथिलीन वायू सोडणाऱ्या फळांजवळ ठेवणे टाळा.

फ्रिजमधून वारंवार बाहेर काढून पुन्हा ठेवणे टाळा.

कोथिंबीर किंवा पुदिन्याची पाने पिवळी, काळी किंवा तपकिरी होणे, खूप मऊ किंवा चिकट वाटणे आणि कुजल्यासारखा वास येणे ही खराब होण्याची प्रमुख लक्षणे आहेत. अशी पाने वापरणे टाळावे.

योग्य साठवणूक आणि नियमित तपासणी केल्यास कोथिंबीर व पुदिना अनेक दिवस ताजे, हिरवेगार आणि सुगंधित राहू शकतात. त्यामुळे वारंवार बाजारात जाण्याची गरजही कमी होते आणि अन्नाची नासाडीही टाळता येते.

# नाश्त्यात रोज ब्रेड खाण्याची चूक करू नका

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेकजण सकाळच्या नाश्त्यासाठी ब्रेडची निवड करतात. ब्रेड अगदी सहज उपलब्ध होत असल्याने, सर्वात लोकप्रिय पर्याय मानला जातो. मात्र, विशेषतः मैद्यापासून बनवलेल्या पांढऱ्या ब्रेडमध्ये फायबर आणि इतर आवश्यक पोषक घटक कमी प्रमाणात असतात. त्यामुळे पोट लवकर रिकामे वाटते आणि काही वेळातच पुन्हा भूक लागते. नाश्ता हा दिवसातील सर्वात महत्त्वाचा आहार मानला जातो. त्यामुळे सकाळच्या जेवणात प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा समतोल असणे गरजेचे आहे. असे पौष्टिक पदार्थ शरीराला ऊर्जा देतात, पचन



सुधारतात आणि दीर्घकाळ पोट भरल्याची भावना निर्माण करतात.

ब्रेडऐवजी हे ५ आरोग्यदायी पदार्थ खायला हवेत

ओट्स, गाजर, मटार, सिमला मिरची, कांदा आणि कढीपत्त्यापासून तयार होणारा ओट्स उपमा फायबर आणि पोषक तत्त्वांनी भरलेला असतो. हा नाश्ता पोट भरून ठेवण्यास आणि ऊर्जा टिकवून ठेवण्यास मदत करतो.

भिजवलेल्या मूगडाळीचे पीठ तयार करून त्यात कांदा, कोथिंबीर आणि मसाले घालून कमी तेलात चिल्ला बनवा. प्रथिने आणि फायबरने समृद्ध असलेला हा पदार्थ स्नायूंसाठीही फायदेशीर ठरतो.

पोहे, शेंगदाणे आणि विविध भाज्यांचा वापर करून तयार केलेले पोहे हे हलके, चवदार आणि पौष्टिक असतात. त्यातून शरीराला जीवनसत्त्वे, खनिजे आणि आवश्यक ऊर्जा मिळते.

नाचणीमध्ये कॅल्शियम, लोह आणि फायबर मुबलक प्रमाणात असते.

नाचणीचा डोसा नारळाच्या चटणी किंवा सांबारसोबत खाल्ल्यास तो पौष्टिक आणि पोटभर नाश्ता ठरतो.

दह्यामध्ये केळी, सफरचंद किंवा हंगामी फळे मिसळून त्यावर बदाम, अक्रोड, चिया किंवा जवसाच्या बिया घाला. हा नाश्ता प्रथिने, कॅल्शियम, फायबर आणि हेल्दी फॅट्सचा उत्तम स्त्रोत आहे.

हेल्दी नाश्ता करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात

नाश्त्यात प्रथिने, फायबर आणि जीवनसत्त्वांचा समावेश असावा.

ताज्या भाज्या, फळे, कडधान्ये आणि संपूर्ण धान्यांना प्राधान्य द्या.जास्त तेल, साखर, मीठ आणि लोणी टाळा.

शक्यतो ताजा नाश्ता तयार करा.

दिवसभर पुरेसे पाणी प्या आणि आपल्या वय व शारीरिक हालचालीनुसार अन्नाचे प्रमाण ठरवा.

रात्रभर उपाशी राहिल्यानंतर सकाळचा नाश्ता शरीराला आवश्यक ऊर्जा पुरवतो. संतुलित नाश्ता केल्याने दिवसभर काम करण्याची क्षमता वाढते, पोट जास्त वेळ भरलेले राहते आणि नंतर अति खाण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे निरोगी जीवनशैलीसाठी रोज सकाळचा पौष्टिक नाश्ता करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# किचनमध्ये स्वयंपाक करताना ...

निरोगी राहण्यासाठी केवळ पौष्टिक गोष्टी खाणे पुरेसे नाही तर, योग्य पद्धतीने स्वयंपाक बनवणे देखील तितकेच महत्त्वाचे मानले जाते. अनेकदा आपण चांगल्या दर्जाचे साहित्य वापरतो, पण स्वयंपाक करताना नकळत केलेल्या छोट्या चुकांमुळे अन्नातील पोषक तत्वांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. म्हणूनच स्वयंपाकघरात पाळल्या जाणाऱ्या योग्य सवयी देखील संतुलित आहाराचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो.



किचनमधील कोणत्या ५ चुका टाळणे आवश्यक आहे

भाज्या गरजेपेक्षा जास्त शिजवणे

भाज्या खूप वेळ किंवा जास्त आचेवर शिजवल्याने त्यातील काही विटामिन्स, विशेषतः विटामिन 'सी' आणि काही विटामिन 'बी' कमी होऊ शकतात. त्यामुळे भाज्या गरजेनुसारच शिजवाव्यात, जेणेकरून त्यांची चव, रंग आणि पोषण टिकून राहील.

एकाच तेलाचा वारंवार वापर करणे

एकदा वापरलेले तेल वारंवार गरम करून वापरल्याने त्यात हानिकारक घटक तयार होऊ शकतात. यामुळे अन्नाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. तळण्यासाठी वापरलेले तेल पुन्हा पुन्हा गरम करणे टाळणेच उत्तम.

गरजेपेक्षा जास्त मीठ आणि मसाले वापरणे

जेवणात जास्त मीठ आणि मसाल्यांचा वापर केल्याने चव वाढू शकते, परंतु त्याचे जास्त प्रमाण आरोग्यासाठी चांगले मानले जात नाही.

संतुलित प्रमाणात मीठ आणि मसाले टाकल्याने जेवण चवदार होते.

**भाज्या कापून दीर्घकाळ उघडे ठेवणे**

भाज्या कापल्यानंतर दीर्घकाळ उघड्या ठेवल्यास त्यांचा ताजेपणा आणि काही पोषक तत्वांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे गरजेच्या वेळीच भाज्या कापून लवकरात लवकर वापरणे योग्य ठरते.

**अन्नपदार्थ चुकीच्या पद्धतीने साठवून ठेवा**

फळे, भाज्या, डाळी आणि मसाले योग्य तापमानात आणि स्वच्छ, सुक्या ठिकाणी साठवणे गरजेचे आहे.

चुकीच्या पद्धतीने ठेवल्यास त्यात ओलावा येऊ शकतो, ज्यामुळे त्यांची गुणवत्ता आणि ताजेपणा कमी होते.

कोणत्या चांगल्या सवयी जेवणाला हेल्दी बनवू शकतात?

स्वयंपाक करण्यापूर्वी आणि नंतर हात व्यवस्थित धुवावेत, तसेच स्वयंपाकघर आणि भांडी स्वच्छ ठेवावीत.

ताजे आणि चांगल्या दर्जाचे अन्नधान्य व साहित्य वापरावे. भाज्या चांगल्या धुवून मगच कापाव्यात आणि गरजेनुसार शिजवाव्यात.

तळण्याऐवजी अन्न उकळणे, वाफेवर शिजवणे किंवा कमी तेलात शिजवणे हे उत्तम पर्याय ठरू शकतात. आहारात संपूर्ण धान्य, डाळी, हिरव्या भाज्या आणि हंगामी फळांचा समावेश करावा. जास्त प्रमाणात तेल, मीठ आणि साखर वापरणे टाळावे.

जेवण जास्त शिजवू नये आणि योग्य तापमानावर तयार करावे. कच्चे आणि शिजवलेले अन्नपदार्थ वेगवेगळे ठेवावेत, जेणेकरून संसर्गाचा धोका कमी होईल.

संतुलित आहारासाठी जेवणात प्रोटीन, फायबर, विटामिन्स आणि मिनरल्स भरपूर प्रमाणात असलेल्या गोष्टींचा समावेश करण्याचा प्रयत्न करा.

# अपचनामुळे त्रस्त आहात?

अपचनाचा त्रास टाळण्यासाठी जेवताना घाई करू नका. अन्न हळूहळू आणि पूर्ण चावून खा. जेवल्यानंतर लगेच झोपू नका. जास्त तेलकट, मसालेदार आणि जड अन्न खाणे टाळा.

लिंबू, मीठ घालून केलेले सरबत थोडेथोडे थोडय़ा वेळाने पिण्याने अपचनाचा त्रासापासून सुटका होते.

जेवणानंतर ओवा आणि जिरे समान प्रमाणात चावून खा. पोटात गॅस असल्यास जि-याचे पाणी पिणे फायदेशीर ठरते. आल्याच्या छोटय़ा तुकडय़ावर लिंबाचा रस आणि थोडे म



# तेलकट त्वचेकरिता टाळा या गोष्टी

तेलकट त्वचा असलेल्या अनेकांना वारंवार मुरुम, ब्लॅकहेड्स आणि त्वचेवरील अतिरिक्त चमक यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. विशेषतः उष्ण आणि दमट हवामानात त्वचेतून अधिक प्रमाणात सेबम (नैसर्गिक तेल) तयार होत असल्याने छिद्रे बंद होण्याची शक्यता वाढते. अशा वेळी योग्य स्किनकेअर करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच काही उत्पादने वापरणे टाळणेही आवश्यक आहे.



त्वचेतील सेबेशियस ग्रंथी अधिक प्रमाणात सेबम तयार करू लागल्यास त्वचा तेलकट होते. याशिवाय हार्मोनल बदल, चुकीची त्वचा निगा, तणाव आणि काही आरोग्यविषयक कारणांमुळेही ही समस्या वाढू शकते.

शिया बटर, कोको बटर किंवा अतिजड मॉइश्चरायझर त्वचेवर जाड थर तयार करतात. त्यामुळे त्वचेची छिद्रे बंद होऊन मुरुम येण्याचा धोका वाढू शकतो.

नारळाचे तेल किंवा इतर नैसर्गिक तेल त्वचेसाठी फायदेशीर वाटत असले तरी तेलकट त्वचेवर ते थेट लावल्यास छिद्रे बंद होऊ शकतात. त्यामुळे मुरुम आणि पिंपल्स वाढण्याची शक्यता असते.

पेट्रोलियम जेली त्वचेवर संरक्षक थर तयार करते. मात्र तेलकट त्वचेवर तिचा वारंवार वापर केल्यास चिकटपणा वाढू शकतो आणि काही लोकांमध्ये मुरुमांचा त्रास वाढू शकतो.

त्वचेवरील अतिरिक्त तेल काढून टाकण्यासाठी अनेकजण कडक स्क्रब वापरतात. मात्र अशा स्क्रबमुळे त्वचेवर सूक्ष्म जखमा, जळजळ आणि खाज निर्माण होऊ शकते. त्यामुळे सौम्य एक्सफोलिएटर वापरणे अधिक योग्य ठरते.

तेलकट त्वचेसाठी काय करायला हवे?

दिवसातून दोनदा सौम्य फेसवॉशने चेहरा स्वच्छ धुवा.पाण्यावर आधारित मॉइश्चरायझर वापरा.चेहरा वारंवार हाताने स्पर्श करणे टाळा.मुरुमांची समस्या वारंवार होत असल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# पावसाळ्यात बॅक्टेरिया व बुरशी वेगाने का वाढतात?

पावसाळ्यात त्वचेवर खालील लक्षणे दिसल्यास त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका: त्वचेवर सतत तीव्र खाज सुटणे. त्वचा लाल होणे किंवा त्यावर चट्टे पडणे. गोलाकार आकाराचे दाणे किंवा रॅशेस होणे. त्वचा सोलवटणे इन्फेक्शन असलेल्या त्वचेतून दुर्गंधी येणे. पायाच्या बोटांच्या फटींमध्ये पांढरी किंवा ओली त्वचा होणे (चिखल्या होणे).



**घरातील 'या' गोष्टी ठरू शकतात संसर्गाचे कारण**

डॉक्टरांच्या मते, पावसाळ्यात टीनिया व कँडिडा संसर्ग सर्वात जास्त प्रमाणात पाहायला मिळतो. अशा वेळी घरातील पुढील ५ गोष्टींवर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे:

**१. कपडे आणि कपाट :** पावसाळ्यात बंद कपाटांमध्ये ओलावा टिकून राहतो, ज्यामुळे कपड्यांना बुरशी लागण्याचा धोका असतो. कपड्यांमधून कुबट वास येत असल्यास त्यात फंगस तयार झाल्याचे समजावे. सुती कपडे ओलावा लवकर शोषून घेतात. त्यामुळे या ऋतूत कपडे व्यवस्थित इस्त्री करून अथवा पूर्णपणे सुकवूनच कपाटात ठेवा व परिधान करा.

**२. ओले टॉवेल आणि अंतर्वस्त्रे :** ओला टॉवेल, ओले मोजे किंवा अंडरगार्मेंट्स जास्त वेळ वापरणे किंवा ते सुक्या कपड्यांसोबत कपाटात एकत्र ठेवणे ही मोठी चूक ठरू शकते. एका ओल्या कपड्यामुळे कपाटातील सर्व कपड्यांमध्ये फंगस पसरू शकते. कपड्यांमधील मॉइश्चर नियंत्रित करण्यासाठी तुम्ही कपाटात काही वेळ बल्ब पेटवून ठेवू शकता.

**३. बाथ मॅट व इतर फॅब्रिक्स :** बाथ मॅट (पायपुसणी), उशीचे कव्हर, बेडशीट या गोष्टी दीर्घकाळ दमट राहिल्यास फंगस वेगाने वाढते. या गोष्टी वेळोवेळी धुणे, पूर्ण सुकवूनच वापरणे अत्यंत आवश्यक आहे.

**४. अस्वच्छ भांडी आणि साचलेले पाणी :** केवळ कपडेच नाही तर घरात पडलेली अस्वच्छ भांडी, दीर्घकाळ उघडे राहिलेले पाणी व शिळे अन्न यामुळेही बॅक्टेरिया वेगाने वाढतात. पावसाळ्यात अशा अन्नाचे सेवन केल्यास गॅस्ट्रोएन्टेरिटिस, फूड पॉयझनिंग, पोटाचे विकार व हेपेटायटीस यांसारख्या आजारांचा धोका वाढतो.

पावसात भिजल्यानंतर खाज किंवा रॅशेस आल्यास सुरुवातीला कॅलामाइन लोशन किंवा डॉक्टरांच्या सल्ल्याने अँटी-ॲलर्जिक औषध घेता येऊ शकते. मात्र, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय मेडिकलमधून आणून कोणतीही स्टेरॉइड क्रीम लावू नका. यामुळे फंगल इन्फेक्शन तात्पुरते दबले तरी नंतर ते अधिक गंभीर रूप धारण करते. त्रास कायम राहिल्यास त्वरित डर्मेटोलॉजिस्टचा संपर्क साधावा.

**संसर्गापासून बचावाचे ५ सोपे उपाय**

पावसात भिजल्यानंतर विलंब न करता लगेचच सुके व स्वच्छ कपडे परिधान करा. बाहेरून घर पोहोचताच अँटी-बॅक्टेरियल साबणाने अंघोळ करा. केस शॅम्पूने स्वच्छ धुवा. त्वचा, विशेषतः त्वचेच्या घड्या व पायाची बोटे पूर्णपणे सुकी ठेवा. ओले टॉवेल, मोजे व अंडरगार्मेंट्स चुकूनही पुन्हा वापरू नका.

नेहमी ताजे घरगुती अन्न अन् शुद्ध पाण्याचे सेवन करा; तसेच जास्त गोड किंवा प्रोसेस्ड फूड खाणे टाळा.

# 'एनर्जी ड्रिंक' प्यायल्याने शरीराची हानी कशी होते?

जिममध्ये वर्कआउट करून आल्यानंतर जर तुम्ही एनर्जी ड्रिंक घेत असाल तर तुम्हाला आश्चर्य वाटेल अशी एक माहिती समोर आली आहे. एनर्जी ड्रिंक बनवणाऱ्या कंपन्या सध्या अन्न सुरक्षेची खात्री करणाऱ्या यंत्रणेच्या रडारवर आहेत. भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाने एनर्जी ड्रिंक विकण्याचा दावा करणाऱ्या कंपन्यांना नोटीस पाठवली आहे. उत्पादनावर 'एनर्जी ड्रिंक' असा उल्लेख करण्यावर इएऐंह ने आक्षेप घेतला आहे. तसेच या ड्रिंक्सच्या मार्केटिंगसाठी केल्या जाणाऱ्या दाव्यांवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. 'बुस्ट्स एनर्जी', 'एकाग्रता वाढवणारे पेय', 'मन आणि शरीराला प्रफुल्लीत करणारे पेय' असे दावे करून ही पेय 'एनर्जी ड्रिंक'च्या नावाने विकली जातात. 'एनर्जी ड्रिंक' या श्रेणीचे कोणतेही मानक अन्न सुरक्षेशी संबंधित कायद्यात नसल्याचे तसेच नियमात नमूद नसलेला कोणताही दावा अन्नाबाबत करता येत नाही, असे इएऐंह ने स्पष्ट केले.



नवी दिल्लीतील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटलमधील एंडोक्रिनोलॉजिस्ट डॉ. सप्तर्षी भट्टाचार्य यांनी दिलेल्या माहितीनुसार, एनर्जी ड्रिंकमध्ये कॅफिन आणि साखर असते. एनर्जी ड्रिंकची २५० एमएलची कॅन सर्वाधिक विकली जाते. त्या कॅनमध्ये कॅफिन ७५ मिलीग्रॅम, तर साखर २७ ग्रॅम म्हणजेच जवळपास सात चमचे (टिस्पून) असते. त्याचबरोबर त्यात टॉरिन, ग्लुकुरोनोलॅक्टोन आणि निआसीन, व्हिटॅमिन बी६, व्हिटॅमिन बी१२ ही व्हिटॅमिन्स असतात. साखर आणि कॅफिन यांच्यामुळे एनर्जी ड्रिंकचे दीर्घकाळ सेवन करणे घातक ठरते.

एनर्जी ड्रिंकमध्ये असलेल्या या पदार्थांपैकी कॅफिन रक्तामार्फत थेट मेंदूपर्यंत उतींच्या मार्फत पोहोचते. तसेच आपल्याला झोप किंवा थकवा येण्यासाठी कारण ठरणाऱ्या व मेंदूत जमा झालेल्या एडेनोसिन रिसेप्टर्सला हे कॅफिन ब्लॉक करते. त्यामुळे थकवा किंवा झोप कमी होते. मेंदूची सतर्कता (अलर्टनेस), एकाग्रता आणि प्रतिसाद देण्याचा कालावधी वाढतो.

कॅफिन हे मध्यवर्ती मज्जासंस्थेला उत्तेजित करते. त्यामुळे मेंदूची सतर्कता वाढते. कॅफिनमुळे शरीराला असलेली झोपेची गरज संपत नाही. तसेच कॅफिन शरीरात कोणतीही ऊर्जा (एनर्जी) निर्माण करत नाही. आपल्याला काही कालावधीसाठी फक्त ताजेतवाने वाटते. परंतु, आपल्या शरीराला असलेली झोपेची व आरामाची गरज मात्र तशीच कायम राहते.

एनर्जी ड्रिंकमधील टॉरिन या घटकाबद्दल सर्वाधिक गैरसमज आहे. टॉरिन हे मानवी शरीरात नैसर्गिकपणे असणारे अमिनो ॲसिड आहे. स्नायूंचे कार्य, कॅल्शियम नियंत्रण आणि मज्जासंस्थेचे कार्य यांमध्ये टॉरिन महत्त्वाची भूमिका बजावते. टॉरिनमुळे शरीरात एनर्जी निर्माण होते असा दावा अनेकदा जाहिरातींमध्ये केला जातो. व्हिटॅमिन बी देखील ऊर्जा चयापचयात महत्त्वाची भूमिका बजावते, परंतु, त्यामुळे तात्काळ शरीरात ऊर्जा निर्माण होत नाही.

'एनर्जी ड्रिंक' हे नावच मुळात गोंधळ निर्माण करणारे आहे. आहारशास्त्रात एनर्जीला कॅलरीज म्हटले जाते.

आपण खाल्लेल्या अन्नातून शरीराला मिळणारी उष्णता किंवा शक्ती मोजण्याचे कॅलरी हे एक एकक आहे. एनर्जीचा अर्थ दैनंदिन जीवनात आपण शरीराची सतर्कता, क्षमता (स्टॅमिना) किंवा सुधारलेली कार्यक्षमता असा लावतो.

## महाराष्ट्राच्या विस्तारणाऱ्या क्षमता



जागतिक गुंतवणूक कंपनी ब्रुकफिल्ड प्रॉप्रटीज हीदेखील महाराष्ट्रात जीसीसी सुविधा स्थापन करण्यासाठी १ अब्ज अमेरिकन डॉलरपेक्षा जास्त गुंतवणूक करत आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. हे नवे सेंटर जगातील सर्वात मोठे असेल आणि त्यामुळे महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. नरेंद्र मोदी सरकारने विकसित भारताचे लक्ष्य ठेवले असले, तरीदेखील केवळ अर्थव्यवस्थेचा आकार हा निकष लक्षात घेतल्यास, भारत आज सहाव्या स्थानावर आहे. जागतिक महासत्तेचे स्वप्न ठेवण्यात आले असले, तरी जागतिक बँकेने भारताचा समावेश अल्प-मध्य गटातच केला आहे! मात्र केवळ भारताचा विचार केला, तर दक्षिणेतील राज्ये प्रगतिपथावर असून, उत्तर भारतातील राज्ये खूपच मागे आहेत. परकीय गुंतवणूक आकर्षित करून घेण्यात महाराष्ट्र क्रमांक एकवर असला, तरीदेखील यंदाच्या धुवाधार पावसात शहरातील पायाभूत सुविधा पूर्णपणे कोलमडल्या आहेत. रस्ते, पूल, विमानतळ, रेल्वेमार्ग यांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मात्र हे काहीही असले, तरीदेखील राज्यात २ लाख ५६ हजार कोटी रुपयांच्या १८ विशाल व अतिविशाल प्रकल्पांसाठी विशेष प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या प्रकल्पांमुळे एक लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहे. ही गोष्ट वास्तवात आल्यास, स्वागतच करावे लागेल.

भारत हा जगातील एक विशाल देश असून, येथील लोकांची क्रयशक्ती दिवसेंदिवस वाढत आहे. साक्षरता प्रसार वाढला असून, उच्च शिक्षितांच्या संख्येतही भर पडत आहे. ज्या देशाची क्रयशक्ती चांगली असते आणि जेथील कौशल्ये विकसित झालेली असतात, त्या देशाचे भविष्य उज्ज्वलच असते. अमेरिकेतील ई-कॉमर्स क्षेत्रातील अ?मेझॉन या महाकाय कंपनीने आगामी पाच वर्षांत भारतात ३५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे.

देशात एआय डेटा सेंटर उभारण्यासाठी गूगल १५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. तर भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेच्या, म्हणजेच एआयच्या विकासाला चालना देण्यासाठी मायक्रोसॉफ्ट कंपनी व्यापक पायाभूत सुविधा विकास कार्यक्रम हाती घेणार आहे. त्यासाठी एआय क्षेत्रात दोन कोटी भारतीयांना ती कौशल्यविकासाचे धडे देणार आहे.

सध्या जगभरात मायक्रोसॉफ्टची ७० पेक्षा अधिक विभागीय डेटा सेंटर्स

**हेमंत देसाई**

आहेत. या वाटचालीत मायक्रोसॉफ्ट ही कॉग्निजंट, इन्फोसिस, टीसीएस आणि विप्रो या कंपन्यांशी धोरणात्मक भागीदारी करणार आहे. या क्षेत्रातील १७.५ अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक ही कंपनीची आतापर्यंतची भारतातील सर्वात मोठी गुंतवणूक ठरणार आहे. त्यातून भारतात एआयसाठी आवश्यक अत्युच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा उभ्या राहणार आहेत. भारत जगातील सर्वात गतिमान डिजिटल बाजारपेठांपैकी एक आहे.

भारतात सर्वाधिक विदेशी गुंतवणूक सध्या महाराष्ट्रात होत आहे. त्यामुळे मायक्रोसॉफ्टसारख्या कंपनीचे लक्ष राज्याकडे वळणार, हे स्वाभाविकच होते. आता मायक्रोसॉफ्टसोबत महाराष्ट्रात जीसीसी किंवा ग्लोबल कपॅबिलिटी सेंटर हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्याचे राज्य सरकारने ठरवले असून, महाराष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने ही सुवार्ताच म्हणावी लागेल.

१.५७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले हे केंद्र सुमारे २० लाख चौरसफुटांवर उभारले जाणार आहे. त्यातून एकूण १५ लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. नाडेला यांनी महाराष्ट्र सरकारसोबत विकसित केलेल्या ऊीळाश अखजड या प्लॅटफॉर्मचे विशेष सादरीकरण एका कार्यक्रमात करण्यात आले. महाराष्ट्राने तयार केलेल्या 'चरीलश्रश' प्लॅटफॉर्ममुळे सायबर आणि आर्थिक गुन्हे तीन-चार महिन्यांऐवजी फक्त २४ तासांत शोधता येऊ लागले आहेत.महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात डिजिटल अरेस्टसह एपीके फाइल डाउनलोड करून सर्वसामान्यांना फसवण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय भर पडली आहे. दसरा-दिवाळीला ऑनलाइन वस्तू खरेदीवर डिस्काउंटच्या बहाण्यानेही गंडा घालण्यात आला आहे. समाजमाध्यम वापरकर्त्यांच्या मोबाइलवर एखाद्या ओळखीच्या किंवा ओळख नसलेल्या व्यक्तीकडून लिंक किंवा एखादी फाइल पाठवण्यात येत असते.

पूर्वी आधारकार्ड पॅनकार्डशी जोडण्यासाठी लिंक पाठवण्यात येत होती किंवा महावितरणचे बिल थकले आहे, अशी बतावणी करून फसवणूक करण्यात येत होती. यंदा आरटीओ चलन, वाहतूक पोलिसांचे चलन आले आहे, अशीही कारणे समोर आली आहेत. नागरिकांनी अशा लिंक किंवा फाइल ओपन करू नये, असे आवाहन पोलिसातर्फे केले जात असले, तरीदेखील लोक अशा गोष्टींना बळी पडत असतात. या संदर्भात मायक्रोसॉफ्टसोबत महाराष्ट्र सरकारने सायबरक्षेत्राचे सहकार्य केले

## महिला शेतकऱ्यांना न्याय



राज्य सरकारमुळे महिला शेतकऱ्यांना आता खऱ्या अर्थाने न्याय मिळाला. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरातील महिलांची आता स्वतंत्र ओळख निर्माण होणार आहे. कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पश्चात घर चालविण्या साठी, संसार सांभाळण्या साठी, घरातील मुले वाढविण्यासाठी घरातील महिलांनी शेतीवरच आपल्या संसाराचा गाडा हाकला आहे. पण आता महिला शेतकऱ्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले आहे. सरकारकडे कागदोपत्रीही उल्लेख झाला आहे. येत्या काळात या निर्णयामुळे महिला शेतकऱ्यांच्या जीवनमानामध्ये त्याचा नक्कीच सकारात्मक बदल झालेला पहावयास मिळेल.

जिच्या हाताने बी पेरले,
जिच्या घामाने माती ओली झाली,
जिच्या कष्टातून शेत बहरले,
त्या स्त्रीला आजवर 'शेतकरी' म्हणण्याचाही अधिकार नव्हता'. ही वस्तुस्थिती जितकी कटू, तितकीच लाजिरवाणी होती. भारतीय शेतीच्या इतिहासात स्त्रीचे योगदान अमूल्य असतानाही तिच्या श्रमांना अधिकृत ओळख नव्हती. ती शेतात राबायची, पीक उभे करायची, जनावरांची देखभाल करायची, कुटुंबाचा संसार आणि शेतीचा गाडा एकाच वेळी ओढायची; पण सरकारी कागदोपत्री तिची ओळख फक्त 'शेतकऱ्याची पत्नी' इतकीच मर्यादित राहिली. तिचे हात मातीने माखलेले होते, पण तिच्या नावावर शेतकरीपणाची नोंद नव्हती. अखेर उशिरा का होईना, महाराष्ट्र सरकारने महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

## पावसाळी संकटे



जून महिना कोरडा गेल्यानंतर आता जुलैच्या प्रारंभी राज्यात सर्वत्र पावसाने जोरदार हजेरी लावली आणि त्याच्या जोडीने पावसामुळे निर्माण होणारी संकटेही समोर आली. या संकटांना पावसाला किंवा निसर्गला अजिबात जबाबदार धरता येणार नाही. तर या संकटांची चाहूल न लागल्यामुळे जी प्रशासकीय अव्यवस्था समोर आली, त्यामुळेच राजधानी मुंबईसह अनेक ठिकाणी या समस्या समोर येताना दिसत आहेत. 'नेमेची येतो पावसाळा' असे असले तरी या पावसाच्या जोडीने दैनंदिन जीवन विस्कळीत करणाऱ्या अनेक गोष्टीही येत असल्याने त्याची पूर्वतयारी जर झाली नसेल तर काय होऊ शकते याचे उदाहरण पहायला मिळाले. एकतर जून महिन्याचा बहुतांश कालावधी पावसाविना गेल्याने प्रशासन गाफील राहिले आणि अचानक जेव्हा पावसाला सुरुवात झाली तेव्हा सर्वांचीच धावपळ झाली.

मुसळधार पावसामुळे मुंबईच्या सखल भागामध्ये पाणी भरण्याचा विषय काही नवीन नाही. गेले अनेक वर्षे हा विषय चर्चेला जात आहे. पण त्यावर कोणालाही तोडगा काढता येत नाही. या कालावधीमध्ये अनेक सरकारे आली आणि गेली. तरीही समस्या कायमच राहिली आहे. पावसाचे पाणी ज्या गतीने आणि ज्या प्रमाणात पडत आहे, त्या प्रमाणात पाण्याचा निचरा होत नसल्याने सखल भागात पाणी साचणे ही एक नैसर्गिक गोष्ट आहे.

पण याची कोणतीही तयारी कधीच प्रशासन करत नसल्यामुळे राजधानी मुंबापुरीची नेहमीच तुंबापुरी होताना दिसते. यावेळी तर मुंबईमध्ये संकटांची मालिकाच समोर आली. एक झाड स्कूल बसवर पडल्याने निष्पाप विद्यार्थ्यांचा बळी गेला. मॅन हॉलमध्ये पडल्यामुळे एका इसमाचा मृत्यू झाला. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी झाडे कोसळण्याच्या आणि काही ठिकाणी घरे कोसळण्याच्याही घटना घडल्या. सखल भागात पाणी साठल्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झालेच शिवाय मालमत्तेचे नुकसानही झाले.

पावसाळी हंगामाला सुरुवात होण्यापूर्वी मुंबई महापालिकेचे सत्ताधारी असो किंवा राज्य सरकारचे सत्ताधारी असोत, मुंबईतील सर्व पावसाळी कामे पूर्ण झाल्याचा दावा करत असतात. अनेक ठिकाणी भेटी दिल्याचे पुरावेही छायाचित्रांच्या माध्यमातून सादर केले जातात. पण अशी पावसाळी कामे पूर्ण झाली असती तर पावसाला सुरुवात झाल्यावर ही संकटांची मालिका का सुरू होते याचे उत्तर आता सत्ताधाऱ्यांना द्यावे लागणार आहे. यापूर्वी अनेक वेळा मुंबईसह महाराष्ट्राला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे.

अतिवृष्टीचे अनेक प्रसंग या महाराष्ट्राने झेलले आहेत. त्यापासून कोणताही धडा घेण्यात न आल्याने दरवर्षीच अशा प्रकारच्या संकटांच्या मालिकांना सामोरे जावे लागत आहे.

आणखी काही दिवस मुसळधार पाऊस होणार असल्याने नागरिकांनी गरज असेल तरच घराच्या बाहेर पडावे, असे आवाहन आता राज्य सरकारतर्फे करण्यात आले आहे.

## सुरक्षित मातृत्व?

स्त्री हीक्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता असते' हे आपण अनेक वर्षे ऐकत आलो आहोत.आई ही कुटुंबाचा आणि समाजाचा आधारस्तंभ असून, निरोगी माता म्हणजे निरोगी कुटुंब आणि सुदृढ समाज असल्याचे मानले जाते. त्यामुळे गर्भधारणेपासून प्रसूतीनंतरच्या काळापर्यंत मातेच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. याच उद्देशाने जागतिक आरोग्य संघटनेने मातांचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी २००५ पासून दरवर्षी १० जुलै हा दिवस 'मातृसुरक्षा दिन' म्हणून साजरा केला जातो.

या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सुरक्षित मातृत्वाविषयी जनजागृती करणे, गर्भवती महिलांना वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे हे आहे. प्रत्येक स्त्रीने गर्भधारणेदरम्यान नियमित आरोग्य तपासणी करणे, संतुलित आहार घेणे, आवश्यक लसीकरण करणे, रक्तदाब व हिमोग्लोबिनची तपासणी करणे, तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य उपचार घेणे हे अत्यंत आवश्यक आहे.

पूर्वीच्या काळी बाळंतपणे घरात होत असत. त्याकाळी सुईण बोलावून गरोदर स्त्रीची प्रसूती होत असे.पण असे करणे धोक्याचे असे. यामुळे त्या स्त्रीच्या व बाळाच्या जीवाला नकळत धोका पोहोचण्याचा संभव असे. तसेच त्याकाळी जन्माला येणाऱ्या अपत्याच्या वयात अवघे एक ते दीड वर्षाचे अंतर असे. यामुळे त्या स्त्रीच्या आरोग्याला धोका पोहोचत असे. तर कधी आठ ते दहा बाळंतपणे झाल्यामुळे त्या स्त्रीला बाळंतरोग होत असे. आजही महाराष्ट्रातील काही ग्रामीण भागात घरातच जन्म होत आहेत.

गरोदर स्त्रीची प्रसूती जर प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत किंवा सुसज्ज आरोग्य केंद्रात झाल्यास आई व बाळ दोघांच्याही सुरक्षिततेची खात्री अधिक वाढते. गेल्या काही वर्षांपासून जरी मातांच्या आरोग्याबाबत काळजी घेतली जात असली, तरी हजारो महिलांनी गरोदरपणात तसेच प्रसूती नंतर आपला जीव गमावला असल्याचे अनेक अहवालांतून समोर येते.

मातृमृत्यू दर (एमएमआर) म्हणजे गर्भधारणेचे ठिकाण किंवा कालावधी विचारात न घेता, गर्भधारणा किंवा गर्भपात यामुळे दर १,००,००० जिवंत जन्मांमागे होणाऱ्या मातांच्या मृत्यूंची संख्या. महिलांमधील गर्भधारणेशी संबंधित धोका दर्शवण्यासाठी मातृमृत्यू दराचा वापर केला जातो. सर्वात कमी माता मृत्यूदर असलेले राज्य केरळ आहे, तर सर्वात जास्त माता मृत्यूदर असलेले राज्य आसाम आहे.



विशेष म्हणजे पश्चिम बंगाल, हरियाणा, उत्तराखंड आणि छत्तीसगड यांसारख्या राज्यांमध्ये मागील सर्वेक्षणाच्या तुलनेत माता मृत्युदरात वाढ नोंदवली गेली आहे.

प्रसूतीनंतर मातेला पुरेसा आराम, पौष्टिक आहार, स्तनपानाविषयी मार्गदर्शन आणि नियमित वैद्यकीय तपासणी यांनाही तितकेच महत्त्व आहे. शासनाच्या विविध योजनांद्वारे गर्भवती महिलांना मोफत तपासणी, औषधे, लसीकरण आणि सुरक्षित प्रसूतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मात्र, या योजनांचा लाभ प्रत्येक गरजू महिलेला मिळण्यासाठी जनजागृती आणि समाजाचा सक्रिय सहभाग तेवढाच आवश्यक आहे.

भारत सरकारची 'प्रधानमंत्री मातृवंदना' या योजनेद्वारे गरोदर महिलांना पहिल्या अपत्यासाठी आर्थिक लाभ दिला जातो. तसेच 'जननी सुरक्षा' योजनेमार्फत गरोदर महिलांना प्रसूतीसाठी आर्थिक मदत पुरवली जाते. 'जननी शिशू सुरक्षा' कार्यक्रमाअंतर्गत शासकीय रुग्णालयांमध्ये गरोदर माता आणि बालकांना संपूर्ण मोफत उपचार, औषधे आणि वाहतूक सुविधा पुरवली जाते. तर 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व' अभियानामार्फत गरोदरपणाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या त्रैमासिकात महिलांची मोफत आरोग्य तपासणी आणि जोखीमेचे व्यवस्थापन केले जाते.

प्रत्येक गावातील सरकारी दवाखान्यातील कर्मचारी किंवा अंगणवाडीच्या आशाताईंकडून या योजनांची माहिती गर्भवती स्त्रीयांपर्यंत पाहोचवणे आणि या योजनांचा लाभ मिळवून देणे हे प्राधान्याने व्हायला पाहिजे. लोकसंख्या वाढीचा आणि मातांच्या आरोग्याचा जवळचा संबंध असल्यामुळे, मातांना सुरक्षितता आणि प्रसूतीनंतर दोन अपत्यांमध्ये योग्य अंतर राखण्याबाबत जागरूक करण्यासाठी, लोकसंख्या दिनाच्या आदल्या दिवशी म्हणजे १० जुलैला 'मातृ सुरक्षा दिन' निवडण्यात आला आहे.

तसेच देशभरामध्ये दरवर्षी ११ एप्रिल रोजी राष्ट्रीय सुरक्षित मातृत्व दिवस साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने गर्भवती आणि स्तनदा मातांच्या आरोग्याची योग्य पद्धतीने देखभाल करणे का गरजेचे आहे? याबाबत जगजागृती केली जाते. दोन मुलांमध्ये जर सुरक्षित अंतर राहिले नाही, तर मातेचे व पर्यायाने बालकाचेही आरोग्य धोक्यात येते. वारंवार धूप होऊन कस कमी होत जाणाऱ्या जमिनीसारखी मातेची अवस्था होईल.ज्यामुळे तिचं मातृत्व हे 'लाभलेलं' न होता 'लादलेलं' होईल.

जर दोन मुलांमधला 'पाळणा लांबवला नाही' तर 'जगाच्या उद्धारासाठी' तिच्या हाती असलेल्या 'पाळण्याच्या दोरी'चा तिच्याच 'गळ्याभोवती फास' होऊन बसेल.

## पोर्तुगाल आणि रोनाल्डो

फिफा विश्वचषक २०२६ मध्ये 'राउंड ऑफ १६'च्या सामन्यात स्पेनकडून पराभव पत्करावा लागल्याने पोर्तुगालचे आव्हान संपुष्टात आले आणि त्यासोबतच पोर्तुगालचा फुटबॉलपटू महानायक ख्रिस्टियानो रोनाल्डोच्या कारकिर्दीतील एका महत्त्वाच्या पर्वाचाही समारोप झाला. या पराभवामुळे डोळ्यांत पाणी असतानाच रोनाल्डोने हा त्याचा अखेरचा विश्वचषक होता हे स्पष्ट केले आहे.

शिवाय पोर्तुगालच्या जर्सीमध्ये आणखी एखाद्या मोठ्या स्पर्धेत खेळण्याची त्याची शक्यता आता जवळपास संपुष्टात आली आहे. एवढ्या मोठ्या खेळाडूच्या करिअरची अखेर जेव्हा अशा पराभवामुळे होते, तेव्हा त्याच्या चाहत्यांना नक्कीच दुःख होते. कारण पोर्तुगालसाठी रोनाल्डो हा एक महानायक आहे त्याच्या अंतिम वर्ल्डकप स्पर्धेत त्याच्याकडून चाहत्यांना मोठ्या अपेक्षा होत्या. पण सहा फिफा विश्वचषक खेळणाऱ्या रोनाल्डोला त्याच्या कारकिर्दीत एकदाही आपल्या देशाला विजेता बनवता आले नाही ही खंत त्याच्या मनात कायम राहणार आहे.

तरीही पोर्तुगालच्या फुटबॉल विश्वातील दंतकथा बनलेल्या रोनाल्डोचा आदर्श नवीन पिढीतील फुटबॉलपटू घेत राहतील हे निश्चित. कारण पोर्तुगालसारख्या छोट्या देशात एका छोट्या गावातून आलेल्या रोनाल्डोची कारकीर्द निश्चितच प्रेरणादायी आहे. पोर्तुगालमधील मडेरा या छोट्या गावामध्ये रोनाल्डोला योग्य फुटबॉल साधने उपलब्ध नव्हती. आजूबाजूला जे काही उपलब्ध होते, त्याचाच तो वापर करायचा.

प्लॅस्टिकच्या बाटल्या, दगड हे त्यासाठी फुटबॉल होते आणि अरुंद रस्ते हेच त्याचे पहिले सरावाचे मैदान बनले. त्यामुळे चेंडूवरील घट्ट नियंत्रण आणि चपळ पाय विकसित होण्यास मदत झाली. वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी गाव सोडून आलेल्या रोनाल्डोला राजधानी लिस्बनमधील जीवनात स्थिरावण्यासाठी संघर्ष करावा लागला. त्याला घराची तीव्र आठवण येत असे.

पहिल्यांदाच आपल्या कुटुंबापासून दूर असल्याने, हा बदल त्याच्यासाठी भावनिकदृष्ट्या खूप मोठा होता. पण घरी परतण्याऐवजी, त्याने त्या कठीण सुरुवातीच्या महिन्यांचा उपयोग अकादमीच्या सर्वात मेहनती खेळाडूंपैकी एक बनण्यासाठी केला. हीच लवचिकता त्याच्या कारकिर्दीची ओळख बनली. अनेक व्यावसायिक फुटबॉल क्लबकडून खेळताना आणि नंतर पोर्तुगालचे प्रतिनिधित्व करताना रोनाल्डोने निश्चितच लक्षणीय कामगिरी केली. जरी त्याला आपल्या देशाला वर्ल्डकप फुटबॉल जिंकू देता आला नसला तरी त्याच्या परिश्रमाबाबत कोणाला शंका घेता येत नाही.

फुटबॉलसारख्या दमवणाऱ्या खेळामध्ये एवढी दीर्घ कारकीर्द असणे हीच एक आश्चर्याची गोष्ट असते. या स्पर्धेमध्ये पोर्तुगालचे व्यवस्थापन रोनाल्डोवर अतिरेकी अवलंबून राहिल्याचा दोषही देण्यात येत आहे. फिफा विश्वचषकाच्या 'राउंड ऑफ १६' मध्ये युरोपियन चॅम्पियन स्पेनविरुद्ध खेळताना, पोर्तुगालने आपल्या चुकांमधून काहीही न शिकण्याचे धोरणच अवलंबले.

स्पर्धेतील त्यांच्या प्रवासात आधीच अनेक अडथळे आले होते, तरीही 'रोनाल्डो' या नावाला मिळणाऱ्या अभूतपूर्व पाठिंब्यामुळे आणि अतिउत्साहाच्या वातावरणामुळे संघ व्यवस्थापनाला काही बदल करण्याची मानसिकताच निर्माण झाली नाही. व्यवस्थापक रॉबर्टो मार्टिनेझ यांच्या रणनीतीमधील चुका यावेळी घातक ठरल्या. कारण बाद फेरीत म्हणजे नॉकआउट राउंडमध्ये दुसरी संधी मिळत नाही याचा विसर व्यवस्थापनाला पडला. या स्पर्धेतील एका आकडेवारीनुसार रोनाल्डो हा मैदानावर सर्वात खराब कामगिरी करणारा पोर्तुगीज खेळाडू ठरला. या स्पर्धेत रोनाल्डोला फक्त तीन गोल करता आले. दुसरीकडे जागतिक फुटबॉल विश्वामध्ये ज्याच्या नावाची नेहमी चर्चा होत असते त्या अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीने या स्पर्धेमध्ये रोनाल्डोच्या तुलनेत अत्यंत लक्षणीय कामगिरी केलेली दिसते.

कदाचित तो या स्पर्धेमध्ये आपल्या देशाला पुन्हा एकदा विजेतेपदाचा मान मिळवून देऊ शकतो. पोर्तुगालला आपल्या रोनाल्डो या महानायकाकडूनही तशाच प्रकारच्या कामगिरीची अपेक्षा होती. पण रणनीतीतील चुका आणि वैयक्तिक कामगिरीतील मर्यादांमुळे रोनाल्डो आणि पोर्तुगाल या दोघांनाही पराभवाचा धक्का पत्करावा लागला. रोनाल्डोसारख्या मोठ्या खेळाडूचा दबाव आणि प्रभाव नेहमी संघ व्यवस्थापनावर असतो. संघ व्यवस्थापक मार्टिनेझ यांनी गोंसालो रामोस या गुणी खेळाडूला मैदानात उतरवलेच नाही.

काही दिवसांपूर्वीच क्रोएशियाविरुद्धच्या 'राउंड ऑफ ३२' सामन्यात पोर्तुगालसाठी निर्णायक गोल रामोसनेच केला होता. व्यवस्थापनाचा हा हट्टीपणा चुकीचा ठरला. खरे तर पोर्तुगीज संघाच्या कामगिरीवर रोनाल्डोचा एकूण प्रभाव काही काळापासून नक्कीच मंदावला आहे.

## असं कसलं प्रेम?

प्रेम हा शब्द उच्चारला की प्रत्येकाच्या मनात वेगवेगळी चित्रं उभी राहतात. कोणाला पहिल्या भेटीचं स्मित आठवतं, कोणाला पावसातला एकत्र चाललेला रस्ता, तर कोणाला आयुष्याच्या कठीण काळात न बोलता हात धरून उभा राहिलेला माणूस. प्रेमाची व्याख्या प्रत्येकासाठी वेगळी असते, पण त्याचा गाभा एकच असतो - विश्वास, काळजी, जबाबदारी आणि साथ. खरं तर आजही प्रेम बदललेलं नाही, बदलली आहे ती फक्त ते व्यक्त करण्याची भाषा.

काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर एक व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला. रशियातील एका हजारो फूट उंच इमारतीच्या अगदी टोकावर उभा राहून एक तरुण आपल्या प्रेयसीला लग्नाची मागणी घालत होता. एका हातात अंगठी, दुसऱ्या हातात तिचा हात आणि पायाखाली काळजाचा ठोका चुकवणारी खोल दरी! काही सेकंदांचा तो व्हिडीओ पाहतानाही अंगावर काटा येतो. केवळ एका चुकीच्या पावलाने दोन जीवांसह अनेक कुटुंबांचं आयुष्य क्षणात उद्ध्वस्त झालं असतं. पण म्हणतात ना, 'प्रेमासाठी वाटेल ते...' याचाच प्रत्यय हा क्षण देत होता. त्या व्हिडीओखाली 'कपल गोल्स!', 'हेच खरं प्रेम!', 'असं प्रपोजल मिळालं तर आयुष्य धन्य!' अशा हजारो प्रतिक्रियांचा पाऊस पडत आहे. पण, त्या काही सेकंदांच्या थराराने मनामध्ये एक कायमचा प्रश्न निर्माण केला, प्रेम सिद्ध करण्यासाठी खरंच जीव धोक्यात घालावा लागतो का? खरं तर, आजही प्रेम बदललेलं नाही, बदलली आहे ती फक्त ते व्यक्त करण्याची भाषा! एकेकाळी प्रेमाला अशा जीवघेण्या प्रदर्शनाची गरज नव्हती.

तेव्हा नजरेच्या एका कोपऱ्यातून भावना व्यक्त व्हायच्या. एखादं पत्र वर्षानुवर्षं काळजापाशी जपलं जायचं. स्टेशनवर निरोप देताना डोळे पाणावायचे. आजारपणात रात्रभर जागणं, संकटात खंबीरपणे पाठीशी उभं राहणं आणि संसाराच्या सुख-दुःखात खांद्याला खांदा लावून चालणंष्ठ हीच तर प्रेमाची खरी भाषा होती.'

आज मात्र मोबाईलचा कॅमेरा आणि सोशल मीडियाने प्रेमालाही एका वेगळ्याच शर्यतीत उभं केलं आहे. कोणाचं प्रपोजल सर्वात हटके? कोणाचा सरप्राइज सर्वात महाग? कोणाचा व्हिडीओ सर्वाधिक व्हायरल? कोणाला जास्त लाईक्स? नकळत प्रेमापेक्षा त्याचं प्रदर्शन अधिक महत्त्वाचं ठरू लागलं आहे. यातूनच धोकादायक ट्रेंड जन्माला येतात. उंच इमारती, कड्यांची टोकं, धबधब्यांच्या कडा, रेल्वे रूळ, वेगाने धावणाऱ्या गाड्याष्ठ या सगळ्या जागा प्रेम व्यक्त करण्याची ठिकाणं बनू लागतात. काही सेकंदांचा थरार नक्कीच रोमँटिक वाटतो.